मंगळवार
५
ऑगस्ट २०२५

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : १५६
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत




## भारताचा इंग्लंडवर ६ धावांनी चित्तथरारक विजय

### मालिका २-२ बरोबरीत

**मँचेस्टर, दि. ४** प्रतिनिधी

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या युवा भारतीय संघाने जे करून दाखवल आहे, ते भलाभल्या दिग्गजांना जमलं नव्हतं. ओव्हलच्या मैदानावर भारतीय संघाने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ विजयाच्या अगदी जवळ पोहोचला होता. पण भारतीय गोलंदाजांनी शेवटच्या षटकांमध्ये पूर्ण जोर लावला आणि इंग्लंडच्या फलंदाजांना गुडघे टेकायला भाग पाडलं. हा सामना भारतीय संघाने ६ धावांनी जिंकून मालिका २-२ ने बरोबरीत आणली आहे.

**सविस्तर वृत्त पान ७ वर...**

## महत्त्वाचे

### बिल्डरांकडून मुंबईत हाऊसिंग जिहाद



**मुंबई :** पश्चिम उपनगरातील जोगेश्वरी येथील दोन झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पात हिंदूंची घरे मुस्लिमांना देण्याचे कटकारस्थान बिल्डरांनी रचल्याचा आरोप शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी आज केला. हाऊसिंग जिहादच्या माध्यमातून मुंबईतील डेमोग्राफी बदलण्याचा प्रयत्न बिल्डर करत आहेत, असे निरुपम म्हणाले. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. निरुपम पुढे म्हणाले की, जोगेश्वरी ओशिवरा येथे पॅराडाइज झोनमध्ये ४४ घरे होती, पुनर्विकासात ही संख्या ९५ पर्यंत वाढली. यामधील ५१ घरे ही मुस्लिमांना देण्यात आल्याचा आरोप निरुपम यांनी केला आहे.

### ५१ कबुतरखाने मुंबईत बंद



**मुंबई :** कबुतरांना खायला देण्यावरील बंदी लागू झाल्यापासून, बीएमसीने दादर कबुतरखान्यात १०० हून अधिक लोकांना दंड ठोठावला आहे. कबुतरांना खायला देऊन बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध एफआयआर आणि फौजदारी तक्रारी दाखल करण्याचा अधिकार मुंबई उच्च न्यायालयाने बीएमसीला दिला आहे, ज्यामध्ये जर एखाद्या व्यक्तीने वारंवार आदेशाचे उल्लंघन केले तर त्याला अटक होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारच्या निर्देशानुसार आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दादर कबुतरखान्यात कबुतरांना खायला देण्यावर अधिकृतपणे बंदी घातली आहे.

### तुम्ही का वाद घालता? - राज ठाकरेंचा सवाल



**मुंबई :** आम्ही दोघं भाऊ जर वीस वर्षांनी एकत्र येऊ शकतो, तर मग तुम्ही एकमेकांशी का वाद घालता ? आता वाद न घालता निवडणुकीच्या तयारीला लागा, असा आदेश महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला. मनसे पदाधिकाऱ्यांच्या मेळावा सोमवारी मुंबईतील रंगशारदा येथे पार पडला. यावेळी राज ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना उद्धव समर्थकांशी जुळवून घेण्याचे आदेश दिले. मुंबई महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागा, असेही राज ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. निवडणुका जाहीर होण्याआधीच सध्याच्या मतदार याद्या तपासून घ्या. जुने कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना निवडणुकीच्या तयारीसाठी सोबत घ्या; असे निर्देश राज ठाकरे यांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांना दिले.

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

# नवीन प्रभाग रचनेनुसार, ओबीसी आरक्षणासह निवडणुका होणार!

### २७ टक्के ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका फेटाळली

**नवी दिल्ली, दि. ४** वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चेचा आणि अनिश्चिततेचा विषय ठरलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अखेर कोर्टाचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज एक ऐतिहासिक निर्णय देत, २७ टक्के ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे आता महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांसह सर्व निवडणुका नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह घेतल्या जाणार आहेत.

ही याचिका स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणावर प्रश्न उपस्थित करणारी होती. मात्र कोर्टाने स्पष्ट शब्दांत हा दावा नामंजूर करत राज्य सरकारच्या निर्णयाला दुजोरा दिला. परिणामी, गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे नगर पंचायत, नगर परिषद, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अन्य स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसी समाजाचा हक्क पुन्हा एकदा सिद्ध झाला आहे. सरकारच्या नव्या प्रभाग रचनेनुसार या निवडणुका घेण्यात येणार असून सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ मध्ये त्याची घोषणा होण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या होत्या. यामागे ओबीसी आरक्षणाचा मुद्दा प्रमुख कारणीभूत होता. २७ टक्के ओबीसी आरक्षणाला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. या याचिकांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाच्या वैधतेला प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले होते. मात्र, आज, ४ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयाने या सर्व याचिका फेटाळून लावत, २७ टक्के आरक्षणासह निवडणुका घेण्यास हिरवा कंदील दाखवला आहे.





### २७ टक्के आरक्षणासह निवडणुका घेण्यास हिरवा कंदील

■ या ऐतिहासिक निर्णयानंतर, आता महाराष्ट्रातील नगर पंचायत, नगर परिषद आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यासह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २७ टक्के ओबीसी आरक्षणासह घेण्याचा मार्ग पूर्णपणे सुकर झाला आहे. या निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसार होणार असल्याने, अनेक ठिकाणी राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवा अध्याय सुरू होणार असून, आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी पाहायला मिळणार आहे.

## झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचे निधन

**रांची, दि. ४** वृत्तसंस्था



झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम) चे संस्थापक शिबू सोरेन यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी निधन झाले. शिबू सोरेन यांनी दिल्लीच्या गंगाराम रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर बराच काळ या रुग्णालयात उपचार सुरू होते. शिबू सोरेन यांचे पुत्र आणि झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे या दुःखद बातमीला दुजोरा दिला आहे.

मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, आदरणीय दिशाम गुरुजी आपल्या सर्वांना सोडून गेले आहेत. आज मी शून्य झालो आहे, असे त्यांनी म्हटले. शिबू सोरेन अनेक वेळा झारखंडचे मुख्यमंत्री होते. दीर्घ आजारानंतर त्यांनी सोमवारी (४ ऑगस्ट) दिल्लीच्या रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. १९ जूनपासून त्यांना गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यासह अनेक झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते शिबू सोरेन यांच्यासोबत त्यांच्या शेवटच्या क्षणी उपस्थित होते. शिबू सोरेन यांना वयाशी संबंधित अनेक आजार होते. तसेच, त्यांना मूत्रपिंड किंवा मूत्रपिंडाचा आजार होता. शिबू सोरेन गेल्या काही दिवसांपासून व्हीलचेअरवर होते. ते झामुमोच्या राष्ट्रीय अधिवेशनाला व्हीलचेअरवरून आले होते. शिबू सोरेन हे गेल्या ३८ वर्षांपासून झारखंड मुक्ती मोर्चाचे प्रमुख नेते होते. त्यांना पक्षाचे संस्थापक संरक्षक म्हणून ओळखले जात असे. माजी मुख्यमंत्री सोरेन यांचा जन्म ११ जानेवारी १९४४ रोजी बिहारमधील हजारीबाग, आता झारखंड येथे झाला. ते जनतेमध्ये दिशाम (पान २ वर)

### एकदाही कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत!

■ बिहारपासून वेगळे राज्य 'झारखंड' निर्माण करण्याच्या चळवळीतही त्यांनी निर्णायक भूमिका बजावली. ते तीनदा झारखंडचे मुख्यमंत्री झाले (२००५, २००८, २००९), परंतु एकदाही त्यांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले नाहीत. ते यूपीएच्या पहिल्या कार्यकाळात कोळसा मंत्री झाले परंतु त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा द्यावा लागला. त्यांचे वडील शोभ्रम सोरेन यांच्या हत्येनंतर शिबू सोरेन राजकारणात आले.

## आंध्र प्रदेशातील ग्रॅनाइट खाणीत मोठी दुर्घटना

### ६ कामगारांचा मृत्यू, ३ जण गंभीर जखमी

**हैदराबाद, दि. ४** वृत्तसंस्था

आंध्र प्रदेशातील बापटला जिल्ह्यातील एका ग्रॅनाइट खाणीत ओडिशातील सहा स्थलांतरित कामगारांवर एक मोठा दगड कोसळल्याने मोठी दुर्घटना झाली. या दुर्घटनेत या सहाही कामगारांचा मृत्यू झाला असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच या अपघातात किमान तीन जण जखमी झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी १०.३० च्या सुमारास ही घटना घडली जेव्हा १० ते १५ कामगार खाणीत काम करत होते.

ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आणि मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत जाहीर केली. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, सर्व मृत ओडिशाचे रहिवासी आहेत. आम्हाला संशय आहे की हा दगड पाण्याच्या गळतीमुळे घसरला आणि ही घटना घडली. घटनास्थळी कोणताही स्फोट किंवा भूकंपाची हालचाल झाली नाही. फॉरेन्सिक टीम तपास करत आहे. घटनेनंतर लगेचच बचाव कार्य सुरू करण्यात आले ज्यामध्ये खाण विभागाचे अधिकारीही पोलिसांसोबत सामील झाले. ओडिशाच्या ब्रह्मपूरच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, गंजम जिल्ह्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याची टीम मृतांचे मृतदेह परत आणण्यासाठी बापटला येथील बल्लीकुर्वा येथे गेली आहे. दरम्यान, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री (पान २ वर)



■ मुख्यमंत्र्यांच्या मदत निधीतून प्रत्येक मृतांच्या कुटुंबाला प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत देण्यात येईल असे मुख्यमंत्री कार्यालयाने सांगितले. गंजमचे जिल्हाधिकारी कीर्ती वासन व्ही यांनी, दिगापहांडीचे सहाय्यक तहसीलदार यांच्या नेतृत्वाखाली एक पथक घटनास्थळी रवाना झाले आहे जेणेकरून मृतदेह त्यांच्या मूळ ठिकाणी आणता येतील, असे त्यांनी म्हटले.

## जम्मू-कश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा?

**नवी दिल्ली :** जम्मू आणि कश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा मिळणार का, या प्रश्नावर देशभरात चर्चेला उधाण आलं आहे. कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एकाच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंशी वेगवेगळ्या बैठक घेतल्या. विशेष म्हणजे ही बैठक ५ ऑगस्ट म्हणजे कलम ३७० हटवल्याच्या सहाव्या वर्धापन दिनाच्या दोनच दिवस आधी झाली.

या बैठकींची अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही, जे सामान्यतः अशा उच्चस्तरीय भेटीनंतर दिली जाते. त्यामुळे चर्चांना अधिक उधाण आले आहे. याशिवाय अमित शहा यांनी जम्मू-कश्मीरमधील भाजपचे प्रमुख आणि काही स्थानिक नेत्यांसोबतही स्वतंत्र बैठक घेतल्याचे समजते. त्याचबरोबर पंतप्रधानांनी ५ ऑगस्टच्या पूर्वसंध्येला एनडीए खासदारांची महत्त्वपूर्ण बैठक बोलावल्याची माहितीही मिळत आहे. राजकीय वर्तुळासोबतच समाजमाध्यमांवरही जोरदार चर्चा सुरू आहेत. निवृत्त लष्करी अधिकारी आणि (पान २ वर)

## चीनने भारताची जमीन बळकावली हे तुम्हाला कसे कळाले?

### सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना फटकारले

**नवी दिल्ली, दि. ४** वृत्तसंस्था



लष्करावर केलेल्या टिप्पणीबद्दल सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना फटकारले. चीनने भारताची जमीन बळकावली आहे हे तुम्हाला कसे कळले? तुमच्या माहितीचा विश्वसनीय स्रोत कोणता आहे? अशी विचारणा न्यायालयाने राहुल यांना केली आहे. तसेच तुम्ही खरे भारतीय असाल तर अशा गोष्टी बोलणार नाहीत, असेही न्यायालयाने त्यांना म्हटले.

राहुल यांनी २०१४ पासून आतापर्यंत अशी अनेक विधाने केली आहेत, ज्यामुळे त्यांना न्यायालयात जावे लागले आहे. त्यांनी २५ ऑगस्ट २०२२ रोजी कारगिलमध्ये भारत जोडो यात्रे दरम्यान एका रॅलीला संबोधित केले. गलवानमध्ये चिनी सैन्याशी झालेल्या हिंसक चकमकीचा संदर्भ देत, राहुल गांधींनी रॅलीत दावा केला होता, की भारत जोडो यात्रेबद्दल लोक काही पण विचारतील, पण चिनी सैनिकांनी आपल्या सैनिकांना मारहाण केल्याबद्दल एकही प्रश्न विचारणार नाहीत. चीनने २००० चौरस किलोमीटर भारतीय भूमीवर कब्जा केला आहे. चीनने भारतीय भूभागावर कब्जा केल्याबाबत राहुल गांधी यांनी केलेल्या बेजबाबदार विधानावर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र आक्षेप घेतला. न्यायालयाने म्हटले आहे, की जेव्हा सीमेवर तणावपूर्ण परिस्थिती असते तेव्हा विरोधी पक्षनेत्याने असे विधान करायला नको होते. जर तुम्ही खरे भारतीय असता तर तुम्ही हे म्हटले नसते. जेव्हा सीमेपलीकडे (पान २ वर)

### हल्ल्यामागे पाकिस्तानचाच हात | चॉकलेट आणि पाकिस्तानी मतदार ओळखपत्रे जप्त

# मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची ओळख पटली!

**जम्मू, दि. ४** वृत्तसंस्था

चॉकलेट, पाकिस्तानी ओळखपत्र आणि सॅटेलाइट फोनवरून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा पाकिस्तानशी संबंध असल्याचे उघड झाले आहे. २८-२९ जुलै रोजी ऑपरेशन महादेव अंतर्गत भारतीय सुरक्षा दलांनी जम्मू आणि काश्मीरमध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या तीन दहशतवाद्यांना ठार मारले. या दहशतवाद्यांकडून अशा काही गोष्टी जप्त करण्यात आल्या, त्यामुळे पहलगाम हल्ल्यामागे पाकिस्तानचाच हात असल्याचे स्पष्ट झाले.

२९ जुलै रोजी लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवरील चर्चे दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत सांगितले होते की, ऑपरेशन महादेवमध्ये मारल्या गेलेल्या तीन दहशतवाद्यांचा पाकिस्तानशी संबंध असल्याचे आढळून आले आहे. पहिल्यांदाच, आमच्याकडे पाकिस्तान सरकारने दहशतवाद्यांना दिलेली कागदपत्रे आहेत. मारलेल्या दहशतवाद्यांची ओळख पटली आहे. सुलेमान शाह उर्फ फैसल जट्ट (ए प्लस प्लस ग्रेड दहशतवादी), अबू हमजा उर्फ अफगाण (ए ग्रेड दहशतवादी) आणि यासी उर्फ जिब्रान (ए ग्रेड दहशतवादी) अशी त्यांची नावे आहेत. पाकिस्तानच्या निवडणुकीतील मतदार ओळखपत्र, पाकिस्तान निवडणूक आयोगाने जारी केलेली स्लिप, मतदार अनुक्रमांक, सॅटेलाइट फोनमधून सापडलेले मायक्रो एसडी कार्डही सुरक्षा दलांना सापडले. यामध्ये दहशतवाद्यांच्या कुटुंबाची माहिती देखील होती. यासोबतच दहशतवाद्यांकडून कराचीमध्ये बनवलेल्या चॉकलेटचे रिकामे पॅकेटही सापडले. हे दहशतवादी लष्कर-ए-तैयबाचे धोकादायक दहशतवादी होते. पहलगाम हल्ल्यापासून ते दाचीगाम-हरवनच्या (पान २ वर)



### काडतुसांच्या फॉरेन्सिक तपासणीतही खात्री

■ दहशतवादी गुरेझ सेक्टरमधून भारतीय सीमेत घुसले होते. गुप्तचर विभागाने दहशतवाद्यांच्या रेडिओ संभाषणांचा मागोवा घेतला. २१ एप्रिल रोजी दहशतवादी बैसरनपासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या ढोक भागात पोहोचले. दोन काश्मिरी रहिवाशांनी दहशतवाद्यांना आश्रय आणि अन्न पुरवल्याची कबुली दिली. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दिवशी दहशतवादी पायी बैसरन खोऱ्यात पोहोचले. हल्ल्यानंतर, दहशतवादी ईशान्य भागातील दाचीगाम येथे रवाना झाले. सरकारने पहलगाम दहशतवादी हल्ल्यादरम्यान झाडलेल्या गोळ्यांचे काडतुसे आणि ऑपरेशन महादेवमध्ये दहशतवाद्यांनी झाडलेल्या गोळ्या फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवल्या. त्यावरून पहलगाम हल्ल्यात आणि ऑपरेशन महादेवमध्ये सहभागी असलेल्या दहशतवाद्यांनी एकाच रायफलमधून गोळ्या झाडल्याची खात्री झाली.

## भाषेच्या आधारावर मारहाण केल्यास कारवाई करणार

### मुख्यमंत्र्यांनी दिला इशारा

**मुंबई, दि. ४** वृत्तसंस्था



कुणालाही भाषेच्या आधारावर मारहाण करणे योग्य नाही. महाराष्ट्रात तुम्ही राहात असाल तर तुम्हाला मराठी आली पाहिजे, हा आग्रह ठीक आहे, मात्र याचा दुराग्रह होणे अपेक्षित आहे. तुम्ही मराठी बोलत नाहीत, यासाठी कुणाला मारहाण करु शकत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका कार्यक्रमात बोलताना केले. यावेळी त्यांनी मंत्री नितेश राणे यांचं वक्तव्यदेखील चुकीचे असल्याचे म्हटले.

मराठी बोलता येत नाही म्हणून मारहाण झाल्याच्या दोन-तीन घटना निश्चित झाल्या आहेत. जो घटना करणार त्याच्यावर आमचे सरकार कारवाई करणार. मी आधी हे सांगतो की, महाराष्ट्रात मराठी शिकण्याची सक्ती आहे. आम्ही ती सक्तीची केली आहे. त्याबाबत आमचे कोणतेही कॉम्प्रमाईज नाही. महाराष्ट्रात मराठी बोलली गेली पाहिजे असा आग्रह करणे चुकीचे नाही. पण कुणी मराठी बोलू शकत नाही तर त्याला तुम्ही मारणार हे आमच्या सरकारला मंजूर नाही. असे जो करणार त्यावर आम्ही कारवाई करणार म्हणजे करणार, असे देवेंद्र फडणवीस (पान २ वर)

# पान 1 वरून...

## झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू ...

गुरु आणि गुरुजी म्हणूनही ओळखले जात होते. त्यांनी सुरुवातीला आदिवासींच्या शोषणाविरुद्ध लढा दिला. ७० च्या दशकात 'धनकतनी चळवळ' आणि इतर चळवळींद्वारे त्यांनी आदिवासी समाजाचा आवाज उठवला. शिबू यांनी १९७७ मध्ये पहिल्यांदा लोकसभा निवडणूक लढवली, पण त्यांना पराभवाचा सामना करावा लागला. पण १९८० मध्ये ते यशस्वी झाले. त्यानंतर त्यांनी १९८६, १९८९, १९९१, १९९६ मध्ये निवडणुका जिंकल्या. २००४ मध्ये ते दुमका येथून लोकसभेवर निवडून आले. शिबू सोरेन हे झारखंडचे मुख्यमंत्रीही राहिले आहेत. आता त्यांचा मुलगा हेमंत सोरेन राज्याचे मुख्यमंत्री आहेत.

## चीनने भारताची जमीन बळकावली ...

वाद असतो, तेव्हा तुम्ही हे सर्व म्हणू शकता का? तुम्ही संसदेत प्रश्न का विचारू शकत नाही? तुम्हाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य असले तरी, एक खरे भारतीय म्हणून तुम्ही सैन्याबद्दल अशी टिप्पणी करावी का? तुम्ही एक जबाबदार नेते आहात. यावर राहुल यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी म्हणाले की, जर राहुल विरोधी पक्षनेते म्हणून हे सर्व सांगू शकत नसतील, तर काय फायदा? त्यावर त्यांना उत्तर देताना न्यायालयाने सांगितले, की राहुल हे प्रश्न संसदेत का उपस्थित करत नाहीत? सोशल मीडियावर का टिप्पणी करतात? दरम्यान, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने राहुल यांना दिलासाही दिला. त्यांच्याविरोधात कनिष्ठ न्यायालयात सुरू असलेल्या कार्यवाहीला स्थगिती दिली. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रे दरम्यान भारतीय सैन्याबद्दल ही टिप्पणी केली होती, ज्यासाठी त्यांच्याविरुद्ध मानहानीचा खटला दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात त्यांना सर्वोच्च न्यायालयाने दिलासाही दिला. सोमवारी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, चीनने २००० चौरस किलोमीटर जमिनीवर कब्जा केला आहे हे तुम्हाला कसे कळले? विश्वसनीय माहिती काय आहे? दरम्यान, २०२० मध्ये चीनने पूर्व लडाखच्या सीमावर्ती भागात सरावाच्या बहाण्याने मोठ्या संख्येने सैनिक तैनात केले होते. त्यानंतर सीमेवर अनेक ठिकाणी घुसखोरीच्या घटना घडल्या. प्रत्युत्तर म्हणून, भारत सरकारनेही या भागात चीनइतकेच सैनिक तैनात केले. परिस्थिती बिघडतच राहिली. अखेर १५ जून रोजी गलवान खोऱ्यात चिनी सैन्याशी चकमक झाली, ज्यामध्ये २० भारतीय सैनिक शहीद झाले आणि ४० चिनी सैनिक मारले गेले.

## आंध्र प्रदेशातील ग्रॅनाइट खाणीत...

एन. चंद्राबाबू नायडू यांनी अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले.नायडू यांनी एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, मी अधिकाऱ्यांशी बोललो आहे आणि जखमींना सर्वोत्तम उपचार देण्याचे आणि अपघाताची कारणे शोधण्याचे निर्देश दिले आहेत. युवाजन श्रमिका रायथू काँग्रेस पक्षाचे (वायएसआरसीपी) प्रमुख वायएस जगन मोहन रेड्डी यांनीही अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आणि म्हटले की, ही एक अतिशय हृदयद्रावक घटना आहे. या कामगारांनी त्यांच्या कुटुंबांसाठी कठोर परिश्रम करताना आपले प्राण गमावले.

## मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची ...

जंगलात लपले होते. सुरक्षा दलांना आणि गुप्तचर विभागाला जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांबद्दल माहिती मिळाली. त्यानंतर दहशतवाद्यांच्या उपस्थितीची पुष्टी करण्यासाठी अनेक दिवस गुप्त कारवाई करण्यात आली. जेव्हा ते निश्चित झाले तेव्हा ऑपरेशन महादेव सुरू करण्यात आले.

## भाषेच्या आधारावर मारहाण...

स्पष्ट म्हणाले. नितेश राणे जे बोलले ते चुकीचे आहे. त्यांना खरंतर वेगळे बोलायचे होते. त्यांचे म्हणणे होते की, तुम्ही मराठी येत नाही म्हणून हिंदूंना मारत आहेत. इतर लोकं देखील आहेत ज्यांना मराठी बोलत नाहीत त्यांना का मारत नाहीत? नितेश राणे जे बोलले ते एकप्रकारे बरोबर आहे आणि दुसरीकडे चुकीचे देखील आहे. केवळ भाषेच्या आधारावर किंवा कोणत्या धर्माची लोक ही भाषा बोलत नाहीत या आधारावर हे डिस्क्रिमिनेट होऊ शकत नाही. हे चुकीचे आहे. त्यामुळे अशा भाषेचा वापर व्हायला नको, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## जम्मू-कश्मीरला पुन्हा राज्याचा ...

लेखक के. जे. एस. ढिल्लों यांनी यावर प्रतिक्रिया देताना सावध पावले टाकण्याचा सल्ला दिला. काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित होण्यासाठी अनेकांचे प्राण गेले. अशा स्थितीत कोणताही निर्णय घेताना घाई करू नये, असं त्यांनी ट्विट केलं. ज्येष्ठ विश्लेषक आरती टिक्कू सिंह यांनी देखील जोरदार अफवा असल्याचे सांगितले की केंद्र सरकार जम्मू आणि कश्मीरला राज्याचा दर्जा देण्याच्या तयारीत आहे. काही अफवांनुसार जम्मू आणि कश्मीरला स्वतंत्र राज्य म्हणून वेगळं केलं जाऊ शकतं, जे अत्यंत गंभीर परिणाम घडवू शकते, असं त्यांनी म्हटलं. ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द करून जम्मू-कश्मीर आणि लडाख अशी दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये फाळणी करण्यात आली होती. त्यावेळी जम्मू-कश्मीरची विधानसभाही बरखास्त झाली होती आणि प्रशासन केंद्राकडे गेला होता. त्यावेळी आणि त्यानंतरही केंद्र सरकारने राज्याचा दर्जा पुन्हा बहाल केला जाईल, असं वेळोवेळी सांगितलं होतं. डिसेंबर २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेही सरकारला शक्य तितक्या लवकर जम्मू-कश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्याचे निर्देश दिले होते. २०२४ मध्ये जम्मू-कश्मीरमध्ये दशकानंतर निवडणुका झाल्या आणि उमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने सरकार स्थापन केलं. त्यानंतर राज्याचा दर्जा बहाल करण्याची मागणी जोर धरू लागली. एप्रिल २०२५ मध्ये पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे काही काळ ही मागणी मागे पडली होती, पण काँग्रेसने संसदेतील सत्रात पुन्हा ती लावून धरली आहे.

**पुन्हा निवडणुका?**

जम्मू आणि काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल झाल्यास, विधानसभा बरखास्त करून नव्याने निवडणुका घेतल्या जातील का, हा प्रश्नही उपस्थित होतोय. याबाबत उमर अब्दुल्ला यांनी म्हटलं की, राज्याचा दर्जा बहाल होणार असेल आणि त्यानंतर नव्याने निवडणुका होतील, तर आम्हाला काही हरकत नाही.

# धनंजय मिश्रा समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पातूर , दि. ४ :** पातुर येथील आमदार डॉ राहुल पाटील एज्युकेशन कॅम्पस चे जनसंपर्क अधिकारी श्री धनंजय मिश्रा यांच्या सामाजिक कार्यासाठी त्यांचा उपराजधानी नागपूर येथे समाज भूषण पुरस्कार देऊन दर्पण संपादक मंडळाच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे . शेतकरी कष्टकरी माणसाविषयी असलेली आत्मीयता व त्याबद्दल केलेले विपुल लिखाण व सामाजिक कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला,

श्रीमंत राजे मुधोजी भोसले व आमदार संदीप जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार वितरित करण्यात आला

दर्पण संपादक मंडळाचे अध्यक्ष सुशील पांडे राजेंद्र जी पाठक व सुमित लिमसे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाशिकच्या अश्विनी पुरी यांनी केले .

धनंजय मिश्रा यांना मिळालेल्या पुरस्कारासाठी पातूरच्या आयुर्वेद महाविद्यालयाचे संचालक डॉक्टर साजिद शेख प्राचार्य जयश्री काटोले व उपप्राचार्य अभय भुस्कडे डॉक्टर वसीम हरहान अमीन यांच्यासह अनेकांनी त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

### मुख्यमंत्री वॉररुममध्ये मुख्यमंत्र्यांनी घेतला ३० प्रकल्पांचा आढावा

# वर्षोनुवर्षे प्रकल्प चालवू नका; तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मुंबई, दि. ४ :** पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेतल्यानंतर ते वेळेत पूर्ण व्हायला हवेत. त्यामुळे पायाभूत सुविधांचे प्रकल्प वर्षानुवर्षे चालू न राहता ते प्रकल्प हाती घेतल्यानंतर तीन वर्षांत पूर्णत्वास यायला हवेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मुख्यमंत्री वॉररुमधील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव उपस्थित होते. तर दूरदृष्यप्रणालीद्वारे विविध विभागांचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वॉररुमच्या आजच्या तिसऱ्या बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी ३० प्रकल्पांच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला. यापूर्वी झालेल्या दोन बैठकांमध्ये एकूण ३३ प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला होता. त्यावेळी सुमारे १३५ मुद्यांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या निर्णयांवरील अंमलबजावणीची माहिती यावेळी देण्यात आली.

मेट्रो प्रकल्पाच्या शेवटच्या स्थानकाजवळ गृहनिर्माण प्रकल्प उभारावेत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आपल्याकडे तंत्रज्ञान अद्ययावत आहे. त्यामुळे कमी कालावधीत प्रकल्प पूर्ण व्हायला हवेत. मुंबईसह राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी ज्या अडचणी येतात त्यांचे निराकरण वेळेत करावेत. तसेच मेट्रो प्रकल्पाच्या शेवटच्या स्थानकाजवळ गृहनिर्माण प्रकल्प उभारावेत. तसेच मेट्रो प्रकल्प वेळेत मार्गी लागण्यासाठी कुशल यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे.

### वॉररुमधील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करा

पायाभूत सुविधा प्रकल्प राबविताना तो वेळेत पूर्ण होईल, याकडे सर्वांनी लक्ष द्यायला हवे. प्रत्येकाचे स्वतंत्र डॅशबोर्ड न करता फक्त सीएम डॅशबोर्डवरच प्रत्येक प्रकल्पाची सद्यःस्थिती नोंदविली गेली पाहिजे. प्रकल्पासंबंधित सर्व गोष्टी या डॅशबोर्डवर वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावेत. तसेच प्रकल्पातील अडचणी सोडविण्यासाठी वॉररुम आढावा बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्यात यावी.

## पत्रकारांवरील हल्ल्याचा निषेध; जिल्हा पोलिस अधीक्षकांना निवेदन



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ४ :** येथील दैनिक सुफ्फा वृत्तपत्राचे संपादक हाजी सज्जाद हुसेन आणि त्यांच्या मुलांवर प्राणघातक हल्ला करणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीविरोधात लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाच्या वतीने जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांना निवेदन सादर करून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.

गेल्या शनिवारी रात्री अकोल्यातील ईराणी वसाहतीत आणि आकोट फाईल परिसरात घडलेल्या या धक्कादायक घटनेने पत्रकारिता क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. गुलाम अली औलद हुसेन आणि अंबादास उर्फ सोनू रोहिदास थोरात या दोन गुन्हेगारांनी त्यांच्या विरोधातील पोलिस प्रेस नोटवर आधारित बातमी प्रसिद्ध झाल्याच्या रागातून हाजी सज्जाद हुसेन आणि त्यांच्या कुटुंबीयांवर कोयत्यासारख्या धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला केला.

या घटनेनंतर आज लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचे संस्थापक आणि राष्ट्रीय अध्यक्ष संजय एम. देशमुख (निंबेकर) यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी संपादकांवरील हल्ले हा केवळ व्यक्तीगत नव्हे, तर लोकशाहीवरील हल्ला आहे, असा ठाम निर्वाळा देत गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.याप्रसंगी संजय देशमुख यांनी सांगितले की, ''हल्लेखोर आधी धमक्या देतात, त्या तक्रारी पोलिसांकडे जातात पण वेळेवर कारवाई होत नाही. हेच दुर्लक्षित करणं भविष्यातील हल्ल्यांना निमंत्रण ठरतं.दरम्यान, जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी देखील याबाबत संवेदनशील भूमिका घेत, ''धमकी मिळालेल्या तक्रारींकडे गभीरतेने लक्ष दिलं जाईल. अशा गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करून पत्रकारांचे संरक्षण सुनिश्चित केले जाईल,'' असे स्पष्ट आश्वासन दिले.

# रिवा-पुणे साप्ताहिक एक्सप्रेस सुरू

## अकोल्याला थांबा : खा.अनुप धोत्रे यांचे अभिनंदन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ४ :** मध्यप्रदेशातील रिवा ते महाराष्ट्रातील पुणे दरम्यान धावणाऱ्या रिवापुणे साप्ताहिक एक्सप्रेस गाडीला अखेर अकोला येथे थांबा मिळाला असून, ही सेवा गुरुवारपासून नियमितपणे सुरू झाली आहे. या गाडीच्या थांब्याच्या मागणीसाठी विशेष प्रयत्न करणारे खासदार अनुप धोत्रे यांचे सर्वत्र कौतुक होत असून, विविध प्रवासी संघटनांनी आणि नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

ट्रेन क्र. २०१५१ पुणे ते रिवा एक्सप्रेस ही गाडी दर गुरुवारी १५.१५ वाजता पुणे स्थानकावरून प्रस्थान करून दुसऱ्या दिवशी शुक्रवारी १७.३० वाजता रिवा स्थानकावर पोहोचते.या मार्गात अकोला स्थानकावर दर शुक्रवारी पहाटे ००.४५ वाजता आगमन व ००.४८ वाजता प्रस्थान होते. ट्रेन क्र. २०१५२ रिवा ते पुणे एक्सप्रेस ही गाडी दर बुधवारी ०६.४५ वाजता रिवा स्थानकावरून सुटून दुसऱ्या दिवशी गुरुवारी ०९.४५ वाजता पुणे स्थानकावर पोहोचते. अकोला येथे ही ट्रेन दर बुधवारी रात्री २२.३७ वाजता पोहोचून २२.४० वाजता पुढे रवाना होते.थांबे: दौंड कॉर्ड लाइन, अहमदनगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा, नागपूर, गोंदिया, बालाघाट, नैनपूर, जबलपूर, कटनी, सतना. डब्यांची रचना:

२ वातानुकूलित द्वितीय श्रेणी, ३ वातानुकूलित तृतीय श्रेणी, ३ इकोनॉमी वातानुकूलित तृतीय श्रेणी, ६ शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, १ द्वितीय आसन व्यवस्था असलेला गार्ड ब्रेक व्हॅन, १ जनरेटर व्हॅन. ही माहिती खासदार अनुप धोत्रे यांच्या जनसंपर्क कार्यालयातून देण्यात आली. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे वेळोवेळी केलेल्या विनंत्यांमुळे अकोल्याला हा थांबा मिळाला आहे. यामुळे प्रयागराज, काशी, जबलपूर आणि अयोध्या या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांना अत्यंत महत्त्वाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर अकोल्यातील रेल्वे प्रवासी संघटना, रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य ॲड. सुभाष सिंग ठाकूर, ॲड. अमोल इंगळे, वसंत बाचूका, उमेश मालू आणि विविध वृत्त प्रतिनिधींनी खा. अनुप धोत्रे यांचे फुलांच्या पुष्पगुच्छासह अभिनंदन करत त्यांची कार्यक्षम आणि सक्रिय भूमिकेची प्रशंसा केली आहे. हा थांबा केवळ अकोल्याच्या दृष्टीने नव्हे तर संपूर्ण विदर्भ आणि उत्तर भारतातील प्रवाशांसाठी एक महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे. या गाडीमुळे अकोल्याचा रेल्वे नकाशावरील महत्त्व अधिक वृद्धिंगत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# गणेशोत्सवात रात्री उशिरापर्यंत लोकल आणि मेट्रो सुरु ठेवावी- मंगलप्रभात लोढा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मुंबई, दि. ४ :**महाराष्ट्र आणि मुंबई एमएमआर परिसरात साजरा होणारा गणेशोत्सव जगप्रसिद्ध असून रात्री उशिरापर्यंत गणेशभक्त दर्शनासाठी येत असतात अशा वेळी गणेशभक्तांसाठी लोकल आणि मेट्रो सुरु ठेवण्यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. महापालिकेच्या ग्रांट रोड येथील डी विभाग कार्यालयात आयोजित जनता दरबारात ते बोलत होते.

गणेशोत्सवा दरम्यान महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गणेशभक्त मुंबई परिसरात दाखल होतात. यावेळी भक्तांच्या सोयीसाठी सार्वजनिक वाहतूक सुरु असणे अतिशय महत्त्वाचे आहे. त्यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाशी पत्र व्यवहार सुरु असल्याची माहितीही मंत्री श्री.लोढा यांनी जनता दरबारात दिली.

प्रशासकीय यंत्रणा राबवून थेट जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळातील सदस्यांना केली होती. या सूचनेला अनुसरूनच या जनता दरबाराचे आयोजन केल्याचे मंत्री श्री.लोढा यांनी स्पष्ट केले. गेल्या महिनाभरात दक्षिण मुंबईत झालेल्या पाच जनता दरबारात ऑनलाईन आणि ऑफलाईन मिळून सुमारे दोन हजार नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. नागरिकांच्या नागरी समस्या सोडवण्यासाठी म्हाडा, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण महापालिका आणि रेल्वे सह बारा विभागांचे अधिकारी एकाच छताखाली आणण्यात आले.

## 'उमेद मॉल' मुळे महिला बचत गटांचे आर्थिक सक्षमीकरण -जयकुमार गोरे

**मुंबई :** राज्यातील ग्रामीण महिला बचत गटांच्या उत्पादनांना स्थायी बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी ''उमेद मॉल'' (जिल्हा विक्री केंद्रे) उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला असून, त्याचा थेट फायदा महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणाला होणार आहे, असे प्रतिपादन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. या उपक्रमाअंतर्गत पहिल्या टप्प्यात १० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल्स उभारण्यात येणार असून त्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

'उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान'' अंतर्गत हे मॉल कार्यान्वित होतील. हे अभियान ग्रामीण भागातील विशेषतः महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. या मॉल्समुळे बचत गटांनी तयार केलेल्या हस्तकला, खाद्यपदार्थ, वस्त्रे व इतर उत्पादनांसाठी स्थानिक बाजारपेठ मिळणार आहे.

# शिवणीमध्ये महसूल सप्ताहाचा उत्साहपूर्ण शुभारंभ: नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ४ :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाच्या निर्देशानुसार, कुंभारी येथील ग्रामपंचायत कार्यालयात १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत आयोजित महसूल सप्ताहाचा ४ ऑगष्ट २०२५ रोजी मोठ्या उत्साहात शुभारंभ झाला. महसूल प्रशासनाशी संबंधित विविध योजना व सेवांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत पोहोचवणे, तसेच विभागाचे कामकाज अधिक लोकाभिमुख करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. याप्रसंगी शिबीराला नायब तहसीलदार महेंद्र आत्राम यांनी भेट दिली. त्यांनी उत्कृष्ट आयोजनाबद्दल सर्वांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मुकेश मुरुमकार, माजी नगरसेवक अनिल मुरूमकार, प्रवीण जगताप, मंडळ अधिकारी संजय तायडे, उपकृषी अधिकारी नागेश खराटे, ग्राम महसूल अधिकारी अमोल बहाकर व सागर कारवा, सहाय्यक कृषी अधिकारी एस. एस. कोकाटे, ए. आर. सदार, आर. पी. पातोंड, ग्रामपंचायत अधिकारी ज्योती आठवले, सागर वानखडे, सिद्धार्थ वानखडे, प्रतिभा जायले, पुनम घायवट, आर. पी. मेटांगे, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद मुरुमकार, सिद्धार्थ वाहुरवाघ, मंगल वानखडे, सेवानंद क्षीरसागर, वैभव सोनेकार, किशोर चक्रे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याप्रसंगी, आयोजकांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. मंडळ अधिकारी संजय तायडे यांनी उपस्थितांना महसूल विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले आणि सर्वांचे आभार मानून महसूल सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन केले. अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मुकेश मुरुमकार यांनी या उपक्रमाचे कौतुक करून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ७/१२ उतारा, ८ अ, फेरफार नोंदी, जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र (डोमासाईल), नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र यांसारख्या विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी, कृषी विभाग, आरोग्य विभाग, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका, सेतू संचालक तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**इशारा** | अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाने दिले सीईओंना निवेदन

# शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवरील कारवाईचा निषेध

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ४ :** मागील तीन-चार महिन्यांपासून नागपूर विभागातील बोगस शालार्थ आयडी प्रकरणात काही अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोणतीही चौकशी न करता अत्यंत अपमानास्पदरित्या करण्यात आलेल्या अटकेचा महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ संलग्न अखिल महाराष्ट्र शिक्षण सेवा राजपत्रित अधिकारी संघाच्या सर्व अधिकाऱ्यांनी निषेध करीत शुक्रवारी (ता. एक) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांना निवेदन दिले.

नागपूर विभागात बोगस शालार्थ आयडी प्रकरण गाजत आहे. या प्रकरणात बोगस शालार्थ आयडी देण्याचा ज्यांनी खरोखरच गुन्हा केला असेल, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी संघटनेची मागणी आहे. मात्र, या प्रकरणात चोर सोडून संन्याशाला फाशी या म्हणी प्रमाणे तपास यंत्रणा काम करत आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या आधिकाऱ्यांना कायद्याचे संरक्षण नाकारून विनाचौकशी अटक झाल्याने शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांमध्ये दहशत व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे अधिकारी प्रचंड ताण-तणावाखाली काम करत आहे.

शिक्षण विभागातील अधिकारी हे राजपत्रित अधिकारी असून ते महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसारव प्रामाणिकपणे काम करीत आहेत. ते गुन्हेगार नसून कदाचित काम करत असतांना काही त्रुटी, चुका होऊ शकतात. त्यासाठी विभागांतर्गत चौकशीची व कारवाईची व्यवस्था कार्यरत आहे. अधिकारी यांच्या कामात अनियमितता आढळल्यास महाराष्ट्र नागरी सेवा नियमाप्रमाणे शिक्षेची तरतूद आहे.

तथापि छोट्या-छोट्या प्रशासकीय कारणांवरून शिक्षण विभागातीन अधिकाऱ्यांची शासनाची परवानगी नसतांना विना चौकशी अटकसत्र सुरू असुन याचा निषेध म्हणुन जोपर्यंत शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना शिक्षण विभागाच्या परवानगी शिवाय विनाचौकशी अटकेपासून संरक्षणाची लेखी हमी शासनाकडून मिळत नाही, तोपर्यंत राज्यातील शिक्षण सेवेतील सर्व अधिकाऱ्यांनी सामुहिक रजा आंदोलन केले. यापुढे या प्रकरणाची एसआयटी चौकशी पूर्ण होईपर्यंत शिक्षक-शिक्षकेतर वेतन देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्यात येणार नाही, अतिरिक्त व्हीसी आणि सुट्टीच्या दिवशी अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्यात यावा या सर्व मागण्यांवर लेखी आश्वासन द्यावे, अन्यथा शुक्रवार (ता.८) पासून राज्यभर सर्व अधिकारी सामुहिक रजा आंदोलन करणार असल्याचा इशारा संघटनेने दिला आहे. यावेळी संघटनेचे पदाधिकारी तथा प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार, माध्यमिक शिक्षणाधिकारी अरविंद मोहरे, योजना शिक्षणाधिकारी संजय झापे, माध्यमिक वेतन पथक अधीक्षक अनिल कोल्हे, उपशिक्षणाधिकारी कैलास राठोड, वेतन पथक अधिक्षक प्राथमिक राजेश तेलमोरे, सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, शालेय पोषण आहार अधिक्षक आदींनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन दिले.

## महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन प्रवेशिका उपलब्ध

**मुंबई:** शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ३ नोव्हेंबर, २०२५ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून १ ते ३१ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे श्री.चवरे यांनी नमूद केले आहे.२२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२५ पासून विविध १० केंद्रांवर तर ६४ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिमफेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२५ पासून आयोजित करण्यात येणार आहे.

# पाच राज्यांमध्ये पूरस्थिती गंभीर

**नवी दिल्ली : दि.४ वृत्तसंस्था**



उत्तर भारतात मान्सूनने रौद्र रूप धारण केले असून, उत्तर प्रदेश आणि बिहारसह पाच राज्यांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. उत्तर प्रदेशातील अनेक जिल्ह्यांमध्ये पुराचा धोका निर्माण झाला असून, वाराणसी आणि प्रयागराजमध्ये गंगेच्या पाण्याने धोक्याची पातळी ओलांडली आहे. बिहार, मध्य प्रदेश, राजस्थान आणि हिमाचल प्रदेशातही मुसळधार पाऊस झाला आहे.

उत्तर प्रदेशातील १२ जिल्ह्यांना पुराचा वेढा पडला असून, यामध्ये प्रयागराज आणि काशी (वाराणसी) या प्रमुख शहरांचा समावेश आहे. वाराणसीमध्ये रविवारी सकाळी ६ वाजता गंगेची पाणीपातळी ओलांडली आहे. वाराणसी आणि प्रयागराजमध्ये गंगेचे पाणी एक लाखांहून अधिक घरांमध्ये शिरले आहे. प्रयागराजमध्ये यमुना नदीलाही पूर आला असून, येथील १० हजारांहून अधिक घरांमध्ये पाणी साचले आहे. काशीचे प्रसिद्ध ८४ घाट पूर्णपणे गंगेच्या पाण्यात बुडाले आहेत. गंगा, यमुना आणि बेतवा नद्या दुथडी भरून वाहत आहेत. बिहारमध्येही पावसाचा जोर कायम आहे.हिमाचल प्रदेशची राजधानी सिमलामध्ये एक दुर्दैवी घटना घडली. दरड हटवणाऱ्या जेसीबीवर डोंगरावरून मोठा दगड कोसळला. यात जेसीबी दरीत कोसळून चालकाचा मृत्यू झाला. राजस्थानमधील बिकानेरच्या नोखा येथे दोन घरे कोसळली, तर खबरदारी म्हणून आसपासची ७ घरे रिकामी केली आहेत. दोन्ही राज्यांत पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे.

## महत्त्वाचे

### अभिषेक बॅनर्जी यांची लोकसभेतील नेतेपदी नियुक्ती



**कोलकाता :** तृणमूल काँग्रेसने सोमवारी लोकसभेतील पक्षाचे नवे नेते म्हणून राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांची नियुक्ती केली. पक्षाच्या सूत्रांनुसार, ज्येष्ठ खासदार सुदीप बंदोपाध्याय यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांची जागा अभिषेक बॅनर्जी यांनी घेतली आहे. आरोग्याच्या कारणास्तव सुदीप बंदोपाध्याय यांना या जबाबदारीतून मुक्त करण्यात आले आहे.डायमंड हार्बरचे तीन वेळा खासदार राहिलेले अभिषेक बॅनर्जी हे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचे भाचे आहेत. पक्षप्रमुख ममता बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या तृणमूल काँग्रेसच्या खासदारांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, ज्यामध्ये लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सभागृहांचे खासदार सहभागी होते.

### शास्त्रज्ञ आकाश यादव यांना मोठा दिलासा !



**नैनीताल :** पत्नीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी दोषी आढळलेल्या लस शास्त्रज्ञ आकाश यादव यांना उत्तराखंड उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने त्यांची पाच वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा स्थगित केली आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) खरगपूर येथून पीएचडी करणारे आकाश यादव यांना दिलासा देताना न्यायमूर्ती रवींद्र मैथानी यांच्या एकल खंडपीठाने म्हटले आहे की, व्यापक जनहितासाठी शास्त्रज्ञांची शिक्षा स्थगित करण्यात आली आहे.न्यायालयाला असे आढळून आले की शास्त्रज्ञ आकाश यादव लसीच्या संशोधन आणि विकासात सक्रियपणे गुंतलेले आहेत आणि शिक्षेमुळे त्यांचे काम थांबले आहे. न्यायालयाने त्यांच्या आदेशात असेही म्हटले आहे .

### अमित शाह मोडणार देशाच्या गृहमंत्र्यांचा रेकॉर्ड!



**वी दिल्ली :**देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्यासाठी ५ ऑगस्ट २०२५ हा दिवस खास असणार आहे. कारण भाजपचेच नेते लालकृष्ण आडवाणी यांचा रेकॉर्ड अमित शाह मोडणार आहेत. देशाच्या गृहमंत्रिपदी सर्वाधिक काळ राहणारे ते पहिले व्यक्ती बनणार आहेत.सर्वाधिक काळ केंद्रीय गृहमंत्री म्हणून राहण्याच्या त्यांच्या या गोष्टीबरोबरच दिल्ली आणखी एका विषयाची चर्चा सुरू आहे. ही चर्चा सुरू झाली ती अमित शाह यांनी आधी पंतप्रधाननरेंद्र मोदी आणि नंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या भेटीमुळे. केंद्र सरकार जम्मू काश्मीरबद्दल आणखी एक निर्णय घेण्याची अंदाज दिल्लीतील राजकीय वर्तुळात व्यक्त केले जात आहेत. सर्वाधिक काळ देशाच्या गृहमंत्री म्हणून राहण्याचा विक्रम लालकृष्ण आडवाणी यांच्या नावे आहे. लालकृष्ण आडवाणी ६ वर्ष ६४ दिवस देशाचे गृहमंत्री होते. त्यानंतर अमित शाह यांचे नाव सर्वात वरती असणार आहे. ५ ऑगस्ट रोजी अमित शाह आडवाणींच्या नावे असणारा विक्रम मोडतील.

गृहमंत्रीपदावर सर्वात कमी राहिलेल्या व्यक्ती इंदिरा गांधी आहेत.

## धर्मांतर आणि लग्नाला नकार दिल्याने महिलेची हत्या

**नवी दिल्ली : दि.४ वृत्तसंस्था**

एका ३५ वर्षीय महिलेची गळा चिरुन आणि चाकूचे वार करुन हत्या करण्यात आली. या महिलेने लग्नाला नकार दिला होता आणि इस्लाम धर्मात धर्मांतर करुन घ्यायलाही नकार दिला होता त्यामुळे ही हत्या करण्यात आली. मध्य प्रदेशातील नवारा भागातली ही धक्कादायक घटना आहे. भाग्यश्री असं या महिलेचं नाव आहे. तिच्यावर शेख रईसने हल्ला केला आणि तिची गळा चिरुन आणि चाकूचे वार करुन तिची हत्या केली. या प्रकरणी शेख रईसला काही तासांमध्ये अटक करण्यात आली. पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपास सुरु असल्याची माहिती दिली आहे.भाग्यश्रीची बहीण सुभद्राने सांगितलं की रईस शेखने तिला केस पकडून ओढलं. त्यानंतर तिला मारहाण केली, तिला शारिरीक त्रास दिला. धर्मांतर कर आणि लग्नाला होकार दे असं सांगत होता. गेल्या काही दिवसांपासून तो हे करत होता. माझ्या बहिणीने लग्नाला आणि धर्मांतराला नकार दिला त्यामुळे रईसने तिची हत्या केली.

भाग्यश्रीचा गळा रईस शेखने चिरला आणि तिच्यावर वार केले त्यानंतर ती रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तिला रुग्णालयात नेण्यात आलं. पण डॉक्टरांनी तिला मृत घोषित केलं.

अतिरिक्त पोलीस अधीक्षक अंतर सिंग यांनी असं सांगितलं की या प्रकरणी आम्ही आरोपीला अटक केली आहे. त्याची चौकशी आम्ही करत आहोत. त्याच्यावर हत्या, मारहाण आणि धर्मांतराचा दबाव या संबंधीची कलमं लावण्यात आली आहेत. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे. या घटनेनंतर नवारा भागामध्ये हिंदू संघटनांनी आंदोलन केलं आहे.

## युक्रेन-रशिया युद्धात महिलांचा लक्षणीय सहभाग



**नवी दिल्ली : दि.४ वृत्तसंस्था**

मागीत तीन-साडेतीन वर्षांपासून रशिया- युक्रेन युद्ध सुरू आहे. या युद्धाच्या मैदानातून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. युक्रेनियन सैन्यात महिलांचा सहभाग झपाट्याने वाढत आहे. गेल्या साडेतीन वर्षांत युक्रेनियन सैन्यात महिला सैनिकांची संख्या एक लाखांवर पोहचली आहे. सध्या युक्रेनच्या सशस्त्र दलात एकूण १० लाखांहून अधिक सैनिक कार्यरत आहेत.सशस्त्र दल सल्लागार ओक्साना ग्रिगोरीएवा यांनी दिलेल्या माहितीनुसार, युक्रेनच्या सैन्यदलात सध्यासाडेपाच हजार महिला थेट आघाडीवर रशियन सैन्याशी लढत आहेत. या महिला ड्रोन ऑपरेशनपासून ते तोफेच्या संचालनापर्यंत सर्व जबाबदाऱ्या मोठ्या शिताफीने पार पाडत आहेत. इतकेच नव्हे तर, वैद्यकीय मदत, युद्धसामग्री वाहतूक आदी सहाय्यक जबाबदाऱ्यांमध्येती त्या मोलाची भूमिका बजावत आहेत.२०२२ मध्ये रशियाने युक्रेनविरोधात युद्धाचे रणशिंग फुंकले. रशियन आक्रमण होण्यापूर्वी युक्रेनियन सैन्यात महिलांचे प्रमाण सुमारे १५ टक्के होते. मात्र आता त्यात दुपटीने वाढ झाली आहे. लष्करी शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सध्या २० टक्के विद्यार्थीनी दाखल आहेत, असे ग्रिगोरीएवा यांनी सांगितले.

## भूकंपाच्या तीव्र धक्क्यांनी हादरला म्यानमार

**नेपीडॉ :दि.४ वृत्तसंस्था**

भारताचा शेजारील देश म्यानमारमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के जाणवले आहेत. या भूकंपाची तीव्रता ४.२ रिश्टर स्केल इतकी होती. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, सकाळी पहाटे (भारतीय वेळेनुसार) २.४२ वाजता हा भूकंप झाला. याचे केंद्र पृथ्वीच्या पृष्ठभागापासून १० किलोमीटर खोल होते, यामुळे भूकंपाचे जोरदार झटके जाणवले. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरु याची माहिती शेअर केली. यामध्ये म्यानमारमध्ये ४.२ तीव्रतेचा भूकंप झाल्याचे सांगण्यात आले. या भूकंपाचे केंद्रबिंदू २०.८८ उत्तर अक्षांश आणि ९५.८२ पूर्व रेखांशावर होते.सुदैवाने आतापर्यंत कोणत्याही जीवितहानीची किंवा वित्तहानी झालेली नाही. परंतु ()ने लोकांना सतर्क राहण्याचा आणि खबरदारी बाळगण्याचा इशारा जारी केला आहे.म्यानामार हा भूकंपप्रवण आणि नैसर्गिक आपत्ती क्षेत्र आहे. या भागात भूंकापचे झटके, लांब किनारपट्टीमुळे त्सुनामीचा धोका सतत येत असते. म्यानमारचा भाग चार टेक्टोनिक प्लेट्सच्या म्हणजेच भारतीय, युरेशियन, सुंडा आणि बर्मा प्लेट्सच्या जंक्शनवर स्थित आहे.

## येमेनमध्ये भीषण सुमद्री दुर्घटना

### किनाऱ्याजवळ बोट उलटल्याने ६० हून अधिक लोकांचा मृत्यू



❑ साना : येमेनच्या () किनाऱ्याजवळ रविवारी (०३ ऑगस्ट) एक भीषण दुर्घटना घडली आहे. एक बोट उलटल्याने ६८ लोकांचा मृत्यू झाला. संयुक्त राष्ट्रांच्या स्थलांतर संस्थेने या घटनेची माहिती दिली. संस्थेने दिलेल्या माहितीनुसार, बोटीतील ६८ आफ्रिकन स्थलांतरांनी जीव गमवला असून ७४ लोक अजूनही बेपत्ता आहे. घटनेची माहिती मिळताच आपत्कालीन सेवांनी घटनास्थळी धाव घेतली आणि तातडीने बचाव कार्य सुरु केले.

❑ सध्या बेपत्ता झालेल्या लोकांचा शोध घेणे सुरु असून आपत्कालीन सेवांना १२ जणांना वाचवण्या यश आले आहे. या अपघातामध्ये ५४ स्थलांतरितांचे मृतदेह तरंगताना आढळले. यातील १४ मृतदेह येमेनच्या दक्षिण किनाऱ्यावरील अब्यान प्रांताची राजधानी असलेल्या झिंजीबारमधील रुग्णालायता नेण्यात आले आहेत. तसेच मृतांचा आकडा वाढण्याची भिती व्यक्त केली जात आहे.आसोसिएटेड प्रेसने दिलेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे दक्षिण येमेनच्या अब्यान प्रांताजवळ एडेन आखातात ही दुर्घटना घडली.

❑ १५४ इथिओपियन स्थलांतरितांना घेऊन जाणारी बोट अचानक बुडाली. आंतरराष्ट्रीय स्थलांतर संघटनेचे () येमेन प्रमुख अब्दुसत्तोर असोव यांनी ही माहिती ला दिली. त्यांनी सांगितले की, येमेनच्या किनाऱ्यावर अशा दुर्घटना काही नवीन नाही. यापूर्वी देखील अशा अनेक घटना घडल्या आहे.गेल्या अनेक दशकांपासून येमेनमध्ये गृहयुद्ध सुरु आहे. यामुळे पूर्व आफ्रिका आणि हॉर्न ऑफ आफ्रिकेतील स्थालांतरितांसाठी हा देश धोकादायक बनत आहे.

❑ इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर मायग्रेशन ()च्या माहितीनुसार, गेल्या महिन्यांत येमेनच्या किनारपट्टीवर अनेक बोट अपघात घडले. यामध्ये शेकडो स्थलांतरित मृत्यूमुखी पडले आहेत किंवा बेपत्ता झाले आहे. मार्च २०२५ मध्ये देखील चार बोटी बुडाल्याने १८६ जण बेपत्ता झाले होते. च्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये ६०,००० पेक्षा जास्त मृत पावलेल्या किंवा बेपत्ता झालेल्या लोकांची प्रकरणे नोंदवण्यात आली आहेत. तर २०२३ मद्ये ९७,२०० प्रकरणे नोंदवली आहेत.

## रशियाच्या ‘सॅटन २’ महाविनाशकारी मिसाईलमुळे जग चिंतेत

**मॉस्को :दि.४ वृत्तसंस्था**



रशियाने विकसित केलेले -२८ आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र , जे ‘सॅटन २’ या नाटोने दिलेल्या टोपणनावानेही ओळखले जाते, हे सध्या जगातील सर्वात घातक क्षेपणास्त्रांपैकी एक मानले जाते. १८००० किमी इतकी प्रचंड रेंज असलेले हे क्षेपणास्त्र उत्तर व दक्षिण ध्रुवातून देखील लक्ष्यांवर हल्ला करू शकते.रशियाचा अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या अणु धोरणामधील हा एक प्रमुख भाग मानला जातो. अमेरिकेने अलीकडे रशियन सीमेजवळ दोन अणुबोटी तैनात केल्यानंतर, रशियाने आपली सामरिक ताकद दाखवण्याच्या उद्देशाने वर पुन्हा लक्ष केंद्रीत केलं आहे.सॅटन-२८ ही अमेरिकेच्या (१३००० किमी) आणि चीनच्या -४१ (१२००० १५००० किमी) पेक्षा केवळ जास्त श्रेणीचेच नव्हे, तर अधिक पेलोड क्षमतेचे क्षेपणास्त्र आहे. सॅटन च्या तैनातीमुळे अमेरिका आणि नाटोसाठी हा थेट धोका मानला जात आहे. ध्रुवांवरून हल्ला करण्याचे सामर्थ्य आणि हायपरसॉनिक स्पीड ही वैशिष्ट्ये पारंपरिक क्षेपणास्त्र संरक्षण यंत्रणांना अपुरी ठरवू शकतात.

## शिक्षा — सौदी अरेबिया मध्ये एकाच दिवसांत तब्बल आठ जणांना फाशी

# सौदी अरेबियाने आवळला फाशीचा दोर

**रियाध : दि.४ वृत्तसंस्था**





❑ २०२३ मध्ये केवळ २ लोकांना ड्रग्ज प्रकरणामध्ये फाशीची शिक्षा मिळाली होती, परंतु यानंतर ड्रग्ज विरोधी मोहिमेमुळे या प्रकरणामध्ये ११७ जणांना शिक्षा मिळाली. तर २०२५ मध्ये १५४ लोकांना फाशी देण्यात आली आहे.परंतु सौदीर अरेबियाच्या या निर्णयावर मानवाधिकार संघटनांकडून टीका केली जात आहे.

एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. सौदी अरेबियाने एकाच दिवसात आठ जणांना मृत्यूदंडाची शिक्षा सुनावली आहे. यामुळे संपूर्ण जगभर खळबळ उडाली आहे. सौदीच्या राज्य वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, सौदी अरेबियाने ड्रग्ज तस्करीशी संबंधित प्रकरणामध्ये सात जणांना फाशीची शिक्षा दिली आहे. शिवाय शिक्षा देण्यात आलेले व्यक्ती सोमाली आणि इथियोपियाचे आहेत. तसेच एका व्यक्तीला आईच्या हत्येसाठी शिक्षा देण्यात आहे.सौदीच्या राज्य वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, देशाच्या नजरानच्या दक्षिणेकडच्या भागामध्ये चरस तस्करीच्या केल्याबद्दल चार सोमाली आणि तीन इथिओपियन नागरिकांना मृत्यूदंड देण्यात आला आहे. सर्वांना ड्रग्ज प्रकरणामध्ये दोषी ठरवण्यात आले आहे. एएफपीच्या मते, २०२५ मध्ये आतापर्यंत सौदीमध्ये २३० जणांना फाशी देण्यात आली आहे. यातील १५४ प्रकरणे ड्रग्जशी संबंधित आहे. यामध्ये सहभागी लोकांना मृत्यूदंड देण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षा २०२४ मध्ये ३३८ लोकांना मृत्यूदंडाची शिक्षा सौदी अरेबियाने सुनावली होती. परंतु यावेळी २०२५ जुलैपर्यंतच आकडा २३० पर्यंत पोहोचला असल्याने हा आकडा २०२४ पेक्षा अधिक वाढण्याची शक्यता आहे. २०२३ मध्ये सौदी अरेबियाने ड्रग्ज विरोधी मोहीम सुरु करण्यात आली होती. याअंतर्गत ही प्रकरणे आतापर्यंत समोर आली असून यातील सहभागी व्यक्तींना फाशीची शिक्षा देण्यात आली आहे.

२०२३ मध्ये सुरु झालेल्या या मोहिमेमुळे फाशीच्या शिक्षेची संख्या वाढत असल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे.

या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत अनेक लोकांना अटक करण्यात आली आहे. यापूर्वी २०१९ ते २०२२ पर्यंत ड्रग्ज प्रकरणांमध्ये फाशीवर बंदी होती.

## महादेवीचे उज्ज्वल भवितव्य, सुदृढ आरोग्यासाठी प्रार्थना करा : वनतारा



**जामनगर : दि.४ वृत्तसंस्था**

महादेवी हत्तिणीच्या उज्वल भवितव्य आणि सुदृढ आरोग्यासाठी प्रार्थना करा, असे आवाहन वनताराचे सीईओ विवान करणी यांनी नांदणीवासीयांसह समाज बांधवांना केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानेच आमच्या प्रकल्पात महादेवी आणण्यात आली आहे. आम्ही महादेवी हत्तिणीची कधीही मागणी केली नव्हती. याप्रकरणी ११ ऑगस्ट रोजी होणारी सुनावणी वनताराला बांधील असेल, असे वनताराचे सीईओ विवान करणी यांनी प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरच स्वतिश्री जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी संस्थान मठामधून जामनगर येथील वनतारा या पशुकल्याण संस्थेत महादेवी ऊर्फ माधुरी हत्तिणीचे स्थलांतर करण्यात आले आहे, असे करणी यांनी पत्रकात म्हटले आहे. महादेवी आजारी आहे. तिला उत्तम चांगल्या उपचारांची गरज आहे. तिच्या आरोग्याचे आणि दीर्घकालीन कल्याणाचे रक्षण करणे हाच वनताराचा मुख्य आणि मूळ हेतू आहे. आजारातून बरी करून तिला नैसर्गिक आयुष्य लाभावे, यासाठी महादेवीचा सांभाळ, पालन करण्याची जबाबदारी न्यायालयाने आमच्यावर सोपवली आहे. आम्ही महादेवीला आमच्याकडे द्या, अशी कधीही मागणी केली नव्हती, असेही वनतारा ने पत्रकात म्हटले आहे. जनतेच्या तीव्र भावनिक प्रतिसादाची आम्हाला पूर्ण जाणीव आहे आणि आमची त्याबाबत मनापासून सहानुभूती आहे. म्हणूनच, आम्ही जैन मठ व स्वामीजी यांच्यासोबत थेट संवाद सुरू केला आहे. शांततामयमार्गे महादेवी च्या कल्याणासोबतच समाजाच्या भावनांचादेखील सन्मान राखला जाईल. मात्र, महादेवीला प्राणी म्हणून स्वतंत्र आणि नैसर्गिक आयुष्य मिळाले पाहिजे. तिचे हक्क तिला मिळाले पाहिजेत, तिच्या चाहत्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, असे या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## नाव प्रज्वल; कारनामे मात्र काळे!

जनता दल (धर्मनिरपेक्ष) पक्षाचा माजी खासदार प्रज्वल रेवण्णा याला बंगळूरमधील विशेष न्यायालयाने बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. यामुळे अतिमहत्त्वाच्या व्यक्तीही कायद्याच्या चौकटीबाहेर नाहीत, हेच पुन्हा अधोरेखित झाले आहे. प्रज्वल हा माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा नातू आणि माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच. डी. कुमारस्वामी यांचा पुतण्या असून, त्याला पक्षातून निलंबित केले आहे. बंगळूरमधील विशेष न्यायालयाचे न्यायाधीश संतोष भट यांनी ३४ वर्षीय प्रज्वलला जन्मठेप सुनावतानाच १० लाख रुपयांचा दंडही ठोठावला. त्याच्या विरोधात लैंगिक छळ आणि बलात्काराचे चार खटले दाखल केले असून, त्यापैकी एका खटल्यात विशेष न्यायालयाने त्याला दोषी ठरविले होते. कर्नाटकमधील हासन जिल्ह्यातील होलेनारसीपुरा येथे देवेगौडा यांच्या कुटुंबीयांचे फार्म हाऊस आहे. तिथे काम करणाऱ्या एका ४८ वर्षीय महिलेने २०२१ मध्ये प्रज्वलने आपल्यावर दोनवेळा बलात्कार केल्याची, तसेच ते कृत्य मोबाईल फोनवर चित्रित केल्याची तक्रार दाखल केली होती. सरकारी पक्षाने त्याला जन्मठेपेचीच शिक्षा द्यावी, अशी मागणी केली होती, तर आपण कोणताही गुन्हा केलेला नाही, असा युक्तिवाद प्रज्वलच्या वतीने करण्यात आला. राजकारणात वेगाने भरभराट झाली, हीच केवळ चूक आहे, असे प्रज्वलच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले; मात्र त्याच्या राजकीय विकासाशी सामान्यांना काहीही देणेघेणे नाही. त्याने नीच कृत्य केले आहे. म्हणूनच त्याला जन्मठेप ठोठावली असून, हे योग्यच झाले. प्रज्वलने सातत्याने त्याच्याकडे काम करणाऱ्या स्त्रीच्या परिस्थितीचा व असाह्यतेचा लाभ उठवून तिच्यावर वारंवार अत्याचार केले. शिवाय या घटनेबद्दल कोणालाही सांगितल्यास व्हिडिओ लीक करण्याची धमकी दिली होती. मुळात त्याने पन्नासहून अधिक स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच त्याने शूट केलेल्या असंख्य आक्षेपार्ह व्हिडिओ क्लिप्स समाजमाध्यमांवर आलेल्या आहेत. एखाद्या स्त्रीवर वर्चस्व गाजविण्याच्या स्थितीत असता, तेव्हा त्याचा फायदा उठवून तिच्यावर अत्याचार केल्यास कायद्यातील ३७६-२ के हे कलम लागू होते. प्रज्वलवर ते लावले आहे. त्याची ही प्रकरणे बाहेर आल्यानंतर तो जर्मनीला पळाला होता. तेथून तो परतल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. निवडणुकांच्या अगोदरच त्याचे व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे अर्थातच लोकसभा निवडणुकीत त्याचा पराभव झाला. जनतेनेही त्याच्या पापाची त्याला सजा दिली. दि. २ मे २०२४ ला प्रज्वल विरुद्धच्या खटल्याची सुनावणी सुरू झाली. डिसेंबर २०२४ मध्ये आरोपपत्र सादर करण्यात आले. ११३ साक्षीदारांनी साक्ष दिली. दि. ३० एप्रिल २०२५ रोजी आरोप निश्चित करण्यात आले. साधारण सव्वा वर्षात सुनावणी पूर्ण होऊन प्रज्वलला शिक्षा दिली आहे. इतर अनेक प्रकरणांच्या मानाने या खटल्याचा वेगाने निपटारा केला आहे, हे अभिनंदनीय आहे. प्रज्वलच्या माजी वाहनचालकाने त्याच्या विरुद्ध साक्ष दिली. त्याच्या फोनमध्ये २८ फोटो आणि ४० ते ५० अश्लील व्हिडीओज पाहिले, अशी साक्ष त्याने दिली होती. त्याने घरी काम करणाऱ्या स्वयंपाकिणीवर आणि तिच्या मुलीवरही अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच जेडीएसच्या माजी जिल्हा पंचायत कार्यकर्त्याला मारहाण करणे, धमक्या देणे असेही गुन्हे त्याच्यावर दाखल आहेत. या खटल्यांची सुनावणी अद्याप व्हायची आहे. लोकशाही, धर्मनिरपेक्षता, उदारमतवाद, महिला विकास अशा विषयांवर लांबलचक भाषणे ठोकणाऱ्या देवेगौडा यांच्या घराण्यात प्रज्वलसारखा कुलदीपक वेगळेच प्रताप करीत होता. देवेगौडा व कुमारस्वामी यांना याची कल्पनाच नसेल, तर ते आश्चर्यकारक आहे. त्याचे वडील एच. डी. रेवण्णा हेही जेडीएसचे नेते असून, त्यांनी मंत्रिपद भूषविले आहे; मात्र गेल्या वर्षी एका तरुणीचे अपहरण केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. रेवण्णा यांचा दुसरा मुलगा म्हणजेच प्रज्वलचा भाऊ सूरज यालाही लैंगिक सतावणुकीच्या आरोपावरून गेल्या वर्षी पोलिसांनी अटक केली होती. आपल्याकडे सत्ता आहे म्हणून आपण काहीही केले, तरी ते खपून जाईल, असे नेत्यांना वाटत असते. महिलेचे शोषण केले, तरी ती 'ब्र'देखील काढू शकणार नाही, ही खात्री त्यामागे असते. 'असोसिएशन ऑफ डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स' आणि 'नॅशनल इलेक्शन वॉच' या संस्थांनी मिळून केलेल्या अभ्यासातून भयंकर वस्तुस्थिती पुढे आलेली आहे. देशातील १६ खासदार आणि १३५ आमदारांवर बलात्कार, विनयभंग, कौटुंबिक हिसाचार, वेश्या व्यवसायासाठी अल्पवयीन मुलींची खरेदी-विक्री असे गंभीर आरोप आहेत. भाजपच्या सर्वाधिक लोकप्रतिनिधींवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल असल्याचे या अहवालात म्हटले आहे. स्त्रियांवर अत्याचार करण्यात पश्चिम बंगालमधील सर्वाधिक लोकप्रतिनिधींचा समावेश आहे. महाराष्ट्रात १३ लोकप्रतिनिधींवर महिला अत्याचाराचे गुन्हे दाखल आहेत. कायदे बनवणारेच गुन्हेगार असतील, तर न्यायाची अपेक्षा कोणाकडून करायची, असा प्रश्न पडतो. मुळात महिला अत्याचाराचा गुन्हा दाखल असताना प्रज्वलसारख्या नेत्यांना विविध राजकीय पक्ष तिकीट देतातच कसे? डेरा सच्चा सौदाचा प्रमुख आणि बलात्काराचा दोषी गुरमित रामरहीम सिंग याला सतत निवडणुकींच्या वेळी पॅरोल मिळतो. दोन शिष्यांवर अत्याचार केल्याबद्दल तो २० वर्षाची शिक्षा भोगत आहे. अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी स्वयंघोषित संत आसारामबापूलाही जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. गेल्यावर्षी त्यालाही पॅरोल मिळाला होता. खरे तर, 'बेटी बटाओ, बेटी पढाओ' या घोषणेमुळे स्त्री-पुरुष विषमता कमी होऊ



## लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

### हंगामा



संसदेच्या अधिवेशनात
अकाली बरसतो पाऊस
नेते चर्चा हे करेचनात
का चालवतात ते हाऊस?

जनतेने निवडून दिलेले
हेच आहेत का खासदार
कामकाज असते नेमलेले
हे कसे वागतात धारदार?

जनता सर्व पाहत आहे
त्यांनी निवडून दिले आहे
उगाच करू नका हंगामे
देशाचा पैसा खर्च होत आहे

### ।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

ऐकूनी घे तुझ्या
अंतरीची हाक ।
ब्रम्हांडी नाहक
शोधू नये ।।

आसक्ती विरक्ती
खेळ मदारीचा ।
माकड मनाचा
उड्या मारी ।।

जगाच्या मायेला
तू भूलूनी जावे ।
आणि स्वीकारावे
वास्तवाला ।।

मनाला अशक्त
आसक्ती करते ।
विरक्ती करते
सशक्त हो ।।

# ऋतू श्रावणाचा आला – मनाचा गाभा झाला ओला...



**सप्तरंग**

डॉ. विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९



पावसाच्या थेंबांत मिसळलेली एक हुरहुर असते, मनात दाटून आलेली एखादी आठवण असते श्रावण जेव्हा ओंजळीत साठवतो त्या क्षणांना,

तेव्हा प्रेम कविता होतं निसर्गाच्या शब्दांत सांगितलेलं.... श्रावण नुसतं नाव जरी उच्चारलं तरी मृदगंध नाकात शिरतो, श्वासात भिनतो.

डोळ्यांसमोर हिरवे डोंगर .... डोंगर माथ्यावरून निथळणारे पाणी , ओसंडून वाहणारे धबधबे, पानाफुलांत भिजलेलं आकाश. आणि हृदयात मात्र, हलकेच उमटतो एक आवाज
''ती पुन्हा भेटेल का या पावसात...?
श्रावण म्हणजे ऋतू नाही तो म्हणजे आठवणींची पालखी, भावनांचं झुळझुळ झरणं, आणि मनाच्या दाराशी न सांगता येणाऱ्या भावना दररोज हलकेच टपकत राहणं. त्या दिवशी त्या क्षणाला श्रावण रिमझिम बरसता बरसता जोराने बरसायला लागला होता.

आम्ही दोघंही कॉलेजच्या परिसरात एका झाडाखाली थांबलो होतो.
ती तिच्या हाताने तिचे केस मोकळे करत होती. केसांना अलवारपणे झटकत केसांवरील चमचमणारे पाण्याचे मौक्तिक तुषार निथळत होते .... आणि पावसाच्या थेंबांत मिसळलेली ती केसांची ओल माझ्या मनात काहीतरी कालवाकालव करून गेली होती.

''हे बघ, पावसाचा गंध आहे का माझ्या केसात...?'' तिने सहजच विचारलं होतं. आणि माझं 'हो' ह्या उत्तराने तिच्या ओठांवर हलकसं हसू उमटलं. क्षणभर असं वाटलं की , त्या हसण्यात संपूर्ण श्रावण भरलेला आहे न सुकणारा, न विसरणारा.
आता दरवर्षी श्रावण येतो
पण ते झाड ओलसर सावलीसह, तिचा सुगंध, तिचं ते हास्य
फक्त आठवणीत उरलंय....
पावसाचे थेंब म्हणजे मनाच्या पारिजातकावर कोसळणारी तिची आठवण. झाडांच्या पानांवर नाचणारा पाऊस म्हणजे तिच्या बांगड्यांचा निनाद जो अजूनही कानात - मनात घुमतोय.
धुक्याने लपेटलेला डोंगर म्हणजे ती हसरी, पण अंत:र्यामी खोल; जिच्या कुशीत विसावायला मी सतत धावतोय पण पोहोचण्याआधीच ती धुक्यासारखी विरघळते. श्रावणात फुलणारी जास्वंद हे माझ्या मनात फुललेलं तिचं रूप तिच्या ओठांसारखं रसरशीत, आणि हळव्या स्पर्शात मिसळलेलं.. हरतालिका, नागपंचमी, गोकुळाष्टमी हे फक्त सण नव्हेत, ते प्रेमाच्या आळवणीचे दिवस असतात.
ती उपवास करत असे
''माझ्यासाठी...?'' मी विचारलं तर,
ती फक्त गालात हसत असे. त्या सणाच्या दिवशी ती झुल्यावर बसून हरतालिकेचं गाणं गुणगुणत असे
आणि माझ्या डोळ्यांसमोर तिच्या गळ्यातलं मंगळसूत्र नाजूकपणे चमकत राहायचं. आजही गोकुळाष्टमी येते,
पण आता कृष्णाच्या गोपिका फक्त पुराणात उरल्या आहेत खरं प्रेम आता धबधब्यासारखं कोसळतं पण जमिनीत नाही झिरपत एका दिवसाचं थेट सोशल मीडियावर साचतं....
झाडावर थबकलेले दोन थेंब,
जणू तुझ्या डोळ्यांतले शब्द.
झुळूक येता ओघळले अलगद,
तसंच गळालं तुझं 'नकु गं...' हसत...!

छत्री घेतलीस पण तुझं मन माझ्या खांद्यावर विसावलं होतं.
पावसात भीजताना त्या क्षणात,
स्वत:ला मी शोधलं होतं....
श्रावण गेला, पाऊस थांबला,
थेंब सुकले, झाडं शांत झाली
पण माझं मन अजूनही
तुझ्याच नजरेत पावसात न्हातंय....
शब्दांपलीकडचं जे काही आहे ना ते श्रावणात असतं.
श्रावण हा ऋतू नसून, तो आपल्या 'मूक भावना' व्यक्त करण्याचं एक निमित्त असतो.
पाउस जितका गहिरा होतो,
तितकंच आपल्या हृदयात काहीसं खोल खोल जातं कधीकधी वाटतं,
श्रावण हा पाऊस नाही तो एक पूर्वजन्माचं अपूर्ण प्रेम आहे
जे दरवर्षी पुन:र्जन्म घेतं निसर्गाच्या रूपात, आठवणींच्या ओलाव्यात,
आणि मनाच्या अंत:करणात.
श्रावण म्हणजे ओले शब्द, थबथबलेली नजर, अनुभवलेल्या आणि न अनुभवलेल्या प्रेमाच्या सीमा
तो एक ऋतू नसतो, तो एक भावस्थिती असतो. जेव्हा वाचणाऱ्याच्या मनात पावसाचा एखादा थेंब काळजाच्या खोल गहिऱ्यात पोहोचवेल तेव्हाच श्रावणाचं खरं सौंदर्य उलगडेल. शब्द सुटले, आठवणी थांबल्या, पाऊसही दूर गेला, तरी मनात तुझं हसणं अजूनही पावसासारखं पाझरतं श्रावण फक्त ऋतू नव्हे, तो एक साजरा होणारा क्षण आहे प्रेमाच्या, विरहाच्या, आणि न संपणाऱ्या ओलाव्याचा ....!

# सुविचारांचा जागर करणारे आत्मचरित्र : जागरण



**समीक्षण**

सुरेश मंत्री
मो. ९४०३६५०७२२

ज्येष्ठ लेखक, कविवर्य, वात्रटिकाकार श्री. भारत सातपुते यांचे जागरण हे आत्मचरित्र वाचनात आले. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत आकर्षक आणि बोलके आहे. आत्मचरित्राचा नायक म्हणजे स्वत: लेखक. त्याच्या जीवनातील बहुतांश काळ यात शब्दबद्ध केला जातो. कुठल्याही आत्मचरित्राची सुरूवात लेखकाच्या बालपणापासून होते. लेखकाचा अतीशय सामान्य कुटुंबात झालेला जन्म, हालाखीत गेलेले बालपण आणि शिक्षणासाठी केलेला संघर्ष पुस्तकाच्या पूर्वार्धात आहे. रस्त्यावर ओरडत चालले तर ''ते खायला घे'' म्हणून आईजवळ रडत बसायचे. आईकडे कुठले पैसे ? केसावर बंबई मिठाई मिळायची. आईने विंचरून न्हाणीच्या तुराटयांनी खचून ठेवलेले केस त्याला देऊन आमचे लाड पुरवायचे. दोन चार दिवसाला पुन्हा तो आला की पुन्हा आईजवळ हट्ट धरायचा, तवा आई चिडून म्हणायची, ''आता कुठून घेऊ, मेले केसही जास्त गळत नाहीत ?'' 'कान तुटलेली काटवट अन एका बाजुला पळी व दुस-या बाजूला उलथने असलेले आई बरीच वर्ष जपू जपू वापरीत होती. सांडस नसल्याने पदराने धरून चुलीवरले भगुने उतरून घ्यायची. एकाच परातीत दोघे दोघे जेवायचे कारण घरात दोन दोनच जरमनच्या पराती, वाटया, तांबे असायचे. त्यातला मोठा तांब्या तर हागणदारीलाही वापरायचे. पुन्हा राखेने घासून खंगाळून तोच तांब्या पाणी प्यायला घ्यायचे'. अशा आणि ब-याच प्रसंगातून लेखकाच्या बालपणीची हालाकीची परिस्थिती सचित्र उभी करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. शिक्षक म्हणून सेवा काळात विविध परीक्षेत घेतलेली कॉपी विरोधी भूमिका, प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम करताना विद्यार्थी हितासाठी घेतलेल्या कठोर भूमिका यातून निर्माण झालेले शत्रु व त्यामुळे आलेली अनेक संकटं यात चित्रीत करण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार लेखकांनी उघडपणे मांडला



आहे. ऊस तोड कामगारांसाठी शासनाने सुरू केलेल्या हंगामी वस्तीगृहाच्या चालकांनी राजकीय नेत्यांच्या आणि शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिका-यांच्या पाठींब्यामुळे केलेली कोटयावधी रूपयांच्या शासकीय निधीची लुट आणि लेखकाने हा भ्रष्टाचार रोखण्यासाठी केलेले प्रयत्न शिक्षण क्षेत्राचे वास्तव दाखवणारे आहेत. हल्ली पुरस्कार कसे मिळतात, याचे यथोचित वर्णन लेखकाने केले आहे. जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम करत असताना सुट्टी विना शाळा हा आगळा वेगळा उपक्रम आणि यातच सहकारी शिक्षिकेने दाखल केलेला खोटा विनयभंगाचा गुन्हा यामुळे प्रशासनाने या उपक्रमाकडे केलेले दुर्लक्ष, सेवानिवृतीनंतर पेन्शन साठी केलेला संघर्ष अशा अनेक प्रसंगातून लेखकाचा एकूण जीवनसंघर्ष व शिक्षकी पेशाशी असणारी प्रामाणिकता लक्षात घेण्याजोगी आहे.
आत्मचरित्र लिहिणे खूप कठिण असते. कुठल्याही आत्मचरित्रात लेखकाचे संपूर्ण जीवन कधीही येत नाही. शिवाय काही घटना-प्रसंगांचे विस्मरण झालेले असते. मात्र ज्या काही घटना आठवतात आणि महत्वाच्या वाटतात त्या अगदी बारीक सारीक तपशिलासह लेखकाने मांडल्या आहेत.
आपल्या आयुष्याकडे तटस्थपणे पाहणे अवघड असते. ते ज्याला जमते तो आपल्या वर्तनाचा वस्तुनिष्ठ विचार करू शकतो. परखड आत्मपरीक्षण करू शकतो आणि प्रामाणिकपणे आपल्या आयुष्याचा पट वाचकांसमोर उभा करू शकतो. जागरण या आत्मचरित्रा द्वारे गत जीवनाचा आलेख तटस्थपणे काढण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. तशी भारत सातपुते यांची आणि माझी फार ओळख नाही आणि प्रत्यक्ष कधी भेट ही नाही परंतु या आत्मचरित्र वाचनातून हा व्यक्ती आणि त्यांचे एकूण व्यक्तीतत्व कसे असेल याचे चित्रच माझ्यासमोर उभा टाकले. हे आत्मचरित्र लेखकाला वाचकांच्या नजरेत सामान्याकडून असामान्याकडे नेणारे आहे. आम्हा वाचकांना सुद्धा प्रेरणादायी आहे. जागरण हे आत्मचरित्र सुविचारांचा जागर करणारे आहे. मी काही अभिजात लेखक, साहित्यिक किंवा समीक्षक नाही. माझ्या परीक्षणाची भाषा अलंकारिक, साहित्यिक चौकटीत कदाचित बसणार नाही.
जवळपास ६० पुस्तके प्रकाशित असणाऱ्या श्री. भारत सातपुते यांच्या आत्मचरित्राचे परीक्षण करण्याइतका मी नक्कीच मोठा नाही. श्री. भारत सातपुते यांच्या जागरण या आत्मचरित्रास माझ्या खूप-खूप शुभेच्छा!

**पुस्तक : जागरण**
**लेखक : भारत सातपुते**
(८०८७६९५०००)
**प्रकाशक : मांजरा प्रकाशन, लातुर**
**पृष्ठे : ३०२ किंमत : ६०० रुपये**

# मानवतावादी लोकशाहीर : अण्णाभाऊ साठे



**प्रासंगिक**

डॉ. एस. एम. कानडजे
9422926387

साहित्यसम्राट आणि लोकशाहीर म्हणून ज्यांचा अत्यंत आदराने आणि अभिमानाने गौरव केला जातो, ते अण्णाभाऊ साठे समाजसुधारक आणि मानवी जीवनमूल्यांची मांडणी करणारे क्रांतिकारी साहित्यिक होते. शोषित, पीडित, कष्टकरी आणि उपेक्षितांच्या जीवनाचे त्यांनी आपल्या साहित्यातून आवेशपूर्ण चित्रण केले. व्यवस्थेच्या विरोधात आत्मसन्मानासाठी संघर्ष करणाऱ्या व्यक्तींचा त्यांनी सदैव पुरस्कार केला. त्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांचे फार मोठे योगदान होते. अवघ्या एकोणपन्नास वर्षांच्या आयुष्यात ह्या परिवर्तनवादी प्रबोधनकार लोककवीने केलेले कार्य लोकविलक्षण आणि अनन्यसाधारण होते, यात शंका नाही.

अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या तरूणपणात हमाल, नोकर, मजूर, घरगडी, कामगार, डोअर कीपर, तमाशातला झीलकरी आणि सोंगाड्या अशा अनेक भूमिका वठविल्या. त्यातूनच पुढे कार्यकर्ता, गायक, वक्ता, पत्रकार, नेता, कलावंत, लेखक, शाहीर अशा विविध नात्यांनी कार्य करीत करीत ते महाराष्ट्राचे नामवंत शाहीर आणि सुप्रसिद्ध लेखक म्हणून नावारूपाला आले. पण असे होऊनही ते प्रस्थापित झाले नाहीत. त्यांना आयुष्यभर दारिद्र्य आणि गृहकलह, विश्वासघात आणि फसवणूक, उपेक्षा आणि अवमान, मनस्ताप आणि आजार यांना तोंड द्यावे लागले. किरकोळ कारणांवरून कलापथकांत होणारे मतभेद, नाट्य-चित्रपट क्षेत्रांतील कलावंतांचा अप्रामाणिकपणा, साहित्य क्षेत्राने केलेली उपेक्षा, कम्युनिस्ट पक्षाचे विघटन आणि पुरोगामी चळवळींची पीछेहाट यामुळे ते पुढे एकाकी, पोरके, उदासीन झाले आणि त्यातच त्यांचा दु:खद अंत झाला.

अण्णा भाऊ साठे यांनी विविध वाङ्मयप्रकार चांगल्या प्रकारे हाताळले. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, लावणी, पोवाडा, पटकथा आणि लोकनाट्य अशी विविधतेने नटलेली साहित्य निर्मिती केली. त्यांची साहित्यसंपदा विपुल, भरघोस आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांचे साहित्य लोकप्रिय आणि पुरोगामी, रंजक तसेच उद्बोधक आहे. त्यात श्रमाचा महिमा आहे, घामाचे मोल आहे, शोषण-अन्यायाची चीड आहे, नीतिमूल्यांचे समर्थन आहे, स्वानुभवांचे अधिष्ठान आहे, आत्मप्रचीतीचे बळ आहे आणि म्हणूनच ते अस्सल आणि बावनकशी आहे. अण्णाभाऊंचे वैयक्तिक जीवन, लौकिक कार्य, त्यांची वाङ्मयनिर्मिती आणि राजकीय-सामाजिक-आर्थिक विचारसरणी यात एक आंतरिक सुसंगती होती. ते जनसामान्यांच्या जीवनाचे यथार्थ चित्रण करणारे जीवनवादी साहित्यिक होते. ''मी जे जीवन जगतो, पाहतो, अनुभवतो, तेच मी लिहितो. मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही.'' ही त्यांची भूमिका होती.

अण्णाभाऊ साठे हे आधी शाहीर आणि नंतर कथाकार, कादंबरीकार होते. 'मराठी शाहिरी काव्याचा सरताज' असा त्यांचा गौरवपूर्वक उल्लेख केला जातो. महाराष्ट्रात शाहिरांची आणि त्यांच्या शाहिरी काव्याची एक समृद्ध आणि गौरवशाली परंपरा आहे. त्या परंपरेमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे प्रेरणादायी कार्य लक्ष वेधून घेणारे आहे. शाहीर हा मुळातच कृतिशील आणि संघर्षशील असतो. त्याची रचना सहेतूक आणि ओजस्वी असते. तो लोकरंजनातून लोकशिक्षण, गुणगौरवातून प्रबोधन आणि नाट्य-विनोदातून जनजागृती करीत असतो. अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरी काव्याने आणि कौशल्याने हे कार्य अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांनी पारंपरिक तमाशाला आधुनिक लोकनाट्याचे रूप बहाल केले. लोकांच्या जिव्हाळ्याच्या समस्या, चटकदार संवाद, खुसखुशीत हास्यविनोद, चमत्कृतिपूर्ण युक्तिवाद, समर्पक हजरजबाबीपणा, राजकीय नेत्यांच्या अपप्रवृत्तींचा उपहास इत्यादी वैशिष्ट्यांमुळे त्यांची लोकनाट्ये विलक्षण लोकप्रिय झाली.



अण्णाभाऊंच्या कथांची पंधरा पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. त्यांच्या कथा प्रामुख्याने घटनाप्रधान असून त्या ग्रामीण भागातील दारिद्र्याने पीडलेल्या, महानगरांच्या झोपडपट्टीत जगणाऱ्या व्यक्तींचे जिवंत चित्रण करणाऱ्या आहेत. त्यांच्या कथांतील पात्रे लढाऊ वृत्तीची आहेत. त्यांचा सातत्याने जगण्यासाठी संघर्ष सुरू असतो. 'जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांची कथा' असे आचार्य अत्र्यांनी त्यांच्या कथेचे वर्णन केले आहे. ही पात्रे गरीब आणि ग्रामीण आहेत, दलित आणि मागासलेली आहेत, पोटासाठी वणवण भटकणारी आहेत. पण भूक-उपासमारीने गांजलेली-पीडलेली ही माणसे दुबळी नाहीत, त्यांची जीवनेच्छा जबर आहे. म्हणूनच अण्णाभाऊंची पात्रे आशावादी, कष्टाळू आणि संघर्षशील आहेत. ती दारिद्र्याने पोळलेली आहेत पण लाचार नाहीत, पोट जाळण्यासाठी हाल-अपेष्टा भोगणारी आहेत पण बेईमान नाहीत. जगण्यासाठी त्यांचा अटीतटीचा संघर्ष सुरू आहे. ती गरीब, ग्रामीण, मागासलेली, भटकी आणि दलित असली तरी ती झुंजार, साहसी, चारित्र्यवान आहेत. त्यांचा जीवनसंघर्ष रेखाटणे हेच त्यांच्या कथेचे महत्त्वाचे बलस्थान आहे.
अण्णाभाऊंनी जवळपास ३५ कादंबऱ्या लिहिल्या. ग्रामीण, दलित, पीडित, शोषित, कष्टकरी, कामगार आणि भटके, संशयित गुन्हेगार यांच्या जीवनावर त्यांनी कादंबरीलेखन केले. 'फकिरा', 'वारणेचा वाघ', 'वैजयंता', 'चित्रा' या त्यांच्या काही गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले असून त्या अनेक भाषांत अनुवादितही झाल्या आहेत. गरीब शेतमजूर, दुबळा शेतकरी, शहरातील हमाल, वेश्या, दरोडेखोर यांच्या जीवनावर त्यांनी या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ही माणसे शोषित-पीडित आणि संशयित-अपमानित आहेत. त्यांच्या वाट्याला आलेले लाचार-लाजिरवाणे जिणे हे त्यांच्यावर लादले गेले आहे. विद्यमान आर्थिक्-सामाजिक परिस्थितीत त्यांना तसे जगणे भाग पाडले गेले आहे. पण त्यांच्यातील माणुसकी, स्वाभिमान, नैतिकता आणि जीवनासक्ती अण्णाभाऊंनी आपल्या कथालेखनातून ठसठशीतपणे मांडली आहे.

अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांतील पात्रे श्रीमंतांवर दरोडा घालणारी आहे पण त्या दरोड्यातून मिळणारी संपत्ती गरीबांना मोफत वाटणारी आहेत. ती खुनी-गुन्हेगार असतील पण स्त्रीच्या चारित्र्याचा आदर करणारी आहेत, दीन-दुबळ्यांचा कैवार घेणारी आहेत. गरिबांचा कैवार घेऊन लढणाऱ्या माणसांविषयी त्यांच्या मनात अपरंपार प्रेम होते. त्यांच्या या मनोभूमिकेचा आविष्कार 'फकिरा'या त्यांच्या अत्यंत लोकप्रिय कादंबरीत पाहायला मिळतो. 'वारणेच्या खोऱ्यात' ही १९४२ च्या ऑगस्ट क्रांतीच्या लढ्यावर आधारलेली कादंबरी आहे. 'चित्रा' या कादंबरीत मुंबईतील वेश्याव्यवसायाचे आणि त्यातील ताणतणावांचे चित्रण आहे. 'वैजयंता' या कादंबरीत तमाशातील उपेक्षित कलावंतांच्या जीवनाचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील घटनाचित्रणे आणि प्रसंगवर्णने, व्यक्तिदर्शने आणि भाष्य-निवेदने अत्यंत प्रत्ययकारक असून ती विलक्षण वाचनीय आहेत. अण्णाभाऊंच्या कथा-कादंबऱ्या लोकमानसाचा उत्कट आविष्कार करणाऱ्या असून जनमासान्यांच्या हृदयाचा ठाव घेणाऱ्या आहेत. कारण जनसामान्यांना त्यात आपल्या जीवनाचे प्रतिबिंब पाहता आले.

अण्णाभाऊंचा पिंड अन्यायाविरूद्ध लढणाऱ्या झुंजार कार्यकर्त्याचा होता. ते फारसे शिकलेलेही नव्हते. पण समाजाच्या मुक्त विद्यापीठात त्यांनी माणुसकीची शिकवण आणि आत्मसन्मानाची पदवी संपादन केली होती. मानवता, स्वाभिमान, स्वातंत्र्य, समानता आणि श्रमनिष्ठा या जीवनमूल्यांवर त्यांची अनन्यसाधारण निष्ठा होती. म्हणून अज्ञान आणि दारिद्र्य, शोषण आणि गुलामगिरी, जुलूम आणि जबरदस्ती यांची त्यांना मनस्वी चीड होती. विषमता, अन्याय, भेदभाव आणि अत्याचार त्यांना मुळीच मान्य नव्हता. म्हणूनच त्यांचा डफ आणि त्यांची लेखणी शोषितांसाठी करूणा आणि शोषकांसाठी आसूड बनली होती. ''ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती गरीब कष्टकरी दलितांनी आपल्या तळहातावर पेललेली आहे'' या त्यांच्या विधानातून श्रमजीवी शोषितांविषयीचा मूल्यभाव प्रकट होतो. ''जग बदल, घालुनि घाव, सांगुनी गेले भीमराव'' या त्यांच्या उद्गारातून संघर्षशीलता आणि सामाजिक परिवर्तन यांचा परस्परसंबंध अधोरेखित होतो. त्यांची स्त्रीपात्रेही तेजस्वी, आक्रमक, स्वाभिमानी आहेत. एकंदरीत त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतील पात्रे प्रामुख्याने जिद्दी, मेहनती, महत्त्वाकांक्षी, जुलूमांविरूद्ध पेटलेली आहेत. पुरूषांचा स्वाभिमान, स्त्रीचे चारित्र्य, देशाचे स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आर्थिक समता यांचा त्यांनी आपल्या साहित्यातून सातत्याने पुरस्कार केला. पारतंत्र्याकडून स्वातंत्र्याकडे, अन्यायाकडून न्यायाकडे, विषमतेकडून समतेकडे वाटचाल करणाऱ्या या लोकशाहीर मानवतावादी विद्रोही साहित्यिकाला विनम्र अभिवादन !

# 'वडिलांवर गेलाय': सात महिन्यांच्या मुलाला रंगावरून केले ट्रोल



साथ निभाना साथिया' मालिकेत 'गोपी बहू' ही भूमिका करून अभिनेत्री देवोलीना भट्टाचार्जी लोकप्रिय झाली. देवोलीना सध्या छोट्या पडद्यापासून दूर आहे. ७ महिन्यांपूर्वी ती आई झाली आणि ती तिच्या मुलाबरोबर वेळ घालवत आहे. देवोलीना बरेचदा तिच्या मुलाचे फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करत असते.

नुकतेच तिने मुलाचे काही फोटो पोस्ट केले होते. या पोस्टवर ट्रोलर्सनी देवोलीनाच्या मुलाच्या रंगाबद्दल घाणेरड्या कमेंट्स केल्या होत्या. यामुळे संतापलेल्या अभिनेत्रीने या ट्रोलर्सची सायबर क्राइमला तक्रार केली आहे. तिने ट्रोलर्सनी केलेल्या कमेंट्सचे स्क्रीनशॉट स्टोरीवर पोस्ट केले आहेत.

देवोलीना भट्टाचार्जीने सायबर क्राइम इंडियाच्या अधिकृत अकाउंटवर झालेल्या संभाषणाचा स्क्रीनशॉट पोस्ट केला आहे. यात तिने वाईट कमेंट्स करणाऱ्यांविरोधात अधिकाऱ्यांची मदत मागितली आहे. तसेच ज्या लोकांनी तिच्या पेजवर कमेंट्स केल्या होत्या, त्यांच्याबरोबरच्या चॅटचे स्क्रीनशॉट्सही पोस्ट केले. 'देवोलीनाचा मुलगा बाबावर गेलाय,' अशा कमेंट्स काही ट्रोलर्सनी केल्या होत्या. देवोलीनाने एका पोस्टमध्ये लिहिलं, ''आता काय बोलावं. ८,९०० कमेंट्स. यापैकी दोन हजार कमेंट्स वाईट आहे असं गृहित धरलं तरी सात हजार सकारात्मक कमेंट्स आहेत. माझ्या मुलाला प्रेम, आशीर्वाद दिल्याबद्दल तुम्हा सर्वांचे आभार. तुमच्या या कमेंट्स महत्त्वाच्या आहेत. तसेच मला सर्वच महिलांना एक विनंती करायची आहे की अशा ट्रोलर्सच्या विरोधात बोला. खासकरून जेव्हा ते तुमच्या मुलांबद्दल बोलतात. अशा लोकांविरोधात ठामपणे उभे राहा. मला बरंच काही लिहायचंय, पण आता मी भारावले आहे. मला असं वाटतंय जणू मी एखादं युद्ध जिंकलंय. पुन्हा तुम्हा सर्वांचे आणि इंडियन सायबर पोलिसांचे आभार.''

''एका सात महिन्यांच्या मुलाबद्दल अशा कमेंट्स करायची त्यांची हिंमतच कशी झाली?'' असं एका चाहत्याने लिहिलं. तर एका युजरने अशा प्रकारे ट्रोलर्सची तक्रार केल्याबद्दल तिचं कौतुक केलं. गरज पडेल तिथे मुलासाठी आईने ठामपणे उभं राहायला हवं, असं देवोलीना म्हणाली.

# अहान पांडेने मोहित सुरीची केली फसवणूक?

काही चित्रपट, काही कलाकार व काही दिग्दर्शक हे मोठ्या प्रमाणात गाजतात. अगदी बॉक्स ऑफिसवर ते धुमाकूळ घालतात आणि सर्वत्र चर्चेचा विषय ठरतात. काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेला सैयारा अशा चित्रपटांपैकीच एक आहे.

मोहित सुरी दिग्दर्शित सैयारा हा चित्रपट १८ जुलै २०२५ रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटात नवोदित अभिनेता अहान पांडे प्रमुख भूमिकेत आहे. तसेच, त्याच्याबरोबर अनित पड्डादेखील प्रमुख भूमिकेत आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर मोठा गल्ला जमवला आहे. अनेक चित्रपटांचे रेकॉर्ड त्याने मोडले आहेत.आता मोहित सुरीने अहान पांडेला 'सैयारा'मध्ये कास्ट करण्याबद्दल वक्तव्य केले. अहानने 'सैयारा'मध्ये क्रिश कपूर ही भूमिका साकारली आहे. मोहित सुरीने नुकतीच 'झूम'ला मुलाखत दिली. त्या मुलाखतीत दिग्दर्शक म्हणाला, ''मला सुरुवातीलाच त्याची ऑडिशन पाहिल्यावर वाटले होते की, तो या भूमिकेसाठी फारच चांगला आहे. त्याला त्या भूमिकेसाठी कास्ट करण्यासाठी कोणीही माझं मन वळवण्याचा प्रयत्न केला नाही की कोणी दबाव टाकला नाही. ''''एका ज्येष्ठ निर्मात्यानं मला त्याचं नाव सुचवलं होतं. त्यांनी मला म्हटलं होतं की, हाच तुझा क्रिश कपूर आहे. तुला जसं पात्र पाहिजे, तसा तो आहे. तू त्याला एकदा भेटलं पाहिजे. मी जेव्हा अहानला भेटलो तेव्हा खूप सभ्य, मृदुभाषी व थोडा भित्रा वाटला; पण मला तर एक बेजबाबदार आणि वाईट मुलगा माझ्या चित्रपटाच्या भूमिकेसाठी पाहिजे होता.''''अचानक मला ही गोष्ट जाणवली की, तो मोहित सुरीला बघत आहे. 'आशिकी'च्या दिग्दर्शकाला बघत आहे. मग मी त्याला माझ्याबरोबर जेवणासाठी घेऊन गेलो. त्यावेळी मला ज्यांनी त्याचे नाव सुचवले होते ते म्हणाले की, जर तुलाही आता वाटत असेल की, हा तुझ्या पात्रासाठी योग्य नाही, तर त्याला नकार दे. मी त्याला नकार देणार होतो. पण, मी त्याला म्हणालो की, मला सर म्हणणे बंद कर आणि मोहित म्हण. त्यानं यामध्ये आणखी एक पुढचं पाऊल टाकलं आणि तो मला 'ब्रो' म्हणू लागला.

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 122



### हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दव योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द:—**

**दोन अक्षरी**
39 37
कढ, कदा, कर, कसा, काका, गज, गीर, ग्रह, ग्रंथ, घोळ, चर, टर, तळी, दाणे, नद, परी, पळ, पोत, बरा, बल, मका, माग, माया, माशी, रति, रव, रवा, वार, विडा, साळ, स्तर, हर

**तीन अक्षरी**
आरती, उंबर, कबाब, कालवा, गजब, जकात, ढलपी, बाजरा, पतित, पितर, पोरस, पोंगल, बहर, बालक, महाल, रवाळ, रुबाब, सासर, सावंत, संकल्प, संतती

**चार अक्षरी**
अहंकार, ओढगस्त, करतल, गावंढळ, ग्रहपीडा, तपशील, तिटकारा, दबदबा, बरगळ, महारथी, यादगार, योगायोग, राजहंस, री ओढणे, वितरक

**पाच अक्षरी**
अंगविक्षेप, अंगदनीति, गबाळ ग्रंथी, ढळढळीत, दबकावणे, बजरंगबली, श्रीमान योगी, सरबराई

**पाच अक्षरी**
गरीब परवर

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्रा | व | ण | | उ | प | सं | ह्य | र | | | इं | ध | न |
| | व्र | | अं | | रि | | त | | | | द्र | | क्षी |
| सु | | वं | श | | ह्य | व | भा | व | | सा | ध | ना | |
| क्ष्म | | श | | कं | स | | र | न | वे | | नु | क | ता |
| द | र | वे | शी | | | ज | | मा | ग | | ष्य | | ली |
| र्श | | ल | ल | क्र | र | णे | | ळी | | सा | | स | म |
| क | स | | वा | ळ | | | पं | | प्र | व | र्त | क | |
| यं | त्र | | न | | उ | ष्ण | क | टि | बं | ध | | ल | क्ष |
| त्र | | भा | | प्र | | | ज | | ध | | आ | | णि |
| | अ | क्र | ळ | वि | क्र | ळ | | गु | | कं | क | | क |
| च | | नां | | ष्ट | | | गु | रू | त्वा | क | र्ष | ण | |
| म | शा | ग | त | | दा | वा | | वा | | र | ण | | ग |
| क | म | ल | न | य | न | | | र | सा | | | मा | ड |
| णे | | | स | म | व | य | स्क | | म | ह्य | प्र | सा | द |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 503



**आडवी विधाने:—** 2) व्यवस्थापक, लाक्षणिक अर्थाने खटपटी मनुष्य
4) डाग, काळिमा
5) यमलोकीची नदी
7) आरोळी देऊन बोलाविणे
9) त्रस्त, हैराण
12) अगदी क्षुल्लक किमतीचे
15) जरचा सोबती
17) कमी प्रतीचे
18) वृक्षाभोवती बांधलेला ओटा
19) सूर्य, भानू
20) रंगमंचावर प्रत्यक्ष सादर होणार
22) बाल श्रीकृष्णाला मारण्यासाठी सुंदर स्त्रीचे रुप घेऊन आलेली दानवी
24) रस्तोरस्ती माकड, अस्वल इ.चे खेळ दाखविणारा डोंबारी
25) घोडेस्वारांची तुकडी, गट
26) दासबोध ग्रंथाचे रचयिता
27) चिनी मातीच्या पेल्यात कमी जास्त प्रमाणात पाणी घालून त्यातून सप्तसूर काढणारे वाद्य
30) दास, चाकर
31) महर्षि वाल्मिकीद्वारा रचित एक महाकाव्य
32) नातेवाईक, नातलग
34) तिन्ही लोकी विचरण करणारा एक देवर्षि
35) जादू, मंत्रविद्या
37) सारखे, तुल्य
38) सुंदर स्त्री
39) बाळंतपण करणारी दाई
41)जुन्या आणि टाकाऊ कपड्यांपासून तयार केलेले ऊबदार पांघरुण
42) दीन, गरीब
43) माशासारखा आकार करुन जलाशयात उडी घेणे
44) व्यवसायाने विणकर असलेला एक मुस्लिम संत कवी
46) वडिलोपार्जित संपत्तीचा उत्तराधिकारी
47) पूर्व दिशा 48) न तुटणारे
49) श्रीकृष्णाला पोहे अर्पण करणारा त्याचा गरीब मित्र
51) विद्येची देवता
52) पार्वतीचा पिता, सावध
53) पुनश्च लग्न करणे
55) आदरासहित, नम्रतापूर्वक
58) लुगडे, स्त्रियांनी नेसावयाचे एक वस्त्र
60) खाद्य, खाणे
61) राजेमहाराजांचे विलासमंदिर
63) रामायणात अंगदाचा पिता
65) ठार मारणे, हनन
66) बाल कथेत वर्णित पंख असलेली काल्पनिक सुंदर स्त्री
67) द्राक्षे
69) उचलून फेकणे, उचलबांगडी
70) थोर व्यक्ति व त्यांच्या कार्याचे स्मरण राहावे म्हणून उभारलेली धातुची मूर्ति
71) करदोडा, कंबरेला बांधलेला दोरा
72) अंदाज, अदमास
73) हात किंवा पायाच्या बोटांच्या अग्रभागी असलेले हाड

**उभी विधाने :—** 1) राखण करणारा
2) कर्नाटक राज्याची भाषा
3) शत्रु, वैरी
4) दोन पक्षांमध्ये झालेला ठराव
5) दुष्मनी, शत्रुत्व
6) आपले राष्ट्रगीत 'जन मन गण.....' लिहिणारे जगप्रसिद्ध थोर बंगाली कवी व तत्वचिंतक
8) संध्याकाळची भयावह वेळ
10) बाहेर जाणारे (टपाल वगैरे)
11) भाडे, किराया
13) महाराष्ट्राचे दोनदा मुख्यमंत्री झालेले भारतीय हरित क्रांतिचे जनक
14) मूल्य, किंमत
16) मद्यालय
18) वृक्षाच्या बुंध्याभोवती बांधलेला चबुतरा
21) एकाग्र दृष्टी
23) लहान बाळाचे नाव ठेवणे
24) विजया दशमी
27) जनावरांना देण्यात येणारे एक तीव्र रेचक औषध
28) गवताची काडी
29) आकाशाला भिडणारे (इमारत)
31) नृपति
33) अंधःकार
36) एखादी गोष्ट करतांना मुद्दाम स्वीकारलेला वक्र मार्ग
39) जमीन किंवा पहाडात खोदलेला बोगदा
40) दुसऱ्यापेक्षा चांगले
43) इतिहासकालीन एक प्रसिद्ध अंधसंत कवी
44) दोऱ्यांच्या सहाय्याने बाहुल्या नाचविण्याचा खेळ
45) एक श्वास रोग
46) दिवस, तलवारीचा आघात
48) दीर्घ वर्तुळाचा व्यास 49) सुगंध
50) विस्तवाचा चटका, तीव्र वेदना
51) जो कधीच मांसाहार करीत नाही असा
52) दोन पक्षात मध्यस्थी करुन आपले कमिशन कमविणारा
54) घरोघरी पाणीपुरवठा करण्याची शासकीय व्यवस्था
56) वेळ घालविण्याचे साधन, करमणूक
57) लहान शहर
58) वेणू, अलगुजा
59) वडिलांच्या वडिलांची मुलगी ती आपली?
60) विपदा, संकट, आपत्ती
62) एखादे कार्य सहजतेने करण्याचे कौशल्य
64) वाणीतून प्रकट होणारी शब्दक्रिया
65) हत्या, ठार मारणे
67) शेवट, समाप्ती
68) लायक, योग्य, सक्षम
69) श्रीशंकराची पत्नी
(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | व | मू | ल्य | न | | ई | शा | दे | ओ | ल | | | व्य | स | न |
| लौ | | | | ग | य | | | श | | क्ष्म | | भा | व | | व |
| कि | म | या | गा | र | | वि | | द्रो | | ण | | र | सा | त | ल |
| क | | मि | | | | ज | वा | ही | र | | सं | | य | स | |
| | मु | नी | म | | म | न | न | | म | धू | मे | ह | | दी | प |
| रा | ग | | | पा | र | वा | | खु | जा | | ल | वा | द | | क |
| जे | ल | र | | | तु | स | डा | | न | य | न | | | पा | ड |
| शा | | ज | व | ळी | क | | | दं | | श | | गों | जा | र | णे |
| ही | | नी | र | | डा | क | बं | ग | ला | | गं | गा | | धी | |
| | | च | | स | | स्तु | | | द | र | | ट | का | | त |
| ल | ष्क | र | च्या | भा | क | री | भा | ज | णे | | क | | क | म | ळ |
| ट | | | | प | द | | क | | | ल | क्ष | | र | | म |
| | शे | जा | र | ती | | क | ड | क | ल | क्ष्मी | | वा | व | ट | ळ |
| म | त | ल | ब | | उ | र | | ला | | पू | र्वा | र्ध | | र | |
| स | सा | | डी | क | दा | णी | | का | ळी | ज | | क्य | | बु | ध |
| | रा | घु | | र | स | | क्षौ | र | | न | ख | | अं | ज | न |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी सुधारणा आणि बदल होऊ शकतात. व्यवसाय अनुकूल राहील. नोकरीत प्रभाव वाढेल. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ:** धर्मात रस असेल. तुम्हाला सत्संगाचा लाभ मिळेल. तुम्हाला नवीन मित्र मिळतील. न्यायालय आणि न्यायपालिकेचे काम अनुकूल राहील.

**मिथून :** दुखापत आणि अपघातामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. संशयामुळे कामावर परिणाम होईल. आरोग्य कमकुवत राहील.

**कर्क :** प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील. न्यायालय आणि न्यायपालिकेच्या कामातील अडथळा दूर होईल. परिस्थिती अनुकूल असेल. व्यवसायात नफा वाढेल.इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**सिंह :** जमीन आणि इमारतीशी संबंधित अडथळे दूर होतील आणि नफ्याची परिस्थिती निर्माण होईल. मोठी गोष्ट मोठी नफा देऊ शकते.

**कन्या :** विद्यार्थ्यांना यश मिळेल. तुम्हाला एखाद्या उत्सवात सहभागी होण्याची संधी मिळेल. प्रवास मनोरंजक असेल. व्यवसायातून नफा होईल.

**तुळ :** बोलण्यात हलके शब्द वापरणे टाळा. अनावश्यक राग आणि उत्साह असू शकतो. कोणत्याही कारणाशिवाय एखाद्याशी वाद होऊ शकतो.

**वृश्चिक :** कठोर परिश्रमाचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल. तुम्ही उत्साहाने आणि आनंदाने कामावर लक्ष केंद्रित करू शकाल. वादविवादातून तुम्ही तुमचे स्थान मजबूत करू शकाल.

**धनु :** दुखापत आणि आजार टाळा. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला पाठिंबा मिळेल. तुम्हाला उत्साहवर्धक माहिती मिळेल.

**मकर :** रोजगार मिळविण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. तुम्हाला भेटवस्तू मिळतील. व्यवसाय चांगला चालेल. गुंतवणूक चांगली राहील. नोकरीत अधिकार वाढू शकतात.

**कुंभ :** अनावश्यक खर्च होतील. नफ्याच्या संधी पुढे ढकलल्या जातील. वाईट लोक नुकसान करू शकतात. दुखापत आणि रोग टाळा. जोखीम आणि जामिनाशी संबंधित काम टाळा.

**मीन :** व्यवसायिक सहल यशस्वी होईल. अडकलेले पैसे मिळू शकतात. व्यवसयात वाढ होण्याची शक्यता आहे. नोकरीत शांती राहील.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## 'शेकाप'चा वर्धापन दिनी हल्लाबोल | भाई राहुल देशमुखांची घणाघाती टीका

# फडणवीस सरकार शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करायला निघाले

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**गडचिरोली, दि. ४ :** देवेंद्र फडणवीस यांचे सरकार भांडवलदारांचे पोट भरण्यासाठी शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करायला निघाले आहे, अशी घणाघाती टीका शेतकरी कामगार पक्षाचे राज्य सहचिटणीस भाई राहुल देशमुख यांनी केली. 'शेकाप'च्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यात, त्यांनी सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्लाबोल केला.

शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित मेळाव्यात बोलताना, भाई राहुल देशमुख यांनी भाजप सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, 'ईडी'चा धाक दाखवून विरोधकांना शांत करायचे आणि शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने भांडवलदारांच्या घशात घालायच्या, असा सपाटा सरकारने लावला आहे. जनसुरक्षा कायद्याला आम्ही घाबरणार नाही आणि अन्यायाविरोधात रस्त्यावर उतरून लढा देत राहू, असा इशाराही त्यांनी दिला.

या मेळाव्याला 'शेकाप'च्या आदिवासी, भटके विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई रामदास जराते, विद्यार्थी आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष साम्या कोरडे, महिला नेत्या जयश्री जराते, तसेच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. अमोल मारकवार, आझाद समाज पक्षाचे धर्मानंद मेश्राम आणि राज बन्सोड उपस्थित होते. जिल्हा खजिनदार भाई शामसुंदर उराडे, डॉ. गुरुदास सेमस्कर, अक्षय कोसनकर, रमेश चौखुंडे, चंद्रकांत भोयर, चिरंजीव पेंदाम, अशोक किरंगे, पांडुरंग गव्हारे, दामोदर रोहणकर, दिपक डोंगरे, अनुप चोरघडे, पवित्र दास, प्रभाकर गव्हारे, शर्मीश वासनिक, रामदास आलाम, डंबाजी भोयर, कविता ठाकरे, पोर्णिमा खेवले, निशा आयतुलवार, सरपंच छाया मंटकवार, अभिलाषा मंडोगडे आणि गुड्डू हुलके मंचावर उपस्थित होते.

### स्थानिक निवडणुकांसाठी डाव्यांची मोट

येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, जिल्ह्यातील सर्व डाव्या-पुरोगामी पक्षांना एकत्र घेऊन लढवल्या जातील, असे आवाहन आदिवासी, भटके विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष भाई रामदास जराते यांनी केले. सर्व कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे आणि सरकारविरोधात एकजुटीने लढावे, असे ते म्हणाले. या घोषणेमुळे जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

### 'अदानी-जिंदाल'साठी भूमिपुत्रांचा बळी?

धारावी पुनर्विकास प्रकल्प आणि गडचिरोलीतील स्टील हब, हे केवळ अदानी आणि जिंदाल यांचे पोट भरण्यासाठी आहेत, असा आरोप विद्यार्थी आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष साम्या कोरडे यांनी केला. या प्रकल्पांच्या नावाखाली, भूमिपुत्रांच्या जमिनी लाटून त्यांना देशोधडीला लावण्याचे हे षडयंत्र आहे. जनतेने हे षडयंत्र हाणून पाडले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

## १२ हजारांवर रेशनकार्ड धारकांचे मोफत धान्य होणार कायमचे बंद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर , दि. ४ :** मागील सहा महिन्यांपासून रेशन दुकानातून धान्याची उचल न करणाऱ्यांचा लाभ आता बंद करण्याचे निर्देश सरकारकडून देण्यात आले आहेत. याअंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील तब्बल १२ हजार ३५० लाभार्थ्यांचे धान्य बंद करण्याच्या हालचाली पुरवठा विभागाने सुरू केल्या आहेत.

सध्या प्रत्येक स्वस्त धान्य दुकान स्तरावर लाभार्थ्यांची पडताळणी सुरू करण्यात आली आहे. जे लाभार्थी धान्याची उचल करत नाहीत, अशा लाभार्थ्यांची पडताळणी करण्यासाठी केंद्र सरकारने मागील वर्षीच निर्देश दिले होते. यानुसार, दर महिन्याला मागील सहा महिन्यांत धान्य उचल न करणाऱ्यांची यादी पुरवठा विभागाकडे पाठविण्यात येते. जिल्ह्यातील १२ हजार ३५० लाभार्थ्यांनी मागील सहा महिन्यांत धान्य घेतलेले नव्हते त्यांची यादी सहा महिन्यांपूर्वी अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांना देण्यात आली. यात स्थलांतरित झालेल्या लाभार्थ्यांचीही समावेश आहे. धान्य न घेणारे रेशन कार्ड लाभार्थी सायलेन्ट समजून त्या रेशनधारकांची पडताळणी करण्यात येत आहे, असे लाभार्थी एपीएल (बिगर प्राधान्य कुटुंब लाभार्थी) योजनेत वर्ग केले जातात. सहा महिने धान्य न घेतलेल्या रेशन दुकानातील धान्याची गरज नाही, असे समजून त्यांचा धान्याचा हक्क बंद होतो, असा नियम आहे. ५ हजार १२ रेशन कार्डमधील १२ हजार ३५० लाभार्थ्यांनी सहा महिन्यांपासून धान्याची उचल केली नाही. यामुळे अशा लाभार्थ्यांचे धान्य बंद करण्यासाठी पुरवठा विभागाकडून पडताळणी सुरू करण्यात आलेली आहे. संपूर्ण लाभार्थ्यांच्या पडताळणीनंतर धान्य बंद करण्यात येणार आहे.

## महत्त्वाचे

### डिजिटल युगात मूल्यनिष्ठ पत्रकारितेचा मागोवा घेणारे चर्चासत्र अकोल्यात संपन्न

**अकोला :** डिजिटल आणि सायबर क्रांतीमुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून, या बदलांच्या संदर्भात मूल्यनिष्ठ पत्रकारितेचे महत्त्व अधिक अधोरेखित करण्याची गरज आहे. याच उद्देशाने शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ रोजी अकोल्यातील गोरक्षण रोडवरील लाईट हाऊस, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, मलकापूर येथे 'जिल्हास्तरीय मीडिया चर्चासत्र' आयोजित करण्यात आले. या चर्चासत्राचे आयोजन ब्रह्माकुमारीज मीडिया प्रभाग, माऊंट आबू आणि ब्रह्माकुमारीज सेवा केंद्र, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

### रिधोरा बसस्थानक परिसरात ६ फुटी अजगराने उडवली खळबळ



**अकोला :** रिधोरा गावातील बसस्थानक परिसरात शनिवारी सकाळी ११.२५ वाजता तब्बल ६ ते ७ फूट लांबीचा भलामोठा अजगर आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या दृश्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच ३० अकोला जिल्हा सर्पमित्र टीमचे सूरज इंगळे, सूरज धायडे आणि अभय निंबाळकर तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अत्यंत दक्षतेने, कोणतीही इजा न करता, मोठ्या संयमाने अजगराला पकडले. नंतर या अजगराला वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले असून वन विभागाने त्याचे पुन्हा नैसर्गिक अधिवासात पुनर्वसन केले आहे. रिधोरा बसस्थानकासारख्या वर्दळीच्या ठिकाणी इतक्या मोठ्या अजगराचे आढळणे ही बाब चिंतेची असली तरी सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे कोणतीही अप्रिय घटना टळली. गावकऱ्यांनी सर्पमित्रांच्या कामाचे कौतुक केले असून, या प्रकारामुळे वन्यजीवांची रहदारी वाढल्याचे संकेत मिळत असल्याने सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### आदिवासी विद्यार्थी सुसंवादातून आत्मबळ, संघटन आणि प्रेरणा :प्रा. सलामे यांचे मार्गदर्शन

**अकोला:** 'आपण या देशाचे मूळ रहिवासी आहोत, आणि आता समाज व्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याची वेळ आली आहे,'' अशा शब्दांत आदिवासी विद्यार्थ्यांना जागृत करत प्रा. संजीवकुमार सलामे यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनच्या वतीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कृषक भवन सभागृहात नुकत्याच आयोजित ''आदिवासी विद्यार्थी सुसंवाद'' या कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष सुरेश मडावी होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी फेडरेशन नेहमीच तत्पर असल्याचे स्पष्ट केले. जिल्हा संघटक राजू मसराम यांनी संघटितपणातून क्रांती कशी घडते, यावर सखोल विचार मांडले.प्रारंभी आदिवासी थोर क्रांतिकारकांच्या स्मृतीला अभिवादन करून विद्यार्थ्यांचे परिचय घेण्यात आले. चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांतील आदिवासी विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग होता.कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांनीच केले. पार्थ कोरवते, आदर्श दुर्वे, प्रणय सलामे, आदर्श कंगाले, सुजल मडावी, वैष्णवी ताराम, तेजस्विनी आतला यांच्यासह अनेकांनी मेहनत घेतली. सूत्रसंचालन कुंदन पेंदोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रणय सलामे यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना चहा-नाश्ता देण्यात आला.

## महाराष्ट्र कुरेशी समाज संघर्ष समितीकडून मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**नांदुरा, दि.४:** कुरेशी समाजाच्या पारंपरिक व्यवसायाबाबत कायदेशीर अडचणी व अन्याय थांबविण्यासाठी शासनस्तरावरून तात्काळ निर्णय घेण्यात यावा यासाठी महाराष्ट्र कुरेशी समाज संघर्ष समितीकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसीलदार नांदुरा मार्फत निवेदन देण्यात आले.महाराष्ट्रातील कुरेशी समाज पारंपरिक व कायदेशीररित्या पशू व्यापार, वाहतूक व कापणे व्यवसायात आहे.

मात्र अलीकडे विविध ठिकाणी जातीय अत्याचार, बेकायदेशीर गुन्हे नोंदविणे, गोरक्षण केंद्रातुन जनावरे विक्री व चोरी होणे, पोलिस/गोरक्षक कारवाया, व्यापाऱ्यांना अत्यंत त्रास या प्रकारच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे .ज्यामुळे समाजावर आर्थिक, सामाजिक, कायदेशीर व प्रतिष्ठेला धक्का पोहोचत आहे.समाजच्या अधिकारावर गदा येत असून आर्थिक, सामजिक, मानसिक दृष्ट्या त्रस्त समाजाने या बेकायदेशीर कृत्यांना त्रासाला कंटाळून आपला व्यापार बंद पुकारला आहे. यातून महारष्ट्रातील शेतकरी व्यापारी यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे . मास एक्स्पोर्टच्या कंपन्या बंद पडत आहे .याचा मोठा फटका राज्याच्या तिजोरीला बसत आहे . या व्यवसायपासून आपला भारत देश जगात सर्वात जास्त बीफ एक्स्पोर्ट करणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

परंतु सदरहू समाजावर अन्याय सुरूच राहिला व मांग्या पूर्ण नाही झाला तर हा समाज खरेदी विक्री करणार नाही त्यामुळे कंपन्यांना माल देणार नाही. ह्या मागण्यांच्या पृष्ठ्यार्थ कायदेशीर संदर्भ देण्यात आले आहेत.आर्थिक व्यवहार पारदर्शक करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्या ऑनलाइन प्रणालीचे अनिवार्यीकरण करणे,वाहतूक परवान्यांचे ऑनलाईन त्वरित वितरण,पशुवैद्यकीय प्रमाणपत्रे आणि वाहतुकी साठी देणे अनिवार्य करावीत,शासकीय स्लॉटर हाऊसची निर्मिती प्रत्येक स्थानिक पातळीवर निर्माण करणे,कोंडवाडा सुविधा त्वरित सुरू कराव्यात,बेकायदेशीर गोरक्षण केंद्रे तत्काळ बंद करून कारवाई करणे, कायदेशीर संरक्षण व सुरक्षा देणे, महामंडळाची स्थापना करणे, प्रत्येक जिल्हा तहसील कार्यालयात तसेच पोलीस स्टेशनमध्ये कायदेविषयक माहिती व शिबिरे आयोजित करावीत इत्यादी मागण्यांचा या निवेदनात समावेश आहे. वरील मागण्या दहा दिवसाच्या आत शासनाने कारवाई न केल्यास महाराष्ट्र कृषी समाज संघर्ष समितीच्या वतीने राज्यभर व्यापार बंद व संवैधानिक आंदोलन करण्यात येईल असा इशाराही या निवेदनात पुढे देण्यात आला आहे.

## कृषीमंत्री शेतकरी हिताचे बोलले अन् रचला रमीचा डाव...!

### रयत क्रांती संघटना युवती प्रदेशाध्यक्ष प्रिया राऊत यांचे उद्गार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मंगरुळपीर, दि.४:** कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी कोइंबतूर येथील केंद्रिय मंत्री शिवराज सिंह चौहान व गिरीराज सिंह यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात श्री कोकाटे यांनी एचटीबिटी बियाण्याचा अनुमती मिळावी या हेतूने प्रेरित होऊन पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी यांना एचटीबीटी व मका या दोन वाणाला चाचणी करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यास सांगितले आणि या चर्चेत केंद्रातील दोन्हीही मंत्र्यांनी सहमती दर्शवली परंतु शेतकरी हिताचा प्रश्न मिटतो की काय असे सरकारला वाटू लागले व लगेच,, पवार अँड पवार कंपनीने उभा केला मग रमीचा डाव.. कारण आजपर्यंत किती सरकारे आली व गेली परंतु शेतकरी आत्महत्याग्रस्त विदर्भ व मराठवाड्यात शेतकरी हिताचा निर्णय कधी झाला नाही व कधी कोणताही शेतकरी हितांचा निर्णय होतांना दिसला पण नाही व हेच राज्य सरकारला खटकल व तेथूनच हा डाव उभा राहिला कारण विदर्भ व मराठवाडा या कोरडवाहू क्षेत्रात आपले राजकीय प्रतिनिधित्व संपेल आपले झेंडे, बॅनर, सतरंज्या उचालावया कोहीच मिळणार नाही म्हणुन एका पवाराने व्हिडीओ व्हायरल केला व दुसऱ्या पवारांनी खाते बदल केला, यांचा अर्थ असा की विरोधी असो की सत्ताधारी दोघेही एका माळेचे मणी फक्त सरकारचे नावाने भांडवल उभ करायचं व शेतकऱ्यांना लुटायच, हेच तत्व प्रत्येक सरकार राबवीत आहे, ८० चे शेतकरी नेते शरद जोशी हे सांगून गेले आहे की कीसानो की समस्या सरकार क्या सुलझाय सरकार यही एक समस्या हैं शरद जोशी साहेबांच्या आंदोलनात शेकडो शहीद झाले, हजारों त्यांच्या अर्थशास्त्रीय अभ्यासात पागल झाले, व तरीही लाखो शेतकरी आत्महत्या करीत आहेत व पुढेही करणारच आहेत, आता प्रत्येक शेतकरी संघटनेचे नेत्यांना विनंती आहे की स्वामिनाथन, कृषी मूल्य आयोग कारण हे शेतकऱ्यांना आजीवन देणारे चॉकलेट आहे यानी फक्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी सुटते व पाणी मात्र कधीच मिळत नाही, बस फक्त एक करा नाहीतरी आपण तोट्याची शेती करीत आहोतच आता येणारे दोन वर्ष फक्त कुटुंबापुरत पिकवा मग पहा आपल्याला जे हवं ते मिळेल.

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषद जिल्हा अभ्यास वर्ग संपन्न




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**देऊळगाव राजा, दि.४:** तालुक्यांतील देऊळगाव मही येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद दोन दिवसीय जिल्हा अभ्यास वर्ग पार पडला. अभ्यास वर्गाचे उद्घाटन उदय छाजेड ,अशोक कोटेजा यांनी केले.

प्रसंगी डॉ.नितीन मेहेत्रे, संदेश कुडके, ओम शिंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटक उदय छाजेड यांनी अ.भा.वि.प.ही अविरतपणे काम करणारी विद्यार्थी संघटना आहे. विकास व कार्यक्रमातून समाजाचे व विद्यार्थ्यांचे उद्बोधन असे अखंड चक्र चालु असल्याचे सांगितले. डॉ.नितीन मेहेत्रे यांनी ही संस्था स्वतंत्र, स्वावलंबी व काळाच्या कसोटीवर खरी उतरलेली परिपूर्ण संघटना आहे. कामाचा विस्तार देशाच्या सर्व कानाकोपऱ्यात मध्ये आहे. विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, परिश्रम, अनुशासन, सहकार्य, सामाजिक विषयाबद्दल संवेदनशीलता, धैर्य, निर्णय क्षमता, नेतृत्व गुणांच्या विकासासाठी वातावरण तयार होते असे सांगितले. प्रा.प्रशांत देशमुख यांनी वेगवेगळ्या आयाम, वेगवेगळ्या कार्य आचार पद्धती, परंपरा सदस्यता याबद्दल सविस्तर माहिती दिली. प्रा.सुनील काकडे यांनी शैक्षणिक, सामाजिक,राष्ट्रीय मुद्दे, आंदोलने, राष्ट्रीय विचार बद्दल माहिती दिली.अभ्यास वर्गात प्रा.देशमुख, प्रा.काकडे ,व्यंकटेश जूनघरे अमृता गुप्ता, विवेक माने,अभिषेक भेंडे यांचे अभ्यास सत्र पार पडले. पवन वानखडे, दिवेश पिसे, दिपेश लकडे इतर विद्यार्थी प्रतिनिधी जिल्हाभरातून हजर होते. कार्यक्रमाचे संचलन अमृता गुप्ता व आभार व्यंकटेश जूनघरे यांनी केले.

## बावणकुळेच्या 'नौटंकी' वक्तव्यावर प्रहारचा संताप ; अमरावतीत जोडे मारो आणि मिरची धुनी आंदोलन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अमरावती, दि.४:** शेतकरी कर्जमाफी आंदोलनाला ''नौटंकी'' म्हणणाऱ्या पालकमंत्री चंद्रकांत बावनकुळे यांच्या वक्तव्यावर प्रहार जनशक्ती पक्षाने संतप्त प्रतिक्रिया दिली असून, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोडे मारो आंदोलन व मिरची धुनी देत जोरदार निषेध नोंदवला.

मोर्शी येथे शेतकऱ्यांनी 'कर्जमाफीची तारीख कधी?'असा सरळ प्रश्न विचारला तेव्हा त्यांना पोलिसांनी अटक केली. त्यानंतर बावनकुळे यांनी शेतकरी आंदोलनाची टवाळी करत ''नौटंकी'' संबोधले. त्यावर प्रहार पक्षाने तीव्र संताप व्यक्त करत म्हटले की, हे वक्तव्य आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांच्या वेदनेचा अपमान आहे.

**प्रहारचा रोष उफाळला**

जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आंदोलनात प्रहार महानगर प्रमुख बंटी रामटेके, प्रदेश सचिव नंदकिशोर कुयटे, जितू दुधाने, संपर्कप्रमुख गोलू पाटील, अकबर भाई, मनीष पवार, तसेच महिला नेत्या मंजुषा बोडखे, अलका शहाणे, शुभांगी वाटाणे आदींनी सहभाग घेतला. ''आता एक पाऊल मागे नाही!'' असा नारा देत त्यांनी बावनकुळेंच्या वक्तव्याला ठाम विरोध दर्शवला.

**''सातबारा कोरा'' विसरले की काय?**

प्रहारने सरकारवर टीका करत म्हटले की, निवडणुकीपूर्वी ''सातबारा कोरा'' अशी आश्वासने देणारे सरकार आता कर्जमाफीचा प्रश्न विचारला की मिरची झोपते. हा दुहेरी चेहरा जनतेने ओळखला आहे. बावनकुळे यांना मंत्रिमंडळातून हटवण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

शेतकऱ्यांचा प्रश्न म्हणजे 'नौटंकी' नाही, अस्मितेची लढाई आहे कर्जमाफी व हमीभावाबाबत स्पष्ट आणि तात्काळ तारीख जाहीर करा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र होईल, असा इशारा देत प्रहारने सांगितले की, शेतकऱ्यांच्या प्रश्नाला जो टाळेल, त्याला जनतेच्या रोषाचा सामना करावा लागेल.

## डिजिटल युगातील पत्रकारिता आव्हाने | पत्रकारितेची नवी दिशा यावर बुलडाणा जिल्हास्तर मीडिया चर्चासत्र

# पत्रकारांनी मूल्यनिष्ठता, जबाबदारी आणि मानवी दृष्टिकोन जपणे आवश्यक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**खामगाव, दि.४:** डिजिटल तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. या बदलांचा आढावा घेताना पत्रकारांनी मूल्यनिष्ठता, जबाबदारी आणि मानवी दृष्टिकोन जपणे आवश्यक आहे, असा सूर ३ ऑगस्ट रोजी खामगाव येथे झालेल्या जिल्हास्तरीय मीडिया संमेलनात उमटला. 'डिजिटल तंत्रज्ञान : आव्हाने, संधी आणि पत्रकारितेची नवी दिशा' या विषयावर ब्रह्माकुमारीज मीडिया प्रभाग, माऊंट आबू यांच्यावतीने रायगड कॉलनी येथील ब्रह्माकुमारीज शिवालय सेवाकेंद्रात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू स्मृती आणि कुमारी देविका कापडे हिच्या स्वागतम शत स्वागतम या स्वागत नृत्याने झाली. यानंतर ब्रह्माकुमारी शकुंतलादीदी यांनी स्वागत संबोधन केले.

विषयाची प्रास्तावना ब्रह्माकुमार डॉ. शांतनूभाईजी, राष्ट्रीय समन्वयक, मीडिया प्रभाग, माऊंट आबू यांनी केली. त्यात त्यांनी म्हटले की, सूचना दिल्याने समस्या सुटत नाही आणि समाधान होत नाही म्हणून समस्याप्रधान समाधानयुक्त पत्रकारिता करणे महत्वाचे आहे. मीडियाच्या कर्तव्याबाबतीत गांधीजी म्हणाले होते की, पत्रकारिता म्हणजे फक्त सेवा, सेवा आणि सेवा होय. पोलीस व प्रशासन नसताना काही दिवस देश चालणे शक्य होईल परंतु मिडिया शिवाय एकही दिवस देश चालणे शक्य नाही. त्याचबरोबर त्यांनी ब्रह्माकुमारी मीडिया विंगद्वारा होत असलेल्या मूल्यनिष्ठ कार्यक्रमांचा आढावा घेतला. बीज भाषणात ज्येष्ठ संपादक राजेश राजोरे यांनी डिजिटल युगातील पत्रकारितेतील आव्हानांवर प्रकाश टाकत 'वेगवान बातम्या देताना अचूकता आणि जबाबदारी अबाधित ठेवणे तसेच सोशल मीडियावर नियंत्रण आजचे मोठे आव्हान आहे, तंत्रज्ञानासोबत पत्रकारांनी आत्मपरीक्षण आणि नैतिकतेचे भान ठेवावे, असेही त्यांनी सांगितले.

उद्घाटन समारंभ दीपप्रज्वलनाने झाला. उद्घाटकीय संबोधनात रणजीतसिंह राजपूत, अध्यक्ष, अ.भा. मराठी पत्रकार संघ, बुलढाणा जिल्हा यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून समाजास नवीन दिशा देण्याचे कार्य होते, अभिव्यक्तीचे रक्षण करणे पत्रकारितेचे काम आहे. जी व्यवस्था अर्थात प्रशासन आम्हास नियंत्रीत करते त्यातच गडबड आहे. खरी पत्रकारिता करणाऱ्यांचे रक्षण व्हावे, असे प्रतिपादन केले.

अरुण जैन, वरीष्ठ उपसंपादक, दै. सकाळ, बुलढाणा विभाग, यांनी अशा चर्चासत्रातून ब्रह्माकुमारीज् मीडिया प्रभागाद्वारे वैचारिक क्रांती आणण्याचे काम होत आहे असे म्हटले. अनिल गवई, उपसंपादक, दै. लोकमत, खामगाव यांनी आव्हानांना सामोरे जाण्याची शक्ति प्रेरणा ब्रह्माकुमारीज्च्या अशा चर्चासत्रातून निश्चित मिळेल, असे प्रतिपादन केले. संदिप वानखेडे (पुढारी न्यूज चॅनल) यांनी सांगितले की, सकारात्मक पत्रकारिता लोप पावत चालली आहे. डिजिटल पत्रकारितेतील ब्रेकिंग न्यूज मागे धावतांना अन्याय होतो, त्याबातीत काळजी घेणे आवश्यक आहे. राजेंद्र काळे, जिल्हा प्रतिनिधी, देशोन्नती, बुलढाणा यांनी आपल्या मनोगात म्हटले की, ब्रह्माकुमारीज् ही विश्वशांतीची भूमिका निभावते, ब्रह्माकुमारीज व पत्रकारिता यांच्यात मैत्री आहे, आज जागतिक मैत्री दिवसानिमित्त अशा चर्चासत्रांचे आयोजन या दोघांमध्ये मैत्री दृढ करणारे आहे, ही समाधानाची बाब आहे.

## पूनम बनसोडे महिला आघाडी बुलडाणा जिल्हाध्यक्षपदी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मेहकर, दि.४:**समाजातील वंचित, दिव्यांग, आणि कला-संस्कृती क्षेत्रातील दुर्लक्षित घटकांसाठी आपल्या आवाजाने आणि कृतीने नेहमीच आघाडीवर राहिलेल्या पूनम संजय बनसोडे यांची 'राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग संघर्ष समिती'च्या महिला आघाडी बुलढाणा जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

या निवडीने केवळ पुनम ताईंच्या सामाजिक कार्याची दखल घेतली गेली नाही, तर महिलांना संघटनेत सक्रिय नेतृत्व देण्याची दिशा स्पष्ट केली आहे. त्यांची ओळख एक सजग सामाजिक कार्यकर्ती, संवेदनशील गायिका, प्रभावी वक्त्या आणि सर्वसामान्य महिलांची मदतनीस अशी आहे. कार्यकुशलतेवर विश्वास, संधीच्या नावावर निव्वळ फोटोबाजी करणाऱ्यांना चपराक आज अनेक संघटनांमध्ये महिलांना केवळ नावापुरती पदे देण्यात येतात, पण पूनम ताईंसारख्या खऱ्या कार्यकर्त्यांना दिलेले नेतृत्व हे अन्य संघटनांसाठी आरसा ठरावे. अनेक महिलांची कामं गाजत असताना, त्यांना मागे ठेवले जाते. अशा वेळी ही निवड निव्वळ औपचारिक नसून कार्यक्षमता ओळखून दिलेली जबाबदारी आहे, हे विशेष! समितीचे अध्यक्ष मा. संदीप बोरकर यांनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली असून, हा निर्णय संघटनेच्या सामाजिक बांधिलकी आणि भूमिकेचे स्पष्ट उदाहरण मानले जात आहे. या निवडीप्रसंगी संघटनेचे राज्य संघटक विजय चव्हाण, पांडुरंग सपकाळ, सतीश बोरकर, दुर्गादास काटे महाराज, संजय पवार, आणि शिवाजी काटे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. त्यांनी या निवडीचे स्वागत करत, पूनम ताईंच्या नेतृत्वात जिल्ह्यात महिला आणि कलावंतांसाठी नवीन दिशा निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# भारताचा इंग्लंडवर ६ धावांनी चित्तथरारक विजय

## मालिका २-२ बरोबरीत

**मँचेस्टर, दि. ४** प्रतिनिधी

शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या युवा भारतीय संघाने जे करून दाखवल आहे, ते भलाभल्या दिग्गजांना जमलं नव्हतं. ओव्हलच्या मैदानावर भारतीय संघाने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ विजयाच्या अगदी जवळ पोहोचला होता. पण भारतीय गोलंदाजांनी शेवटच्या षटकांमध्ये पूर्ण जोर लावला आणि इंग्लंडच्या फलंदाजांना गुडघे टेकायला भाग पाडलं. हा सामना भारतीय संघाने ६ धावांनी जिंकून मालिका २-२ ने बरोबरीत आणली आहे.



■ मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णा हे दोघेही भारतीय संघाच्या ओव्हल विजयाचे हिरो ठरले आहेत.जो रूट आणि हॅरी ब्रुक यांच्या शतकांमुळे भारतीय संघाच्या हातून हा सामना पूर्णपणे निसटला होता. पण मोहम्मद सिराजने भारतीय संघाला विश्वास दिला की, आपण हा सामना अजूनही जिंकू शकतो. सिराजला प्रसिध कृष्णाची चांगली साथ मिळाली. दोघांनी मिळून इंग्लंडच्या फलंदाजांची डोकेदुखी वाढवली. ब्रुक आणि रुट बाद झाल्यानंतर इंग्लंडचे फलंदाज धावा करताना संघर्ष करताना दिसून आले. शेवटी एटकिंसन उभा राहिला. पण सिराजने त्याला बाद करत भारतीय संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

■ सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाचा डाव २२४ धावांवर आटोपला होता. या धावांचा पाठलाग करताना इंग्लंडला २४७ धावा करता आल्या होता. यासह इंग्लंडने पहिल्या डावात फलंदाजी करताना २३ धावांची आघाडी घेतली. दुसऱ्या डावात फलंदाजीला आलेल्या भारतीय संघाला हवी तशी सुरूवात करता आली नव्हती. केएल राहुल अवघ्या ७ धावा करत माघारी परतला होता. तर साई सुदर्शनला अवघ्या ११ धावा करता आल्या. भारतीय संघाला सुरूवातीला २ मोठे धक्के बसले. पण त्यानंतर नाईट वॉचमन म्हणून फलंदाजीला आलेल्या भारतीय संघाने आकाशदीपने ६६ धावांची महत्वपूर्ण खेळी केली.

## महत्त्वाचे

### जो रूट बनला सहा हजारी मनसबदार!



**मँचेस्टर:** कसोटी क्रिकेटमधील सर्वोत्तम फलंदाजांमध्ये गणल्या जाणाऱ्या जो रूटने आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर इंग्लंड संघाला अनेक सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला आहे. सध्या तो उत्कृष्ट फॉर्ममध्ये असून भारताविरुद्धच्या कसोटी मालिकेत त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तो इंग्लंडसाठी चालू मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. एकदा खेळपट्टीवर स्थिरावल्यावर त्याला रोखणे प्रतिस्पर्धी संघासाठी अत्यंत कठीण होऊन बसते. या सामन्यातही तो सध्या ३६ धावांवर खेळत आहे. पाचव्या कसोटी सामन्यात २५ धावा पूर्ण करताच जो रूटने जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत () ६००० धावांचा टप्पा ओलांडला. मध्ये अशी कामगिरी करणारा तो जगातील पहिला फलंदाज ठरला आहे.

### विंडीजची पाकिस्तानवर रोमांचक मात




**फ्लोरिडा:** अष्टपैलू जेसन होल्डरने फलंदाजी व गोलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर केलेल्या नेत्रदीपक कामगिरीच्या जोरावर वेस्ट इंडिजने पाकिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात शेवटच्या चेंडूवर दोन गडी राखून सनसनाटी विजय मिळवला. या विजयासह विंडीजने तीन सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी साधत मालिकेतील आव्हान जिवंत ठेवले आहे. सलग सात टी-२० सामन्यांतील पराभवाची मालिकाही विंडीजने या विजयाने खंडित केली.प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानचा संघ निर्धारित २० षटकांत ९ गडी गमावून केवळ १३३ धावाच करू शकला. पाकिस्तानकडून हसन नवाजने सर्वाधिक ४० धावा केल्या, तर कर्णधार सलमान आगाने ३८ धावांचे योगदान दिले. विंडीजकडून जेसन होल्डरने भेदक मारा करत केवळ १९ धावांत ४ महत्त्वपूर्ण बळी घेतले.




## ७० वर्षांनंतर हॅरी ब्रूकने केला हा मोठा पराक्रम

**नवी दिल्ली, दि. ४** प्रतिनिधी

भारताचा संघ सध्या इंग्लडविरुद्ध पाचवा कसोटी सामना खेळत आहे. भारताच्या युवा संघाने या मालिकेमध्ये कमालीची कामगिरी केली आहे. या मालिकेमध्ये इंग्लडच्या संघाला टीम इंडीयाने बरोबरीची टक्कर दिली आहे. पाचवा सामना जिंकण्यासाठी इंग्लडच्या संघाला ३५ धावांची गरज आहे. तर भारताच्या संघाला विजयासाठी ३ विकेट्‌ची गरज आहे.

हा सामना खूपच रोमांचक झाला आहे. एकीकडे इंग्लंडला सामना जिंकण्यासाठी ३५ धावांची आवश्यकता असताना, टीम इंडियाला सामना जिंकण्यासाठी ४ विकेट्सची आवश्यकता आहे. सामन्याच्या चौथ्या दिवशी हॅरी ब्रूक आणि जो रूट यांनी शतके झळकावून इंग्लंडला मजबूत स्थितीत आणले. सुरु असलेल्या सामन्यामध्ये हॅरी ब्रूक याने १११ धावा धावांची खेळी खेळुन विकेट गमावली, आता त्याने शानदार शतक झळकावून ७० वर्षे जुना विक्रम मोडला.चौथ्या दिवशी हॅरी ब्रूकने शानदार फलंदाजी केली आणि शानदार शतक झळकावले.

■ हॅरी ब्रूकने केवळ ९१ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. हॅरी ब्रूकने जो रूटसह चौथ्या विकेटसाठी १९५ धावांची भागीदारी केली.यासह इंग्लंडने सामन्यात शानदार पुनरागमन केले. ब्रूक आता टीम इंडियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा तिसरा इंग्लिश फलंदाज बनला आहे. जेमी स्मिथ सध्या फलंदाजी करत आहे त्याने संघासाठी कमालीची कामगिरी केली आहे, तो टीम इंडियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा पहिला इंग्लिश फलंदाज ठरला आहे, त्याने भारताविरुद्ध सुरु असलेल्या सामन्यात ८० चेंडूत आपले शतक पूर्ण केले. त्यानंतर बेन डकेट दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याने ८८ चेंडूत आपले शतक पूर्ण केले.

■ मालिकेत टीम इंडियाविरुद्ध ब्रुकची कामगिरी खूप चांगली राहिली आहे. त्याने ५ सामन्यांच्या ९ डावात फलंदाजी करताना ४८१ धावा केल्या. या मालिकेमध्ये त्याने २ शतके आणि २ अर्धशतके केली. यादरम्यान ब्रुकची सरासरी ५३.४४ होती. ओव्हल कसोटीच्या दुसऱ्या डावात शानदार फलंदाजी करताना हॅरी ब्रुकने ९८ चेंडूत १११ धावांची शानदार खेळी केली.

## सारा झाली १३० दशलक्ष डॉलर्सच्या कंपनीची ब्रँड ॲम्बेसेडर

**मँचेस्टर, दि. ४** प्रतिनिधी

भारताचा संघ सध्या इंग्लडविरुद्ध मालिका खेळत आहे, भारताचा संघ ही मालिका ड्रॉ करण्यामध्ये यश मिळवणार की नाही हे तर वेळ आल्यावरच समजणार आहे त्याआधी आता भारतासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. क्रिकेटचा देव सचिन तेंडूलकर याने त्याच्या कामगिरीने तर जगाला चकीत केले आहेच. त्याने त्याच्या नावावर देखील अनेक विक्रम देखील केले आहेत. पण त्याचा मुलगा अर्जुन तेंडूलकर सुद्धा क्रिकेट खेळत आहे पण त्याला संघामध्ये खेळण्याची पार काही संधी मिळाली नाही.



आयपीएलमध्ये अर्जुन तेंडूलकर याला मुंबईच्या संघामध्ये संधी मिळते पण त्याला फार कमी वेळा प्लेइंग ११ मध्ये खेळण्याची संधी मिळाली आहे. तर दुसरीकडे सचिन तेंडूलकरची लेक सारा तेंडूलकर ही तिच्या फिल्डमध्ये चमतकार करत आहे. दिग्गज क्रिकेटपटूची मुलगी सारा तेंडुलकर ऑस्ट्रेलियाची नवीन पर्यटन ब्रँड ॲम्बेसेडर बनली आहे. तिने तिच्या सुंदरतेमुळे आणि शैलीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःची एक नवीन ओळख निर्माण केली आहे. खरं तर, ऑस्ट्रेलियन सरकार एक नवीन पर्यटन कंपनी सुरू करत आहे.

## कोडी रोड्सने हिसकाविली जॉन सीनाची जागा



**नवी दिल्ली, दि. ४** प्रतिनिधी

समरस्लॅम २०२५ नाईट-२ भव्य पद्धतीने संपला. झालेल्या स्पर्धेमध्ये कोडी रोड्सविरुद्ध जॉन सीनाने निर्विवाद चॅम्पियनशिपचा बचाव केला होता. दोघांमध्ये जबरदस्त सामना झाला. कोडीने अर्ध्या तासापेक्षा जास्त काळ चाललेला सामना जिंकला. तो आता नवीन चॅम्पियन बनला आहे. कंपनीतील सीनाचे राज्य संपले आहे. ने पुन्हा एकदा कोडीवर विश्वास व्यक्त केला आहे. सामन्यानंतर सीनाने कोडीला विजेतेपद सोपवले. सीनानेही हात वर करून कोडीचा आदर व्यक्त केला. चाहत्यांनी दोन्ही स्टार्सना टाळ्या वाजवल्या.कोडी रोड्स आणि चॅम्पियन जॉन सीना यांनी सामन्याची सुरुवात जबरदस्त झाली.

## पीसीबीची वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंडस्‌वर सरसकट बंदी

**लाहोर, दि. ४** प्रतिनिधी

भारत-पाकिस्तान सामन्यावरून झालेल्या वादानंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) एक मोठा आणि कठोर निर्णय घेतला आहे. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंडस्‌ स्पर्धेच्या आयोजकांवर पक्षपातीपणा आणि ढोंगीपणाचा आरोप करत, पीसीबीने भविष्यात या स्पर्धेत पाकिस्तानी खेळाडूंच्या सहभागावर सरसकट बंदी घातली आहे.हा संपूर्ण वाद पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर सुरू झाला. राष्ट्रीय भावना लक्षात घेऊन भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार दिला होता. या स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान यांच्यात दोन सामने होणार होते, मात्र भारताने दोन्ही सामन्यांतून माघार घेतली.या स्पर्धेत भारताने गट फेरीतील सामन्यातून माघार घेतली. शिखर धवन आणि सुरेश रैनासारख्या खेळाडूंनी आधीच स्पर्धेतून नाव मागे घेतले होते. त्यानंतर भारताने उपांत्य फेरीतही पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास नकार दिला, ज्यामुळे पाकिस्तानला थेट अंतिम फ ेरीत प्रवेश मिळाला. यादरम्यान सामना न खेळताही भारताला गुण देण्याच्या आयोजकांच्या निर्णयावर पीसीबीने तीव्र नाराजी व्यक्त केली.पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नियामक मंडळाच्या ७९व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

# ५ वर्षात ७ लाख कोटी रुपयांची चोरी उघड

## अर्थ राज्यमंत्र्यांनी संसदेत दिली माहिती

**नवी दिल्ली, दि.४** प्रतिनिधी

केंद्रीय जीएसटी (सीजीएसटी) क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी गेल्या पाच वर्षांत (२०२०-२१ ते २०२४-२५ पर्यंत) सुमारे ७.०८ लाख कोटी रुपयांची जीएसटी चोरी उघडकीस आणली आहे, ज्यामध्ये इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) घोटाळा केवळ १.७९ लाख कोटी रुपयांचा आहे.

ही माहिती अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी संसदेत दिली.२०२४-२५ या आर्थिक वर्षातच २.२३ लाख कोटी रुपयांची जीएसटी चोरी आढळून आली, त्यापैकी सुमारे १५,२८३ प्रकरणांमध्ये आयटीसी घोटाळ्याद्वारे ५८,७७२ कोटी रुपयांचा अपहार करण्यात आला. याच कालावधीत एकूण ३०,०५६ प्रकरणे आढळून आली, म्हणजेच या वर्षी आढळलेल्या प्रकरणांपैकी निम्म्याहून अधिक प्रकरणे आयटीसीशी संबंधित फसवणुकीची आहेत.२०२३-२४ मध्ये, सीजीएसटी अधिकाऱ्यांनी २.३० लाख कोटी रुपयांची जीएसटी चोरी शोधून काढली, त्यापैकी ३६,३७४ कोटी रुपये केवळ आयटीसी फसवणुकीशी संबंधित होते. २०२२-२३ मध्ये, जीएसटी चोरी १.३२ लाख कोटी रुपयांची होती, त्यापैकी २४,१४० कोटी रुपयांचा बनावट आयटीसीद्वारे दावा करण्यात आला होता. २०२१-२२ आणि २०२०-२१ मध्ये, हे आकडे अनुक्रमे ७३,२३८ कोटी रुपये (आयटीसी फसवणूक २८,०२२ कोटी रुपये) आणि ४९,३८४ कोटी रुपये (आयटीसी फसवणूक ३१,२३३ कोटी रुपये) होते.




### अदानीच्या शेअरमध्ये वाढ



**नवी दिल्ली:** सोमवारी अदानी पोर्ट्सच्या शेअरची किंमत २% पेक्षा जास्त वाढली. कंपनीने मासिक व्यवसाय अपडेट जारी केल्यानंतर ही वाढ झाली. बीएसईवर अदानी पोर्ट्सचे शेअर्स २.०६% वाढून १,३७४.८५ रुपये प्रति शेअर झाले. जुलै २०२५ मध्ये, अदानी पोर्ट्सने एकूण ४०.२ दशलक्ष मेट्रिक टन (एमएमटी) कार्गो हाताळला. गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत (वर्ष-दर-वर्ष) ही वाढ ८% आहे. ही वाढ प्रामुख्याने कंटेनर व्हॉल्यूममध्ये २२% ची लक्षणीय वाढ झाल्यामुळे झाली.जानेवारी ते जुलै २०२५ या कालावधीत, कंपनीने एकूण १६०.७ एमएमटी कार्गो हाताळला, जो गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत १०% वाढ नोंदवतो.लॉजिस्टिक्स क्षेत्रात, जुलैमध्ये रेल्वेने वाहून नेलेल्या वस्तूंचे प्रमाण (महसूल टन किलोमीटर ) गेल्या वर्षीच्या तुलनेत १७% वाढून ६०,९४० वीस-फूट समतुल्य युनिट्स () झाले. तथापि, जनरल पर्पज वॅगन इन्व्हेस्टमेंट स्कीम () अंतर्गत हाताळले जाणारे प्रमाण १३% ने घटून १.६१ झाले.

## बीएसएनएलचे आधुनिकीकरण | प्लॅनअंतर्गत ग्राहकांना अमर्याद कॉल करता येणार

# एक रुपयात महिनाभर ४- जी सेवा

**नवी दिल्ली, दि.४** प्रतिनिधी

सार्वजनिक क्षेत्रातील भारत संचार निगम लिमिटेड म्हणजे बीएसएनएल आधुनिकीकरण करीत आहे. ४-जी सेवा देण्यासाठी या कंपनीने पूर्ण तयारी केली असून आता ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी एक महिन्याच्या वैधतेचा ४- जी सेवा प्लॅन केवळ एक रुपयाला उपलब्ध केला आहे. भारतातील विविध शहरात कंपनीने या सेवा सुरू केल्या असून ग्राहकांना आपल्याकडे खेचण्यासाठी ही उपाययोजना केली असल्याचे समजले जाते. कंपनीने या प्लॅनला फ्रीडम प्लॅन असे नाव दिले आहे. आमच्या देशातील तंत्रज्ञानावर आधारित ४- जी सेवा ग्राहकांना अनुभवता याव्या याकरिता पुढाकार घेऊन आम्ही हा प्लॅन तयार केला असल्याचे बीएसएनएलने म्हटले आहे.या प्लॅनअंतर्गत ग्राहकांना अमर्याद कॉल करता येणार आहेत. प्रत्येक दिवसाला दोन जीबी हाय स्पीड डेटा उपलब्ध होणार आहे. तर दिवसाला शंभर एसएमएस करता येणार आहेत. बीएसएनएलचे व्यवस्थापकीय संचालक रॉबर्ट रवी यांनी सांगितले की, आमचे तंत्रज्ञान आत्मनिर्भर भारत अंतर्गत पूर्णपणे स्वदेशी बनावटीचे आहे. जगातील केवळ काही देशाकडेच हे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. आमच्या ग्राहकांना या सेवांची ओळख व्हावी यासाठी आम्ही पुढाकार घेणार आहोत. त्यामुळे मोबाईल क्षेत्रातील आधुनिक सुविधा किफायतशीर दरात ग्राहकांना उपलब्ध होणार आहेत.




■ खासगी क्षेत्रातील जिओचा असा प्लान ३४९ रुपये, भारती एअरटेलचा ३७९ रुये, वोडाफोनचा ३९९ रुपये या किमतीवर आहे. यामुळे इतर कंपन्यांचे ग्राहक बीएसएनएलकडे आकर्षित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. एका वर्षात आपली उलाढाल ५० टक्क्यांनी वाढवण्याची सूचना केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी बीएसएनएलला केली आहे.

## ३७ अत्यावश्यक औषधे स्वस्त होणार!

**नवी दिल्ली, दि.४** प्रतिनिधी

केंद्र सरकारने ३७ अत्यावश्यक औषधांचे आणि त्यांच्या सूत्रीकरणाचे किरकोळ मूल्य निश्चित केले आहे. रसायने आणि खते मंत्रालयाने शनिवारी औषध (किंमत नियंत्रण) आदेश, २०१३ अंतर्गत एक अधिसूचना जारी केली. हे किंमत नियंत्रण राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरण (एनपीपीए) द्वारे जारी केले गेले आहे. याचा उद्देश जीवनरक्षक आणि सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या औषधांना अधिक परवडणारे बनवणे आहे. सरकारच्या नवीन किंमत धोरणात संसर्ग, हृदयरोग, जळजळ, मधुमेह आणि जीवनसत्त्वाची कमतरता यासारख्या आजारांवर उपचार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचा समावेश आहे.अहवालानुसार, या नवीन किंमती प्रमुख औषध कंपन्यांद्वारे उत्पादित आणि विकल्या जाणाऱ्या ३५ फॉर्म्युलेशनवर लागू होतील.

यामध्ये पॅरासिटामोल, एटोरवास्टॅटिन, अमोक्सिसिलिन, मेटफॉर्मिन आणि जुनाट आजारांवर उपचार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काही नाविन्यपूर्ण निश्चित डोस संयोजनांसारख्या लोकप्रिय औषधांचा समावेश आहे.एसिक्लोफेनाक + पॅरासिटामोल + ट्रिप्सिन चायमोट्रिप्सिन या संयोजन टॅब्लेटमध्ये एक मोठा बदल दिसून आला आहे. हा टॅब्लेट दाहक-विरोधी म्हणून वापरला जातो.

अजिंक्य भारत
# आपलं नागपूर
नागपूर, मंगळवार, दि.५ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com



**महत्त्वाचे**

## हद्दपार आरोपीला अटक

नागपूर : जिवघेणा अपघात घडवून आणत घटनास्थळावरून पळ काढल्याप्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सदर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. माहितीनुसार, तक्रारदार महिला कस्तुरचंद पार्कजवळ खेळणी विकण्याचे काम करते. काल रविवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास तिचे सासरे प्रकाश भिकू पारधी (वय ७४) पाणी आणण्यासाठी पायी संविधान चौकाकडे जात होते. यावेळी अज्ञात बसचालकाने आपल्या ताब्यातील बस भरधाव, निष्काळजीपणाने व धोकादायक पद्धतीने चालवून त्यांना जोरदार धडक दिली. यात ते गंभीर जखमी झाले आणि त्यानंतर बसचालक घटनास्थळावरून पळून गेला. उपचारासाठी मेडिकल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

## समूहगान स्पर्धेत सहभाग

नागपूर : नागपूर पोलिसांच्या गुन्हे शाखाच्या युनिट क्रमांक एकने हद्दपार आरोपीला अटक केली. निलेश उर्फ क्लोमिक्स भिमराव मंडसकर (वय २९) असे त्याचे नाव आहे. पोलिस पथक रविवारी रात्री ८.१५ वाजता गस्तीवर असताना इंदिरा माता नगर, एमआयडीसी नागपूर येथील हनुमान मंदिराजवळ राहणारा सराईत गुन्हेगार निलेश उर्फ क्लोमिक्स भिमराव मांडसकर हा त्याच्या घरी असल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी पोहोचल्यावर पोलिसांना पाहून तो पळू लागला. पोलिसांनी पाठलाग करून त्याला ताब्यात घेतले.आरोपीच्या अभिलेखांची तपासणी केली असता त्याला परिमंडळ क्रमांक एकने आरोपीला नागपूर शहर व ग्रामीण हद्दीतून हद्दपार केले होते. मात्र, त्याने कोणतीही परवानगी न घेता पोलिस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे करण्याच्या उद्देशाने प्रवेश करून मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचे दिसून आले.

## ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा

नागपूर : अमरनगर ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने १२ ज्येष्ठ सदस्यांचा सामूहिक वाढदिवसाचा कार्यक्रम समाज भवन रामेश्वरम, हनुमान मंदिर येथे पार पडला. रामदास माहुरे, वसंत इझनकर, शेषराव ठाकरे भारत मांचमवार, प्रभाकर रासेकर, जया रासेकर, विनायक घोरमाडे, गौतम वरघट, धनराज भोयर, चंद्रकांत वाट, प्रतिभा कोशेट्टीवर, दिलीप काकडे, सिंधू भुडे या सदस्यांचा शाल व श्रीफळ प्रदान करत सत्कार करण्यात आला. यावेळी सर्वांना दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सुरुवातील सुगम संगीत सादर करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष देविदास आगरकर, उपाध्यक्ष गणपत निंबाळकर, सचिव वसंत इझनकर, रमेश जिल्हारे भोयर, शिरपूरकर, धवल चिंचुलकर, ज्योती निंबाळकर, शोभा आगरकर, गौरखेडे राजुरकर, कोहळे व इतर सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन देवीदास आगरकर यांनी केले. सामुदायिक भोजनाने सांगता करण्यात आली.

**निधन वार्ता**

## शीला पांडे



नागपूर : न्यू शुक्रवारी, राम कुलर चौक येथील रहिवासी शीला हरीश पांडे यांचे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६३ वर्षे होते. मोक्षधाम घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले. शीला पांडे यांच्या मागे एक मुलगा, दोन बहिणी आणि बराच मोठा परिवार आहे. त्या पत्रकार प्रतीक पांडे यांच्या मातोश्री होत.

# 'सीआयआय' चे विभागीय कार्यालय प्रारंभ

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरींच्या हस्ते उद्‌घाटन, उद्योगवाढीसाठी महत्वाची भूमिका बजावण्याचे आवाहन

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

विदर्भातील उद्योगवाढीला चालना देण्यासाठी, भारतीय उद्योग महासंघाने (सीआयआय) नागपुरात नवीन विभागीय कार्यालय सुरू केले आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन झाले. 'सीआयआय'ने विदर्भातील उद्योगांचे कम कुवत दुवे ओळखून, त्यांना बलस्थानांमध्ये रूपांतरित करावे, असे आवाहन गडकरी यांनी यावेळी केले.




भारतीय उद्योग महासंघ (सीआयआय) ही उद्योग आणि सरकार यांच्यात समन्वय साधून, उद्योगवाढीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणारी महत्त्वाची संस्था आहे. विदर्भातील उद्योग क्षेत्राचा विस्तार लक्षात घेऊन, 'सीआयआय'ने लक्ष्मीनगर भागात विभागीय कार्यालय सुरू केले आहे. या उद्घाटनप्रसंगी बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, 'सीआयआय'ने विदर्भातील खनिज, कोळसा, वनउत्पादन, पर्यटन आणि कापूस या उद्योगांच्या वाढीसाठीच्या शक्यतांचा अभ्यास करावा. यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. 'इंडिया ऽ१००: चार्टिंग विदर्भाज जर्नी टू डेव्हलप्ड इंडिया' या परिषदेत त्यांनी विदर्भातील पायाभूत सुविधांच्या विकासावरही भर दिला. यावेळी विविध उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### 'लॉजिस्टिक्स' चा खर्च कमी होणार

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की, चांगल्या रस्त्यांमुळे भारतातील मालवाहतुकीचा खर्च १६ टक्क्यांवरून १० टक्क्यांवर आला आहे आणि तो एकेरी आकड्यात आणण्याचा प्रयत्न आहे. विदर्भाला लागून असलेली आंध्र प्रदेशातील बंदरे मालवाहतुकीचा खर्च कमी करू शकतात. रायपूर ते विशाखापट्टणम हा ४७ हजार कोटींचा महामार्ग पूर्णत्वास येत असून, तो गडचिरोलीला जोडल्यास, येथील पोलाद आणि इतर उद्योगांना मोठा फायदा होईल.

## हिट अँड रन: मेडिकलमध्ये मृत्यू

नागपूर : जिवघेणा अपघात घडवून आणत घटनास्थळावरून पळ काढल्याप्रकरणी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सदर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली. माहितीनुसार, तक्रारदार महिला कस्तुरचंद पार्कजवळ खेळणी विकण्याचे काम करते. काल रविवारी दुपारी एक वाजताच्या सुमारास तिचे सासरे प्रकाश भिकू पारधी (वय ७४) पाणी आणण्यासाठी पायी संविधान चौकाकडे जात होते. यावेळी अज्ञात बसचालकाने आपल्या ताब्यातील बस भरधाव, निष्काळजीपणाने व धोकादायक पद्धतीने चालवून त्यांना जोरदार धडक दिली. यात ते गंभीर जखमी झाले आणि त्यानंतर बसचालक घटनास्थळावरून पळून गेला. उपचारासाठी मेडिकल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले असता डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

## विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रथम वर्ष 'पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह' ही योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्हा ठिकाणी प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुले आणि मुलींसाठी प्रत्येकी एक याप्रमाणे वसतिगृहे सुरूकरण्यात आलेली आहेत.

चालू शैक्षणिक सत्रासाठी वसतिगृह प्रवेशाकरीता प्रवेश प्रक्रिया सुरू असून अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी अर्ज करण्याची मुदत १ ते १७ ऑगस्ट २०२५ ही आहे. सदर प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन राबविण्यात येत असून, प्रवर्गनिहाय रिक्त जागांची माहिती व प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय / वसतिगृह गृहपाल यांच्यासोबत संपर्क साधावा. तसेच वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या इमाव, विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनाम व धनगर- क प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरीता 'पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना' राबविण्यात येत आहे. सदर सर्व योजनांच्या अटी शर्ती, रिक्त जागांची माहिती व अर्ज सादर करण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय / वसतिगृह गृहपालांसोबत संपर्क साधून योजनांचा लाभ घ्यावा.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

### माळी समाजातर्फे संत सावता महाराज पुण्यतिथी

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

माळी समाज विकास संस्थेच्या वतीने संत सावता महाराज पुण्यतिथी, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार तसेच इयत्ता १० वी १२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार नागो गाणार प्रमुख उपस्थित होते. सकल ओबीसी संघाचे अध्यक्ष वासुदेवराव चौधरी, कृषी अधिकारी अरविंद उपरीकर यांच्यासह हिरामण किरणामुरे, वासुदेव लांजेवार, श्रीराम बांगडे उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते ५० गुणवंत विद्यार्थ्यांना रोख रक्कम, स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सोबतच १६ ज्येष्ठ नागरिकांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष संतोष गोटफोडे यांनी केले. संचालन सचिव संजय लांजेवार यांनी केले. तर, अजय किरणापुरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दत्ता धावडे, सुरेश कामडे, विजय कामडे, अतुल वाघाडे, दत्तू किरणापुरे, गणेश कडुकर, राजेंद्र लटारे, अमोल बोरकर, आनंद बानाईत, रंजना कडुकर, अनिता किरणापुरे, समाज बांधव व विद्यार्थी उपस्थित होते.



## धोका आहेच...



नागपूर: नागपुरातील अशोक चौक येथे मोठ्या 'ट्राफिक इन्टरचेंज'चे काम सुरू आहे. भंडारा, गडचिरोली, पवनी, भिवापूर, उमरेड या शहराच्या दिशेने होणारी जिल्हा आणि आंतरजिल्हा वाहतूक याच ठिकाणातून होत आहे. अति जड वाहतूक करणारी वाहने सुद्धा धावत असतात. मात्र, वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पोलिस विभागाकडून क्वचितच कर्मचारी उपस्थित दिसून येतो. धोका मात्र सातत्याने आहे.

## विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या पुण्यस्मरणातून प्रेरणा घ्यावी

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या पुण्यस्मरणातून प्रेरणा घ्यावी, असा सल्ला आयकर आयुक्त संदीप साळुंखे यांनी दिला.

टिळक विद्यालय नागपूर येथे लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती कार्यक्रमात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाला बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक जय नारायण, संस्थेचे सदस्य योगेश्वर बुटी, रविंद्र कान्हेरे, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका आदी मान्यवर उपस्थित होते. आयुक्त साळुंखे यांनी लोकमान्य टिळकांचे युग प्रवर्तक कार्य शब्दांतून समजावून सांगितले. बदलत्या काळात विद्यार्थ्यांनी महापुरुषांकडून प्रेरणा घेऊन आपले ध्येय निश्चित करावे. इतरांपेक्षा वेगळी सकारात्मक वाट धरून स्वत:चा व देशाचा विकास करावा, असे मनोगत व्यक्त केले. साळुंखे यांनी टिळकांवर अतिशय उत्तम पोवाडा देखील सादर केला. जयनारायण यांनी विद्यार्थ्यांना आपल्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्यास आपणही कार्यक्षम पद्धतीने अभ्यास करू शकता व परीक्षेत उत्तम यश संपादन करू शकता असे सांगितले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कुंभारे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी आयकर आयुक्त संदीप कुमार साळुंखे यांचा भारत सरकारने 'उत्कृष्ट आयुक्त' म्हणून गौरव केल्याबद्दल संस्थेतर्फे शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार पार पडला. साळुंखे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी स्वत: तर्फे रोख पारितोषिक देखील दिले.




## महाराष्ट्र महसूल विभाग देशात ठरेल अग्रेसर

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

महसूल विभाग २०२९ पर्यत कशा पद्धतीने प्रगतीपथावर असेल याचे व्हिजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्याला दिले आहे. पुढील काळात आपण त्यांनी दाखविलेल्या व्हिजनवर काम करून महसूल विभाग देशात प्रथम क्रमांकावर असेल याचा संकल्प करू, असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

नागपुरात आयोजित महसूल परिषदेत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवें फडणवीस, मुख्य सचिव राजेश कुमार, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, यांच्यासह राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी उपस्थित होते. महसूल मंत्री बावनकुळे यांनी आज महाराष्ट्रातील महसूल विभागापुढे असलेल्या आव्हाने, विविध महसूल विषयक सुधारणा आणि पुढील दिशा याविषयी आपली भूमिका स्पष्ट केली. पुणे येथे एप्रिल महिन्यात झालेल्या महसूल परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रातील सहा विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली महसूल विभागातील विविध विषयांचा अभ्यास करण्याची सूचना सहा समित्या स्थापन केल्या होत्या. त्या समित्यांच्या अहवालांचे सादरीकरण परिषदेत करण्यात आले. सहा विभागीय आयुक्ताच्या समित्यांनी जेवढ्या शिफारसी केल्या आहेत त्याबाबतचे जीआर काढून जनतेला न्याय देण्याचा पूर्णपणे प्रयत्न सरकार करेल. अनेक कालबाह्य कायदे व जटील नियम पुढच्या काळात आपण काढून टाकू. जनतेला मंत्रालय गाठण्यासाठी होणारा त्रास व खर्च टाळण्यासाठी मंर्त्यांच्या अधिकाऱ्यांचे विकेंद्रीकरण करून ते अधिकारी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविणार असल्याचे महसूल मंर्त्यांनी नमूद केले. जनतेचा त्रास वाळू उपलब्ध होत नसल्यामुळे जनतेत काही ठिकाणी असलेला संताप संपविण्यात यावा. वाळूबाबत अतिशय उत्तम धोरण राज्य सरकारने आणले असून, अधिकाऱ्यांनी त्याची अंमलबजावणी करावी. जनतेला कोणत्याही स्थितीत त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, कुटुंब या सर्व घटकांना न्याय मिळेल अशा योजना आखत धोरणे तयार केली. पुढील काळात कटाक्षाने काळात करण्यात यावी, अशी अपेक्षा महसूलमंर्त्यांनी व्यक्त केली.

### प्रोटोकॉल नाकारला

महसूल अधिकाऱ्यांचा विशेषत: विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचा कामकाजाचा वेळ मंर्त्यांचे प्रोटोकॉल सांभाळण्यातच जातो. आता यापुढे प्रोटोकॉल सांभाळण्यासाठी विभागीय आयुक्त अथवा जिल्हाधिकाऱ्यांनी येऊ नये. या वेळेचा सदुपयोग त्यांनी जनतेच्या कामासाठी करावा, असे महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

**पुस्तिकेचे प्रकाशन** | **सामाजिक भावनात्मक शिक्षणाला प्राधान्य**

## मनपाच्या शाळांत 'ड्रीमकॅचर्स २०२५'उपक्रम

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

चालू शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकांच्या ५० शाळांमध्ये सामाजिक भावनात्मक शिक्षणाचा (एसईएल) उपक्रम राबविण्यात येणार आहे. नागपूर महानगरपालिका व रेनवातीओ या स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., वेस्टर्न कोलफिल्डचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश द्विवेदी, शिक्षणाधिकारी साधना सयाम, सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र जिचकार, रेनवातीओचे संस्थापक नकुल अग्रवाल, श्रद्धा अग्रवाल व्यासपीठावर उपस्थित होते. मागील वर्षी महानगरपालिकेच्या २० शाळांमध्ये सामाजिक भावनात्मक शिक्षणाचा हा उपक्रम राबविण्यात आला. परिणाम मिळाल्यानंतर यंदापासून ५० शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. शाळांमध्ये मध्यम व निम्न मध्यमवर्गातील विद्यार्थी व भावनात्मक शिक्षण होण्याची आवश्यकता असल्याचे वैष्णवी बी. म्हणाल्या. वेकोलिचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक जयप्रकाश द्विवेदी म्हणाले, की चांगल्या उपक्रमांना मदत करण्याचा नेहमीच वेकोलिचा प्रयत्न राहिला आहे. महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षणच नव्हे तर चांगले वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल, एका चांगल्या बदलाचे संकेत देत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. मागील वर्षी उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या ३५०० विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी व शिक्षिकांनी अनुभव कथन केले. विद्यार्थ्यांना येणारा राग, चिडचिडेपणावर नियंत्रण मिळाल्याचे अनुभव त्यांनी सांगितले. कार्यक्रमात सामाजिक भावनात्मक शिक्षण 'ड्रीमकॅचर' उपक्रमाच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मनपा शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आदी उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. नकुल



## आनंद ज्येष्ठ नागरिक मंडळाची सभा

नागपूर, दि. ४ प्रतिनिधी

आनंद ज्येष्ठ नागरिक मंडळाची मासिक सभा नुकतीच उत्साहात पार पडली. ज्येष्ठांना मिळणाऱ्या विविध प्रकारच्या शासकीय सेवांसह शासकीय सेवेतून निवृत्त झालेल्यांसाठी निवृत्ती वेतनात वेळोवेळी झालेल्या बदलांबाबत माहिती देण्यात आली.

सभेला मधुकर दहीकर, सेवानिवृत्त राज्य कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष प्रल्हाद शेंडे उपस्थित होते. तद्नंतर स्वरांजली गायन समूहाने 'भुले बिसरे गित' हा संगीतमय कार्यक्रम सादर केला. मेघा देशमुख, शशिकांत देशमुख, प्रफुल्ल पेंदाम, रोशनी सावरकर, सेवानिवृत्त सहायक पोलिस आयुक्त अनिल बोबडे यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सभेमध्ये मंडळाच्या ३० ज्येष्ठांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमात काशीनाथ ठवरे, श्रिकांत आंबटकर, राजेंद्र सुलाखे, उमेश वाघमारे, पंढरीनाथ ढेंगरे, दयाराम कुरसकर, घनश्याम हटवार, प्रतिमा काळे, नीता भुते, लता काळे, सुधीर फटींग, अशोक धाबेकर, प्रणिती कळमकर, आरती डांगरे, सौ.निकम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सुनंदा जिरापुरे यांनी केले. सतिश निकम यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली. स्नेहभोजन व्यवस्था आनंदराव माळवे यांनी सांभाळली.



अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, मंगळवार, दि.५ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

## महत्त्वाचे

### मृतक अनोळखी इसमाची ओळख पटविण्याचे रेल्वे पोलिसांचे आवाहन

**अकोला :** ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी अंदाजे १०.१५ वाजता अकोला रेल्वे स्थानकाच्या यार्डजवळील कि.मी. नं ५८४/२६ येथे एक अनोळखी पुरुष व्यक्ती (वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष) याने गाडी क्र. ११०३९ समोर उडी घेऊन आत्महत्या केली. लोको पायलटने ही माहिती रेल्वे पोलीसांना दिली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे पोलीस स्टेशन अकोला येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून प्रेत शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले.मयताचे वर्णन : उंची ५ फूट ५ इंच, निमगोरा रंग, मजबूत बांधा, काळे-पांढरे वाढलेले केस व दाढी- मिशी, गळ्यात लाल-काळा धागा, कमरेला काळा धागा, कानात पिवळ्या रंगाची बाली, हिरव्या रंगाच्या पट्ट्यांचा शर्ट व पांढऱ्या रंगाची फुलपँट. सदर मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.

### शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष यांचा जिल्हा दौरा

**अकोला :** कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील हे दि. ७ ऑगस्ट रोजी अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. ॲड. हेलोंडे पाटील यांचे गुरूवार, दि. ७ ऑगस्ट रोजी शेगावहून स. ११ वा. बाळापूर विश्रामगृह येथे आगमन व तहसूलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी यांच्या समवेत तालुक्यातील शेतकरी आत्महत्या व चारा लागवड यासंबंधी चर्चा. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना भेट, तद्नंतर चारा लागवडी ठिकाणास भेट व पाहणी. दुपारी १ वाजता पातूर जि. अकोलाकडे प्रयाण. दुपारी १.३० वाजता पातूर विश्रामगृह येथे आगमन व शेतकरी आत्महत्या व चारा लागवड यासंबंधी चर्चा करणार आहेत.

### अकोट उपविभागात नवे नेतृत्व

**अकोला :** अकोट उपविभागाच्या पोलीस व्यवस्थेला नवे नेतृत्व लाभले आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक (एएसपी) अनमोल मित्तल यांची ठाणे ग्रामीण येथे अप्पर पोलीस अधीक्षक पदावर पदोन्नती झाल्यानंतर त्यांच्या जागी नियुक्त करण्यात आलेले परिविक्षाधीन आयपीएस अधिकारी निखिल बसवराज पाटील यांनी अखेर सोमवारी पदभार स्वीकारला. त्यांच्या कार्यशैलीबाबत नागरिकांमध्ये विशेष उत्सुकता असून, कायदा-सुव्यवस्थेच्या अधिक दृढ अंमलबजावणीसाठी त्यांच्याकडून ठोस अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

# विभागीय आयुक्तांकडे आज अहवाल सादर होणार

## दलित वस्ती कामांची विभागीय समितीकडून चौकशी पूर्ण

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. ४ :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास (दलित वस्ती) योजनेंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेमार्फत जिल्ह्यातील कामांच्या निवडीत अनियमितता झाल्याच्या आमदार रणधीर सावरकर यांच्या तक्रारीवरून विभागीय चौकशी समितीने सखोल चौकशी केली आहे. या समितीकडून मंगळवार (ता.५) विभागीय आयुक्तांकडे अहवाल सादर करण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या दलित वस्ती विकास योजनेच्या कामांच्या निवड प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा मुद्दा आमदार रणधीर सावरकर यांनी विधिमंडळाच्या गेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित करीत, यासंदर्भात जिल्हा परिषदेचे तत्कालीन समाजकल्याण अधिकारी हरिनारायण परिहार व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्याविरुद्ध तक्रार करून कारवाई करण्याची मागणी शासनाच्या ग्रामविकास विभागाकडे तक्रार केली होती. या प्रकरणात विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय विभागीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांच्या मार्गदर्शनात चौकशी समितीचे सदस्य यवतमाळ येथील समाजकल्याण सहायक आयुक्त मंगला मून, वाशिम येथील समाजकल्याण सहायक आयुक्त पीयूष चव्हाण, यवतमाळ जिल्हा परिषदेचे लेखाधिकारी, प्रादेशिक उपायुक्त कार्यालयातील निरिक्षक आणि वाशिम जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाचे निरीक्षकांच्या समितीने जिल्हा परिषदेत दाखल होत दलित वस्तीच्या कामांची निवड यादी, आराखडा, प्रशासकीय मान्यता आदी कागदपत्रांची तपासणी केली.

> ❑ शासन निर्णयानुसार ही कामे मंजुर केली कां? याची पुर्नतपासणी करण्यात आली असुन या प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांच्याकडून तपासणीचा अहवाल आज विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

# २५ लाखांचे सोने घेऊन कारागीर फरार

## शहरातील प्रतिष्ठित सराफाने दाखल केली तक्रार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. ४ :** शहरातील सुप्रसिद्ध श्री वैष्णवी ज्वेलर्स आर्ट या दागिन्यांच्या दुकानातून तब्बल २५१ ग्रॅम ५२० मिली ग्रॅम सोन्यासह अंदाजे २५लक्ष लक्ष ४६हजार ६१४ रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात दुकानात २२ वर्षांपासून विश्वासाने काम करणारा मुक्तीपद शरद मन्ना नामक सोने कारागीर फरार झाला असून, सिटी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये कलम ३१६(४) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी सुधीर राजाभाऊ देशमुख (५०), व्यवसायाने सराफ, रा. गोकुळ कॉलनी, जवाहर नगर, अकोला यांनी सविस्तर तक्रार देताना सांगितले की, त्यांचे जैन मंदिरासमोर श्री वैष्णवी ज्वेलर्स आर्ट नावाचे अधिकृत परवानाधारक दागिन्यांचे दुकान आहे. सन २००३ पासून त्यांनी मुक्तीपद शरद मन्ना (रा. झुबा अपार्टमेंट, काला चबुतरा, अकोला मुळगाव: काली तोला, भूतासयापात, पश्चिम मिदनापूर, पश्चिम बंगाल) याला कारागीर म्हणून कामावर ठेवले होते.

त्याच्यावर विश्वास ठेवून दररोजचे व्यवहार होत होते. परंतु दि. ०८ जून २०२५ रोजी मन्ना याच्याकडे २५१ ग्रॅम ५२० मिली ग्रॅम सोने शिल्लक होते. या सोन्याचे दागिने तयार करून परत करणे अपेक्षित होते. मात्र, वेळोवेळी विचारणा करूनही तो विविध कारणे सांगत होता. अखेर दि. २६ जुलै २०२५ रोजी त्याच्याशी संपर्क केल्यानंतर संशयास्पद वागणूक लक्षात आली. पुढील दिवशीपासून त्याचा मोबाईल बंद आहे.

देशमुख यांनी मुक्तीपदच्या नातेवाईक व मित्रांशी संपर्क साधला असता, तो गावी गेल्याचे सांगण्यात आले. मात्र, अधिक माहिती कुणाकडेही नव्हती. त्यामुळे देशमुख यांनी फसवणूक झाल्याची खात्री पटवून पोलीस अधीक्षक अकोला यांना लेखी तक्रार दिली, आणि आज सिटी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये अधिकृत तक्रार दाखल केली आहे. पोलीस निरीक्षकांच्या कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू असून, लवकरच यामध्ये पुढील माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा कारागीर गेल्या दोन दशकांहून अधिक काळ दुकानात कार्यरत होता. त्यामुळे सराफाने त्याच्यावर अतिशय विश्वास ठेवला होता. मात्र, हा विश्वासघात झाल्याने व्यवसायिक वर्तुळात चिंता व चर्चेला उधाण आले आहे.

# मद्यपान करणाऱ्या ९८ जणांवर कारवाई

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ४ :** सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी अकोला पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मोठी मोहीम राबवत सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्या ९८ जणांवर कारवाई केली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम ३ ऑगस्ट रोजी एकाच दिवशी राबविण्यात आली.

'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांना कडक निर्देश देण्यात आले होते की, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून गोंधळ घालणाऱ्या, भांडणे करणाऱ्या आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर त्वरित आणि कठोर कारवाई करावी. या आदेशानुसार पोलिसांनी शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी धाडसत्र राबवून अशा प्रकारात अडकलेल्या इसमांविरोधात संबंधित कलमांखाली कारवाई केली. या मोहिमेत ९८ इसमांवर कारवाई करण्यात आली असून, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ८५ अंतर्गत २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, काही ठिकाणी नागरिकांच्या तक्रारीवरून तातडीने पोलीस दाखल झाले आणि संबंधित इसमांना ताब्यात घेतले. या संपूर्ण कारवाईदरम्यान जिल्ह्यात शिस्त आणि कायदा राखण्यात पोलिसांना यश मिळाले.

पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांनी स्पष्टपणे सांगितले की, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, गोंधळ घालणे किंवा इतर असामाजिक कृत्य करणाऱ्यांविरुद्ध शून्य सहिष्णुता धोरण राबवले जाईल. प्रत्येक ठाणेदाराने त्याच्या हद्दीत यावर लक्ष ठेवावे आणि जनतेच्या सहकार्याने अशा प्रवृत्ती रोखाव्यात.

अकोला पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणे हा कायद्याने शिक्षनीय गुन्हा आहे. अशा कृत्यामुळे केवळ स्वतःचीच नाही, तर इतरांचीही सुरक्षितता धोक्यात येते. त्यामुळे कुठेही असे प्रकार दिसून आल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात कळवावे.

# श्री. राज राजेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी...





**अकोला जुन्या शहरातील अकोल्याचे आराध्य दैवत श्री. राज राजेश्वर मंदिर येथे श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती तसेच दर सोमवारी श्री.राज राजेश्वर मंदिर समितीच्या वतीने भाविकांना प्रसादाचे वितरण केल्या जाते तसेच शहरातील कावड धारी भाविकांनी जिल्ह्यातील गांधीग्राम येथून पूर्णा नदीचे पवित्र जल आणुन श्री.राज राजेश्वर महाराजांना जलाभिषेक करण्यात आला.. ( छाया. संजय ताथुरकर )**

# जिल्ह्यातील ८२० लाभार्थ्यांना निवड पत्र देण्याची प्रक्रिया सुरू

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ४ :** जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभार्थी मंजूर केल्यानंतर आता पात्र मंजुर लाभार्थ्यांना पंचायत समितीस्तरावरून निवड पत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या सेस फंडातील या योजनांसाठी एक कोटी आठ लाखाचा निधी मंजुर आहे. या योजनांसाठी प्राप्त अर्जांची छाननी करण्यात आली असून बुधवारी जिल्हा परिषदेच्या संविधान सभागृहात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीने सन २०२५-२६ या वर्षाकरिता एकूण ८२० लाभार्थ्यांची पंचायत समिती निहाय योजना निहाय सोडत प्रक्रिया लॉटरी पद्धतीने राबविण्यात आली. या योजनेत ९० टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना एचडीपीई पाईप पुरविणे ६५ लाभार्थी, सर्वसाधारण शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानावर पीव्हीसी पाईप पुरविणे ५८ लाभार्थी, मनुष्य चलित पेरणी यंत्र पुरविणे ७१ लाभार्थी, ९० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना इलेक्ट्रीक पंप पुरविणे ओपन वेल सबमर्सीबल पंप ५ एचपी १३३ लाभार्थी, मनुष्य चली बीज प्रक्रिया यंत्र पुरविणे ७७ लाभार्थी, सोलर, विद्युत चार्जींग झटका मशिन शेतीच्या तार कंपाऊंड करिता ३०० लाभार्थी, ब्रश कटर यंत्र पुरविणे ६७ लाभार्थी असे एकूण ८२० लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. या मंजुर लाभार्थ्यांना पंचायत समितीस्तरावरून निवड पत्र वितरीत करण्यात येत असुन लाभार्थ्यांकडून संबंधित साहित्य खरेदी करून त्यांची देयके सादर करण्यात आल्यानंतर लाभार्थ्यांना निधी वितरण करण्यात येणार आहे.

# जिल्हा परिषद प्रभाग रचनेवरील आक्षेपांवर आज सुनावणी

**अकोला :** जिल्हा परिषद व त्याअंतर्गत जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेवर मुदतीत दाखल करण्यात आलेल्या ३२ आक्षेप व हरकतींचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अमरावती विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात आला आहे. या आक्षेपांवर विभागीय आयुक्तांसमोर मंगळवार (ता.पाच) सुनावणी घेण्यात येणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या आगामी निवडणुकांसाठी जिल्हा परिषदेचे ५२ गट आणि त्याअंतर्गत जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांच्या १०४ गणांच्या प्रारुप प्रभाग रचनेची अधिसूचना गेल्या १४ जुलैला प्रसिद्ध करण्यात आली होती. या अधिसूचनेसंदर्भात आक्षेप व हरकती संबंधित तहसीलदारांकडे दाखल करण्याची मुदत २१ जुलैपर्यंत होती. त्यानुसार विहित मुदतीत जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेवर जिल्ह्यात ३२ आक्षेप दाखल करण्यात आले असून, या आक्षेपांचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाने अमरावती विभागीय आयुक्तांकडे सुनावणीसाठी सादर केला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेसंदर्भात दाखल झालेल्या आक्षेप हरकतींवर अमरावती विभागीय आयुक्तांसमोर सुनावणी झाल्यानंतर अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांमार्फत येत्या १८ ऑगस्टपर्यंत राज्य निवडणूक आयोग किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहे.

# मोटारसायकल चोरी प्रकरणातील आरोपी ताब्यात

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. ४ :** सिटी कोतवाली पोलिसांच्या डी.बी. पथकाने एक मोठा खुलासा करत सात मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांप्रकरणी एक आरोपी ताब्यात घेतला असून त्याच्याकडून ३ लक्ष७० हजार रुपयांचा एकूण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, व शहर उपविभागीय पोलीस अधिकारी सतीष कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

०२ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ९:१५ ते ९:३० च्या सुमारास फिर्यादी प्रमोद रामकृष्ण नंदागवळी (५४) रा. तारफैल, अकोला यांनी त्यांचे पुतण्याच्या नावावर असलेली यामाहा एफझेडएस एम एच-३०-बी एम-०८६८ किंमत ८० हजार रुपये गांधी रोडवरील झी महासेल समोर उभी केली होती. कपडे खरेदी करून परत आल्यानंतर त्यांनी लक्षात घेतले की, मोटारसायकल चोरीस गेली आहे.

त्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस स्टेशनला रिपोर्ट दाखल केला. कोतवाली पोलिसांनी तातडीने पावले उचलत या चोरीच्या गुन्ह्याचा तपास सुरू केला तपासादरम्यान डी.बी. पथकाने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे आरोपी रोहित उमेश जावळे (२३), रा. सिंधी कॅम्प, अकोला याला अटक केली. तो स्वतः मोटारसायकल मॅकेनिक असून चोरलेल्या गाड्यांचे चेसीस व इंजिन क्रमांकात फेरफार करून बनावट क्रमांक लावून त्यांचा वापर करत होता. तपासात पोलिसांनी सात दुचाकी जप्त केला आहेत या गाड्यांचे चेसीस व इंजिन क्रमांक खोडून बनावट क्रमांक बसवण्यात आले होते. मूळ मालकांचा शोध घेणे सुरू आहे.

**खिशाला कात्री** | **कंत्राटदार करणार कचरा संकलन**

# कचरा घंटागाडीचे दर वधारणार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. ४ :** घरोघरी सुरु असलेले कचरा घंटागाडीतून कचरा संकलनाचे काम पुढील महिन्यापासून कंत्राटी पद्धतीने केले जाणार आहे. मात्र राज्य शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार आता कचरा घंटा गाडीचे दर ३० रुपयावरुन ५० रुपये द्यावे लागणार आहे.

स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत घरोघरी निघणारा कचरा संकलनासाठी कचरा घंटा गाड्या सुरु करण्यात आलेल्या आहेत. या कचरा घंटागाड्या शहराच्या काना-कोपऱ्यात जावून कचरा संकलन करतात. जमा झालेला कचरा डम्पींग ग्राऊंड तसेच खडकी येथील केंद्रावर टाकला जातो. तेथून हा कचरा घनकचऱ्यातून जैविक खत निर्मिती कारख्यान्यावर नेला जातो. महापालिकेच्या कचरा घंटागाडीवरील वाहन चालकांना महापालिकेकडून वेतन दिले जात नसले तरी नागरिकांकडन दरमहा दिले जाणारे ३० रुपये वाहन चालक घेतात. डिझेलचा खर्च महापालिकेला करावा लागतो. यामुळे महापालिकेला वर्षांकाठी कोट्यवधी रुपयाचा खर्च करावा लागतो. या बाबी विचारात घेवूनच कचरा संकलनाचे काम कंत्राटदाराकडून करण्याचे निश्चित करण्यात आले होते. निविदा प्रक्रिया पार पडल्या नंतर नागपूर येथील एका कंपनीला हे काम देण्यात आले आहे. कंपनीसोबत केलेल्या करारनाम्यानुसार महापालिका कंत्राटदाराला १०० कचरा घंटागाड्या दिल्या जाणार आहेत तर ५० कचरा घंटागाड्या कंत्राटदार पुरविणार आहे. हे कंत्राट पाच वर्षासाठी देण्यात आले आहे. जवळपास सर्व सोपस्कार पूर्ण झाले असून पुढील महिन्यापासून कंत्राटदार घरोघरी जावून कचरा संकलनाचे काम सुरु करणार आहे. कंत्राटदार तुर्तास घरोघरी जावून कचरा संकलनाचे काम करणार असून सार्वजनिक ठिकाणी निर्माण होणारा कचरा संकलनाचे काम महापालिकेकडून स्वतःच्या ट्रॅक्टरद्वारे केले जाणार आहे. कचरा घंटागाडीचे दर राज्य शासनाने निश्चित केले असून आता घरोघरी जावून कचरा संकलनासाठी ३० रुपया ऐवजी ५० रुपये द्यावे लागणार असून हे दर १००, २१०, ५०० ते १००० रुपये राहणार आहेत. कंत्राटदाराला कचरा घंटागाडीची देखभाल दुरुस्ती करावी लागणार आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना प्रमाणपत्रासह चावीचे वाटप

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. ४ :** महसूल सप्ताह आज दिनाक ४ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत कापशी रोड येथे ग्रामपंचायत महसूल सप्ताह अभियान अंतर्गत ज्या लाभार्थीचे घरकूल पूर्ण झालेले आहे, अशा लाभार्थीना प्रमाणपत्र व चावी वाटपचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रकल्प संचालक जि.ग्रा.वि.यंत्रणा विनय ठमके उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे गट विकास अधिकारी प्रेमा पटोकार , सहा प्रकल्प अधिकारी सुमेध चक्रनारायण, तालुका प्रोग्रामर वाघमारे, विस्तार अधिकारी बनसोड, कापशी रोडचे सरपंच अंबादास उमाळे, कापशी तलाव चे सरपंच विठ्ठल पाटील चतरकर, ग्रामपंचायत सदस्य व घरकूल विभागा सर्व ग्रामीण गृह निर्माण अभियंता निलेश वाघमारे, अधिकारी पजई उपस्थित होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांच्या हस्ते लाभार्थ्यांना घरकुलाच्या चावीचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास कर्मचारी भांडे यांच्यासहलाभार्थी उपस्थित होते.

### महत्त्वाचे

## महाराष्ट्र स्वयंसेवी संस्थेच्या वाशिम जिल्हाध्यक्षपदी राऊत



**मंगरुळपीर :** साहित्यरत्न डॉ अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र एन. जी. ओ. समिती ची बैठक ११ वा वर्धापन दिन सांस्कृतिक कला केंद्र दादर माटुंगा (पश्चिम ) मुंबई येथे साजरा करण्यात आला सदर कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्यातून प्रत्येक जिल्हा अध्यक्ष तसेच जिल्हा उपाध्यक्ष व जिल्हा संपर्क प्रमुख तसेच विभागीय अध्यक्ष यांना बोलावण्यात आले होते. कार्यक्रम महाराष्ट्र एन. जी. ओ. समिती अध्यक्ष डॉ. युवराज येडुरे तसेच राज्य उपाध्यक्ष डॉ. सुनीता ताई मोडक व राज्य कार्यकारणी उपस्थित होती पुढील कार्यक्रमाची दिशा व अधिवेशनना बाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम करीता वाशीम जिल्हा अध्यक्ष देवानंद हरिभाऊ राऊत जिल्हा उपाध्यक्ष श्री प्रेरणा फाऊंडेशन चे अध्यक्ष आशिष गजानन इंगोले तसेच जिल्हा संपर्क प्रमुख राजु भाऊ पांढरे यांची उपस्थिती होती.

## सुपिनाथ महाराज मंदिरात पंचमी निमित्ताने महाप्रसाद



**मुंडगाव :** अकोट तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील सुपिनाथ महाराज शिव मंदिरात पंचमी निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.या वेळी भाटे मंडळींनी ठाव्यांच्या भजनाने आरती करून प्रसाद वितरण करण्यात आला.या वेळी या संस्थानचे अध्यक्ष गजानन वारकरी, महादेव आखरे, बाळासाहेब आखरे,तसेच भाटे मंडळी सदाशिव खरपकार, विश्वनाथ ढोले, साहेबराव खराटे,कमलाकर ढोकणे,रामरतन पाथ्रीकर, सुनील कडु,रघुनाथ म्हैसने, अमोल सोनटक्के, गोपाल खलोकार, भानुदास वानखडे, अशोक शेलकर,विजय लोंदे, माणिक बहाकार, रमेश आखरे, बाळु सासनकर,लक्ष्मण भारसाकळे, उत्तम थोटे, गजानन येवतकार ,भास्कर पोहोकार ,बापुराव घनबहादुर, वासुदेव लहाने, रोहित शेलकर,प्रभुदास म्हैसने,भरत आसोले यांनी या मध्ये सहभाग घेऊन सदर पंचमी उत्सव साजरा करण्यात आला. आणी शेवटी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.तसेच महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घेतला.व या कार्यक्रमाला गावातील असंख्य भाविक भक्तांनी हजेरी लावली.

### निधन वार्ता

## विलास मिसाळ



**दानापूर :** येथील प्रतिष्ठित नागरीक अनिल मिसाळ यांचे मोठे भाऊ स्व: विलास नामदेवराव मिसाळ यांचे वयाच्या ५६ व्या वर्षी अल्पशाजाराने निधन झाले. स्व: विलास मिसाळ हे अकोट ग्रामीण पोलिस स्टेशन ला सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावर रुजू होते. त्यांच्या मागे आई, पत्नी एक मुलगा,तीन मुली, चार बहीणी बराच मोठा आप्तपरिवार आहे.

# 'त्या' कंत्राटी बसचालकाने केला बालकांचा विनयभंग!

## आरोपीला अटक, कारागृहात रवानगी

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**बाळापूर, दि. ४ :** देगाव येथील एका कंत्राटी स्कुल बस चालक गजानन समाधान भगत याने दोन ८ वर्षीय विद्यार्थ्यांसोबत वेगवेगळ्या दिवशी विनयभंग केल्याचे कृत समोर आले. या प्रकरणी तक्रारी वरुन गुन्हा दाखल होऊन त्या कंत्राटी बस चालकांला अटक करून आज त्याची कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.



आरोपी गजानन समाधान भगत याचा विद्यालयासोबत करार झाला आहे तो स्कुलबस देगाव ते वाडेगाव येथील श्री जागेश्वर विद्यालयामध्ये स्वतः च्या बसने विद्यार्थ्याला शाळेत ने आण करत असे. तो कंत्राटी बस चालक असल्यामुळे पालक आपल्या पाल्याला बस चालकांच्या विश्वासावर शाळेत पाठवत होते. मात्र त्याने २ वेगवेगंळ्या दिवशी त्या अल्पवयीन बालकांना वेगवेगळी आमिषे देत किळसवानी प्रकार करत होता.आरोपीने लहान बालकाला आपल्या घरी दि २ ऑगस्ट २५ रोजी १० ३० वाजता बोलावून तुला कांचोड्या देतो म्हणून असे आमीष देऊन घरी बोलावले व अंगावरुन हात फिरविल्याचे वाईट कृत्य केल्याची तक्रार बाळापूर पोलीस स्टेशनला दि ३ ऑगस्ट रोजी दुपारी २,वाजता झाल्याने त्या आधारे गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली.

गुन्हा क्र ३७३ / २५, ७४, ७६, ३५१ (२ ),३५२भदवि कलमसह ८, १२ पोक्सो दाखल करण्यात आला पुढील तपास ए पि आय सुरोशे यांच्या मार्गदर्शनात ए एस आय शिवकुमार वर्मा करीत आहे.

> त्या बसचालकांचा व शाळेचा काही संबंध नाही आम्ही फक्त त्यांच्याकडून प्रमाणपत्र मागून घेतले होते. त्यांनी केलेल्या घृणास्पद कृत केल्याने त्याच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हावी
>
> **- गोपल मानकार**
>
> मुख्याध्यापक जगेश्वर विद्यालय वाडेगाव

## मुंडगाव येथे महसूल सप्ताह निमित्त ग्रामपंचायतमध्ये विविध दाखल्यांचे वाटप

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मुंडगाव, दि. ४ :** अकोट तालुक्यातील मुंडगाव मंडळातील असलेल्या गावात विविध प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात येत आहेत.या सप्ताहात दि.४ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताह निमित्य राजस्व मंडळ मुंडगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि.४ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहाच्या अनुषंगाने महसूल मंडळ मुंडगाव येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या अभियानात शेतकरी व निराधार व गावकऱ्यांना फार्मर आयडी, डीबीटी, श्रावणबाळ,संजय गांधी योजना, ह्यातिचे प्रमाणपत्र वारस फेरफार, उत्पन्नाचे दाखले, सातबारा, ८ अ चे वाटप करण्यात आले व या वेळी सर्व महसुली योजनांची माहिती सुद्धा देण्यात आली या योजनेचा गावातील नागरिकांनी लाभ घेतला यावेळी प्रभारी सरपंच तुषार पाचकोर,पं.स. सदस्य ज्ञानेश्वर दहिभात व ग्रा.पं. सदस्य पती अजिज अहेमद,नितीन गाडगे, माजी पो.पा.बाळकृष्ण भगेवार,बाळासाहेबआखरे, मंडळ अधिकारी मनोहर अढाऊ, तलाठी आशेर परमार्थ, राहुल बंकेवार, रितेश केळकर,पवन अग्रवाल, प्रज्ञा गावंडे, अनिल रावणकर, गुणवंत लहाणे,शेख सलीम, गणेश पातडे,प्रतिक्षा म्हसाळ, रमेश भेले, गटसचिव तुषार देशमुख सह तलाठी व गावातील असंख्य नागरिक तसेच ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

## वारकरी शिक्षणसंस्थेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोट, दि. ४ :** संस्कार श्रद्धा आणि सेवाभाव यांची त्रिवेणी म्हणजेच वारकरी परंपरा! या दिव्य परंपरेच्या उज्ज्वल संगतीत श्री क्षेत्र श्रद्धासागर अकोट येथील वारकरी शिक्षणसंस्थेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप करण्याचा एक प्रेरणादायी उपक्रम नुकताच संपन्न झाला.

या उपक्रमाचे औचित्य होते. अकोल्यातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते गुलाबरावजी देशमुख यांच्या ८१ व्या जन्मदिनीचे.त्यांच्या सामाजिक वारशाचे स्मरण करत त्यांच्या सुपुत्र डॉ.कृष्णकांत गुलाबराव वक्टे यांच्या सहकार्याने आणि सेवाभावातून या उपक्रमाला मूर्त स्वरूप देण्यात आले. हा कार्यक्रम ग्राम राजुरा (ता. अकोट)येथे संस्थेचे उपाध्यक्ष श्री.महादेवराव ठाकरे यांच्या मातोश्रींच्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाच्या पावन वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ,अकोट संचलित सद्गुरु जोग महाराज शिक्षण संस्था,आळंदी देवाची उपशाखा श्री क्षेत्र श्रद्धासागर,अकोट यांच्यावतीने करण्यात आले होते.या पावन प्रसंगी श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेव महाराज महल्ले,उपाध्यक्ष महादेवराव ठाकरे, ज्येष्ठ समाजसेवक गजानन हरणे, डॉ. कृष्णकांत वक्टे, विजय भटकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी लेटरबुक, पेन व अन्य शैक्षणिक साहित्याचे किट वाटप करण्यात आले. या कार्यक्रमा दरम्यान, संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. वासुदेव महाराज महल्ले यांच्या हस्ते डॉ. कृष्णकांत वक्टे, गजानन हरणे, विजय भटकर यांचा शाल व श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात ह.भ.प. आत्माराम महाराज वाकोडे, ह.भ.प. उमेश महाराज मोहोकार, ह.भ.प.राम महाराज गाढे, ह.भ.प.ऋषिकेश महाराज सोनोने, सुनीलबुवा कोरडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन ह.भ.प.अंबादास महाराज मानकर यांनी अत्यंत समर्पक शैलीत केले. या पवित्र उपक्रमाचा समारोप महाप्रसाद वितरणाने झाला.

## महसूल सप्ताहा निमित्त मंगरूळपीरमध्ये दाखल्यांचे वितरण

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मंगरुळपीर, दि. ४ :** राजस्व मंडळ मंगरुळपीर येथील मुख्यालय मध्ये छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान ४ ऑगस्ट रोजी राबविण्यात आले . यावेळी नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी राजेश ढोबळे हे हजर होते.

या अभियानामध्ये भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी तसेच मंडळ स्तरावरील सर्व ग्राम महसूल अधिकारी तसेच सर्व ग्राम महसूल सेवक नगर परिषदेचे कर्मचारी पोलीस विभागातील कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन सुवर्धन खिल्लारे ग्राम महसूल अधिकारी यांनी केले.





कार्यक्रमाप्रसंगी उत्पन्नाचे दाखले रहिवास प्रमाणपत्र जातीचे दाखले संजय गांधी श्रावणबाळ योजने संबधित कागदपत्रे तसेच ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र आभार निवडणुकी संबंधित कागदपत्रे यांचे वितरण करण्यात आले तसेच याप्रसंगी आत्महत्याग्रस्त शेतकरी यांच्याशी वैयक्तिक संवाद साधून त्यांना लागणाऱ्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत आश्वासित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राजेश ढोबळे नायब तहसीलदार मंगरूळपीर यांनी भूषविले तसेच संपूर्ण कार्यक्रमांमध्ये मंगरूळपीर मंडळातील तलाठी सुवर्धन खिल्लारे उल्हास पांडे किशोर भावके तसेच कार्यक्रमाला सर्वात जास्त सहकार्य आर आर खुळे यांनी केले तसेच सर्व महसूल सेवक कार्यक्रमाला उपस्थित होते.याप्रसंगी मंडळ अधिकारी गोवर्धन मनवर यांनी सर्व उपस्थित शेतकरी बांधव यांना शासनाच्या विविध योजना ज्यामध्ये सलोखा योजना शासनाच्या श्रावणबाळ इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना तसेच पीएम किसान योजना तसेच अन्नपुरवठा विभागातील योजना व भूमी अभिलेख विभागातील शेतकऱ्यांची संबंधित योजना यासंदर्भात माहिती दिली तसेच ॲग्री स्टॅग संदर्भात लोकांना असणाऱ्या अडचणी यासंदर्भात देखील मार्गदर्शन करण्यात आले.

## शालेय साहित्याच्या सवलतीच्या महासेलचे उद्घाटन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मंगरूळपीर, दि. ४ :** शिक्षण हा समाज परिवर्तनाचा केंद्रबिंदू आहे, आणि विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. याच उद्देशाने मंगरूळपीर शहरात विद्यार्थ्यांसाठी प्रथमच शालेय साहित्याचा विशेष सवलतीचा महासेल आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन स्थानिक आमदार श्यामभाऊ खोडे यांच्या हस्ते तर भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमभाऊ चितलांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य कार्यक्रमात संपन्न झाले. या उपक्रमामुळे परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांना थेट लाभ मिळणार आहे.



या महासेलचे आयोजन राजेंद्र प्रिंटिंग प्रेस या शहरातील जुन्या आणि प्रतिष्ठित संस्थेच्या वतीने, संचालक सुनील मालपाणी यांनी केले असून, ४ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. रक्षाबंधन आणि स्वातंत्र्य दिन या दोन पावन पर्वांचे औचित्य साधून, गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना अत्यंत माफक दरात शालेय साहित्य उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमामागील उदात्त हेतू आहे.कार्यक्रमात बोलताना आमदार श्यामभाऊ खोडे म्हणाले, ''शालेय साहित्याचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने अनेक गरीब पालकांची कंबर मोडत आहे. अशा वेळेस सामाजिक जाणीवेतून उभा राहिलेला हा उपक्रम कौतुकास पात्र आहे. विद्यार्थ्यांनी या सेलचा लाभ घ्यावा आणि आपल्या शिक्षण प्रवासात यश मिळवावे.''त्याचबरोबर, या कार्यक्रमात भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांचा गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल गणेश बजाज, सतीश राठी, मो. शारिक सौदागर यांनी त्यांचा विशेष सत्कार केला.यावेळी रोशन सचिन गर्दे या गुणवंत विद्यार्थ्याला मोफत शालेय साहित्य देऊन यांच्या हस्ते विशेष सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमास मंगरूळपीर परिसरातील अनेक मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.भाजपा मंडळ अध्यक्ष अभिषेक दंडे, रविंद्र ठाकरे, सुदर्शन धोटे, ॲड. बी.एम. ठाकरे, प्रा. वीरेद्सिंह ठाकुर, डॉ. दिलीप रत्नपारखी, नरेंद्र बजाज, सचिन पवार, अतुल गायकवाड, विनोद जाधव, नंदकिशोर मुळे, अनिल काटकर, रवी लांभाडे, मुकेश शिंदे, सुनील राठोड, श्रीकांत मुळे, अनिल भंसाली, गजानन मानेकर, युवराज पवार, गणेश लुंगे, उमेश भोजने, बंडू महल्ले, गजानन अवगण, किशोर इंगोले, समद शेख, मनीष लोहीया, नरेश ठाकुर, विजय भोजने, महेश अहिरकर, फुलचंद भगत, शाम बाहेती, कैलास इंगोले, विठ्ठल टोपले, पंजाब भगत, अमोल कात्रे, गुलाब भारती, पवन रघुवंशी, गजानन सडतकार, शंकर थोरात आदींचा समावेश होता.या कार्यक्रमामुळे मंगरूळपीर शहरात सामाजिक भान, शिक्षणप्रेम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली जबाबदारी अधोरेखित झाली आहे. या सवलतीच्या महासेलला परिसरातील नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात भेट देत असून, समाजातील इतर प्रतिष्ठानांनीही अशाच उपक्रमातून प्रेरणा घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जिल्हाभरातून दहा शिक्षकांची 'आयडॉल' म्हणून निवड!

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**कारंजा, दि. ४ :** शासन निर्णयानुसार प्रत्येक जिल्ह्यातील दहा आयडॉल शिक्षकाची विविध निकषाद्वारे निवड करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्याप्रमाणे वाशिम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील तीन शिक्षकांची नावे गटशिक्षणाधिकारी यांनी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेला पाठवले.

त्या सर्व शिक्षकांची जिल्हाधिकारी भुवनेश्वर एस यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था वाशिम, शिक्षण अधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद वाशिम यांच्या उपस्थितीत दिनांक २९ जुलै रोजी झालेल्या मुलाखतीमध्ये वाशिम जिल्ह्यातील १० आयडॉल शिक्षकाची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील दहा आयडॉल शिक्षकांमध्ये कारंजा व वाशिम पंचायत समितीमधील तीन तर इतर चार पंचायत समितीमधील प्रत्येकी एका आयडॉल शिक्षकांचा समावेश आहे.

कारंजा पंचायत समिती मधून बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डी चे मुख्याध्यापक विजय देविदास भड, जिल्हा परिषद शाळा वढवीचे गणेश लक्ष्मणराव राऊत, जिल्हा परिषद कन्या शाळा उंबरडा च्या शिक्षिका निशा काशिनाथ खुमकर, वाशिम पंचायत समिती मधून भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जिल्हा परिषद शाळा साखरा येथील विनोद बबनराव झनक व मीना नामदेवराव मापारी, जिल्हा परिषद केंद्र शाळा उकळी पेन चे संतोष भागवत इडोळे, रिसोड पंचायत समिती मधून जिल्हा परिषद शाळा कंकरवाडीचे शंकर मोहन खानझोडे, मंगरूळपीर पंचायत समिती मधून जिल्हा परिषद शाळा चिखलीचे निलेश अरुण तुळजापुरे, मानोरा पंचायत समिती मधून जिल्हा परिषद शाळा रुद्राळा येथील एकनाथ भगवान मेश्राम, तर मालेगाव पंचायत समितीमधून जिल्हा परिषद शाळा उडी चे विशाल विनायक काटेकर या दहा शिक्षकाची वाशिम जिल्ह्यातील आयडॉल शिक्षक म्हणून निवड झालेली आहे. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विलास कडाळे, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाने, माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगल धुपे, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी आकाश आहाळे, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव आदींनी निवड झालेल्या आयडॉल शिक्षकांचे कौतुक केले.

### उत्सव | एकनाथ महाराज भागवत पारायण सोहळा

## पुंडा येथे श्री नंदी महादेव श्रावणमास यात्रा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**पुंडा, दि. ४ :** श्रावणमासाच्या पावन महिन्यात श्री नंदी महादेव संस्थान, पुंडा (नंदीग्राम), ता. अकोट, जि. अकोला येथे दरवर्षीप्रमाणे श्री नंदी महादेव श्रावणमास यात्रा उत्सव व श्री संत एकनाथ महाराज भागवत पारायण सोहळा भाविक भक्तांच्या सहभागात संपन्न होणार आहे. यावर्षी हा उत्सव दिनांक ४ ऑगस्ट २०२५ ते ११ ऑगस्ट २०२५ दरम्यान पार पडणार आहे.



पारायणाचा आरंभ दिनांक ४ ऑगस्ट रोजी होईल आणि सांगता ११ ऑगस्ट रोजी नियोजित आहे. या धार्मिक सोहळ्याचे व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. रामदास महाराज साबळे (पुंडा) करत आहेत. संपूर्ण सप्ताहभर दररोज सकाळी ५ ते ६ काकडाभजन, सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत श्री एकनाथ महाराज गाथा पारायण, संध्याकाळी ५ ते ७ हरिपाठ, आणि रात्री ८ ते १० हरिकिर्तन असे विविध भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

उत्सवात खास आकर्षण म्हणून ह.भ.प. श्री. वासुदेव महाराज खोले (गुरुजी) यांचे काल्याचे किर्तन होणार असून, त्याचबरोबर ह.भ.प. श्री. मापारी बुवा (बांबर्डा, ता. अकोट) यांचे परंपरागत काल्याचे किर्तन देखील भाविकांना भक्तिरसात न्हाऊन टाकणार आहे.

यात्रा उत्सवाची सांगता दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी होईल. यानिमित्ताने भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या धार्मिक पर्वणीत सहभागी होऊन अध्यात्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन श्री नंदी महादेव संस्थानचे विश्वस्त मंडळ व गावकरी मंडळी पुंडा (नंदीग्राम) यांच्या वतीने करण्यात आले आहे. संपूर्ण कार्यक्रमात सांप्रदायीक भजन मंडळ, पुंडा यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे. या भक्तिसंगीताने नंदीग्रामचा परिसर श्रावणमासात भक्तिभावात न्हाऊन निघणार आहे.

## सर्पदंश, अंधश्रद्धा आणि सर्पमित्रची भूमिका या विषयावर मार्गदर्शन



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मंगरूळपीर, दि. ४ :** स्थानिक सिबिएससी इंग्लीश स्कुलमध्ये सर्पतज्ञ डॉ.राजा गोरे यांच्या मार्गदर्शनात सापाविषयी अंधश्रध्दा आणि जनजागृतीपर व्याख्यान दि.४ ऑगष्ट रोजी आयोजीत केले होते.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य संजीवकुमार सिंग हे ऊपस्थीत होते.

वाय सी शाळेमध्ये सर्प अंधश्रद्धा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. राजा गोरे यांनी विद्यार्थ्यांना 'सर्प, सर्पदंश, अंधश्रद्धा आणि सर्पमित्र यांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन केले.पुजा का केली जाते. या मागचे शास्त्रदेखील यावेळी सर्पमित्रांनी उलगडून दाखवले. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारून सर्पविश्वाबद्दलच्या शंकाचे निरसन करून घेतले. साप कात का टाकतो, भारतातील सर्वात मोठा आणि सर्वात छोटा साप कोणता, साप भक्ष्य कसे पचवतो, पाय नसताना माणसापेक्षा जास्त जोरात कसा पळतो, विषारी साप विषारीच का आहेत, असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केले.त्यावर सर्पतज्ञांनी ऊत्तरे दिलेत.या व्याख्यानमालेत वायसी सिबिएससी इंग्लीश स्कुल,वाय सी ज्युनीअर कॉलेज आदींनी सहभाग घेतला.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
२
बुलडाणा, मंगळवार,दि.५ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

## महत्त्वाचे

### रस्ता अपघातात दोघे गंभीर जखमी

**मलकापुर :** चिखली बायपास वरील एजे हॅाटेलजवळ झालेल्या अपघातात शेख आसिफ मिर्झा (३५) व शेख अफरोज खान (२५) दोघे रा. बर्डे प्लॉट हे गंभीर जखमी झाले. त्यांना तुरीत काल ३ ऑगस्ट २५ रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. त्यांची प्रकृती उपचाराला साथ देत नसल्यामुळे प्रथमोपचार करून पुढील उपचारासाठी जीएमसी अकोला येथे रेफर केले.

### स्वातंत्रदिनी वनिता बोराडे यांना राष्ट्रपती भवनाचे निमंत्रण

**बुलडाणा :** भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली येथे आयोजित ''अॅट होम रिसेप्शन '' या समारंभासाठी बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील बोथा येथील सोयरे वनचरे फाउंडेशनच्या वनीता जगदेव बोराडे यांना विशेष आमंत्रण पाठविण्यात आले आहे. हे आमंत्रणपत्र असलेली पार्सल पिशवी वनीता बोराडे यांच्या पत्यावर पाठविण्यात आली असून, ही बाब बुलढाणा जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. पार्सल वितरणाची कार्यवाही डाक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. वितरणाच्या माहितीसाठी मेहकर उपविभागीय डाक निरीक्षक जी. बी. काळे, डाकघर सहायक अधीक्षक कै. का. तायडे यांना संपर्क साध्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### राष्ट्रपती पदक प्राप्त पवार यांचा सत्कार

**खामगाव :** येथील शहर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक रामकृष्णजी पवार यांना पोलीस गुणवत्तापूर्व सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदकाने नुकतेच महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल राज्यपाल यांचे हस्ते सन्मानीत करण्यात आले. ही खामगावकरांसाठी गौरास्पद बाब असून या निमीत्त दि.०३ जुलै रोजी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे पदाधिकाऱ्यांनी खामगांव शहर पोलीस स्टेशन येथे जाऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पालखी मार्गावर राबविला अनोखा उपक्रम

**खामगाव :** स्थानिक गोसे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वच्छता अभियानाचा उपक्रम राबविण्यात आला. पालखी शेगावला प्रस्थान करताना भाविक भक्तांची मोठी गर्दी पालखी मागनि असते. यामध्ये रस्त्यावर सावलेला कचरा सेंद्रिय व असेंद्रिय पदार्थ यामध्ये वर्गीकृत करून स्वच्छता करण्याचा अनोखा उपक्रम गोसे महाविद्यालयाच्या विद्यायांनी यावेळी राबविला.

यावेळी स्वच्छता अभियानाचे जनक संत गाडगेबाबा यांच्या जयघोषाने विद्यार्थ्यांनी परिसर दुमदुमून टाकला होता. राष्ट्रीय सेवा योजना सदैव स्वच्छता अभियानाशी कटिबद्ध आहे असे प्रतिपादन यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉक्टर दीपक नागरिक व प्राध्यापिका डॉक्टर नीता बोचे यांनी केले. याप्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये समन्वय साधण्याचे काम महाध्यक कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक उमेश खंदारे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे अनेक स्वयंसेविका व स्वयंसेवक उपस्थित होते. गो. से महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांच्या कचरा संकलन उपक्रमाचे सर्व भाविक भक्तांकडून कौतुक होत असून त्याच्या कार्यात सातत्य असल्याने त्यांचे कार्याचा सुध्दा शहासत प्रसंसा केल्या केल्या जात आहे.

## आगामी निवडणूक स्वबळावर लढू -विजयराज शिंदे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि. ४ :** विधानसभा निवडणुकीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भरघोस यश मिळवण्यासाठी पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी एकजुटीने कामाला लागावे, असे आदेश भाजपा चे जिल्हाध्यक्ष माजी आमदार विजयराज शिंदे यांनी रविवारी पक्षाच्यावतीने आयोजीत कार्यकर्ता संवाद मेळाव्यात दिले.

शहरातील बनमेरू कॉलेज च्या सभागृहात मध्ये घेण्यात आलेल्या या मेळाव्याला माजी जीलाअध्यक्ष गणेश मांटे, प्रकाश गवई, दता पाटील,विजय पवार, चंद्रकांत बरदे, संतोश काळे, चक्रधर लांडे शहर व तालुक्यातील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांसह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शिंदे यांनी तडाखेबंद भाषणातून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग फुकले. त्यांच्या या भाषणाने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे पहायला मिळाले. याप्रसंगी व्यासपीठावर जीलाअध्यक्षा सह विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी शिंदे म्हणाले, की ही केवळ पदाधीकारी व कार्यकर्ता बैठक नसून, पक्षाच्या नव्या वाटचालीची सुरुवात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक कार्यक्रम लागत आहे, ह्या मध्येआगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत पक्षाच्या सर्वाधिक जागा निवडून आणण्यासाठी सर्वांनी एकसंघ काम करणे गरजेचे असल्याचे सांगत या निवडणुकाबाबात रणशिंग फुकले दरम्यान लोकसभा निवडणुकीवेळी विरोधी पक्षांनी एनडीएचे सरकार पुन्हा सत्तेत आले तर संविधान बदलले जाईल, असा फेक नरेटिव्ह सेट केला होता. त्याामुळे महाराष्ट्रात महायुतीची पिछेहाट झाली. मात्र विधानसभा निवडणुकीवेळी लाडकी बहीण योजना यासह शेतकऱ्यांसाठीच्या योजनांमुळे राज्यात महायुतीला भरघोस यश मिळाल्याचे शिंदे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा आढावा सांगतीला. विरोधक फक्त टीका करत बसतात, पण आम्ही काम करून दाखवतो, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्ष कार्यकर्त्यांच्या बळावर पुढे जात असून, आगामी निवडणुकीत महत्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यामेळाव्यात शिंदे यांच्या उपस्थितीत शहरा सह ग्रामीण भागांतील कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. यामुळे जुन्या व जेष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आल्या मुळे कार्यकर्त्यांमध्ये नवसंजीवनी निर्माण झाल्याचे दिसून आले. यावेळी पक्षाचे शहराध्यक्ष, युवा आघाडीचे कार्यकर्ते, महिला पदाधिकारी आणि जिल्हा कार्यकारिणीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यामुळे लोणारमध्ये भाजपा ची ताकद वाढली असल्याचे दिसून आले.

## अतिक्रमण धारकांवर वनविभागांतर्गत वनगुन्हा दाखल

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.४ :** मोताळा तालुक्यातील माळेगावमधील वनजमिनीवरील अतिक्रमणधारकांवर बोराखेडी पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच वनविभागांतर्गत सुध्दा वनगुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कार्यवाही नियमानुसार व कायद्याचे पालन करुन करण्यात आली आहे, अशी माहिती उपवनसंरक्षक सरोज गवस यांनी प्रसिद्धीपत्राकाद्वारे दिली.

दि. २३ जुलै २०२५ रोजी मोताळा वनपरिक्षेत्रांतर्गत मौजे मोहेगाव, राजुर वनपरिमंडळ, पूर्व खैरखेड बिटअंतर्गत वनखंड क्र.३२३ मध्ये अवैधरित्याा केलेल्या झोपड्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यासाठी वनविभागाचे अधिकारी कर्मचारी, पोलीस अधिकारी कर्मचारी व महसूल अधिकारी, राज्य राखीव पोलीस तुकडी यांचेसह गेल्यावर झोपड्या व पाल काढत असतांना अचानकपणे १०० ते १५० लोकांच्या समुहाने येऊन कर्मचा-यावर दगडफेक, डोळ्यात मिरची पावडर फेकली व काठ्या, कोयता, कुऱ्हाडी याने प्राणघातक हल्ला केला होता. हा हल्ला केल्यावर त्याा ठिकाणावरुन कर्मचारी वाहनात बसून बाहेर येत असतांना त्याा वाहनांना घेरुन वाहनांवर हल्ला केला होता. यामध्ये वाहनांवर दगडफेक केल्याने वाहनांच्या काचा फुटल्या व त्याातील कर्मचारी गंभीर जखमी झाले होते. अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी आणलेल्या जेसीबीची तोडफोड केली होती. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) मेहकर यांचे बोलेरो वाहनाची संपुर्ण तोडफोड करुन जाळुन देण्याचा प्रयत केला व इतर वाहने सुध्दा फोडण्यात आले. या हल्ल्यामध्ये वनविभागाचे ५ कर्मचारी (दोन महिला व तीन (पुरुष), पोलीस विभागाचे ८ कर्मचारी (६ महिला व २ पुरुष) व राज्य राखीव पोलीस दल तुकडी मधील १ जवान (पुरुष) हे गंभीररित्याा जखमी झाले असुन या कर्मचाऱ्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे उपचाराकरिता दाखल करण्यात आले. या वनजमीनीवरील अतिक्रमणधारकांनी शेतीसाठी वनहक्क दावे दाखल केले होते. तथापि, घरासाठी दावे दाखल नव्हते. या शेतीच्या दाव्याबाबतचे जिल्हा वनहक्क समितीने सन २०२२ मध्ये वनहक्क दावे नामंजूर करण्यात आले होते. यानंतर दावेधारकांनी या दाव्यावर पुनर्विलोकन अर्ज केला व पुरावे सादर करण्यासाठी वेळ मागितला होता. यानुसार दाव्यावर जिल्हा वनहक्क समिती मार्फत पुनर्विलोकन करण्यात आले व यामध्ये सन २०२४ मध्ये सदर दावे पुन्हा नामंजूर करण्यात आले. यानंतर वन विभागामार्फत अतिक्रमण काढण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५३, ५४ अन्वये कार्यवाही करण्यात आली. यानुसार सहाय्यक वनसंरक्षक (प्रा व कॅम्पा) बुलढाणा यांनी माहे जानेवारी २०२५ ते फेब्रुवारी-२०२५ कालावधीमध्ये अतिक्रमणधारकांना जमिनीवरचे सर्व पुरावेसह कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत पत्राने कळविले होते. यानुसार या कालावधीत वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) मोताळा व गैरअर्जदार अतिक्रमणधारक यांच्यात सुनावणी घेण्यात आली. अतिक्रमणधारकांचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले.

## कावड यात्रेकडून पाच मंदिरात जलाभिषेक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.४ :** श्री नवयुवक मानाच्या कावड यात्रेचे अध्यक्ष राहुल कळमकार यांच्या मार्गदर्शनाखाली कावडधारी मराठी श्रावण मासाच्या दुसऱ्या सोमवार निमित्त नदीचे पवित्र जल आणण्यासाठी तिर्थक्षेत्र मोहाडी येथे जात असतांना गणेशपुर येथे युवासेना तालुकाप्रमुख बहादुर वाधे यांनी कावडधारींसाठी महाप्रसादाचे आयोजन केले होते. तर आज ४ ऑगस्ट २५ रोजी सकाळी कावड़ यात्रा शहरात परत आली व शितला माता मंदिर फरशी, हनुमान मंदिर फरशी, महादेव मंदीर राणा गेट, महादेव मंदीर दालफैल व जय शिव शंभो महादेव मंदिरामध्ये शिवलिंगावर जलाभिषेक करण्यात आला. यावेळी गोपाल धारपवार, अमोल उंबरकार, विजय गंगतिरे, विनोद गवई, योगेश रेड्डी, विक्की धारपवार, निलेश गावंडे, आकाश दुधे, अमोल धारपवार, राहुल दामोदर, ऋषीकेश खिरडकर, रूद्रा कळमकार, आदित्या माहुरे, ओम कळमकार, राहुल धारपवार, विनायक भोई, वैभव चव्हाण सह शिवभक्तांनी जलाभिषेक केला. यावेळी राहुल कळमकार यांच्यासह भक्त उपस्थित होते.

## बारा ज्योतिर्लिंग पूजा, रुद्राभिषेक, भव्य मिरवणूक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.४ :** सद्भावना सेवा समितीद्वरे ०४ ते १० ऑगस्ट पर्यंत जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज वारकरी भवन सर्क्युलर रोड, बुलडाणा येथे बालसंत श्री. दिपशरण महाराज, चित्रकुट यांची शिवमहापुराण कथेचे आयोजन केले आहे. कथेची सुरुवात सोमवारी सकाळी बारा ज्योर्तीलींगाची पुजा व अभिषेक करुन झाली. रुद्राभिषेकमध्ये सौ. सितादेवी चंपालाल शर्मा, सौ. रेखा प्रकाशचंद्र पाठक, सौ. मनिषा मनिष शर्मा, सुरेशचंद्र गट्टाणी, सौ. आशा तिलोकचंद चांडक, सौ. जमुना पुरणमल शर्मा, सौ. मिना रामनिवास यादव इत्यादींनी रुद्राभिषेक व पुजन केले. चित्रकुट धाम येथील पंडीत विशाल शुक्ला यांनी पौरहीत्या केले. श्री संत गजानन महाराज मंदिर, विष्णुवाडी येथुन शोभायात्रा निघाली अश्वाने सजविलेल्या रथामध्ये बालसंत दिपशरण महाराज विराजमान होते. गजानन महाराज मंदिरात शाल, श्रीफळ देवून दिपशरण महाराजांचे सौ. सिमा कुळकर्णी, अनिकेत व सेवेकरींनी स्वागत केले. भजनी, दिंड्या, ५१ कलशधारी महिला, पताका, झेंडे होत्या. आजचा दिवस परशुराम ब्रम्हाण समाज महिला मंडळकडे होता व प्रसाद वाटपाची जबाबदारी जैस्वाल समाज महिला मंडळाकडे होती. या शोभायात्रत चंपालाल शर्मा, राजेश देशलहारा, सुभाष दर्डा, विजय व्यवहारे, प्रकाशचंद्र पाठक, नितीन जैस्वाल, मधुकर गायके, सुभाष घोरपडे, तिलोकचंद चांडक, मनिष शर्मा, विजय शर्मा, रविंद्र लध्दड, उमेश मुंदडा सुरेश गट्टाणी यांनी उपस्थिती होती. ही शोभायात्रा वारकरी भवनमध्ये पोहचल्यावर शिवपुराण कथेला प्रारंभ झाला. कथेच्या प्रारंभी आमदार धिरज लिंगाडे व समितीचे सर्व पदाधिकाऱ्यांनी बालसंत दिपशरण महाराजांचे माल्यार्पण करुन दिपपुजन केले.

## शाळकरी मुली व दिव्यांग महिलांसाठी अनुदान योजना !

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.४ :** जिल्हा परिषद बुलढाणा अंतर्गत महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील अनुसूचित जाती प्रवर्गातील शाळकरी मुलींसाठी आणि दिव्यांग महिलांसाठी लेडीज सायकल आणि पिठाची चक्की खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेनुसार सन २०२४-२५ अंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील ७ वी ते १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या शाळकरी मुलींना लेडीज सायकल खरेदीसाठी थेट लाभ हस्तांतरण (डिबीटी) पद्धतीने अनुदान देण्यात येणार आहे. तसेच सन २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद सेस अंतर्गत दिव्यांग महिला आणि मुलींना पिठाची चक्की खरेदीसाठी अनुदान देण्याची तरतूद आहे.या दोन्ही योजनांसाठी पात्र महिला लाभार्थींनी आपल्या तालुक्याच्या एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयातून विहीत नमुन्यात अर्ज प्राप्त करून, आवश्यक कागदपत्रांसह तो पूर्ण भरून सादर करणे अपेक्षित आहे. अर्जाचे नमुने व अटी-शर्ती संबंधित प्रकल्प कार्यालयात तसेच जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**अंढेरा दि.४ :** देऊळगाव राजा तालुक्यातील मौजे टाकरखेड भागिले येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी मातंग समाजाच्या हक्काच्या जागेत अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन करून ध्वजाचे ध्वजारोहण शिवसेना युवा नेते योगेश भाऊ जाधव सरपंच रविंद्र भागिले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डी.टी.शिंपणे, अनिल भाऊ चित्ते, विकास भाई गवई, दिग्रसचे सरपंच गणेश वाळ, ग्रामपंचायत सदस्य सचिन भागीले, शालेय समिती अध्यक्ष संतोष भागिले,ज्ञानेश्वर भागिले, पंढरीनाथ भागिले, विष्णू वखरे, समाधान काकड, श्रीराम भागिले, दिगंबर भागिले, देशमुख बापू, गणेश निकाळजे, किशोर निकाळजे, विशाल निकाळजे, सुनिल वानखेडे,प्रेम वानखेडे, सिध्देश्वर निकाळजे, खुशाल वानखेडे, समाधान कांबळे,तथा समस्त समाजबांधव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व लाडक्या बहिणी तसेच महिला,माता भगिनी गीता निकाळजे,आशा निकाळजे, ज्योती वानखेड़े, सविता वानखेड़े,उषा निकाळजे, प्रिती निकाळजे, मनीषा निकाळजे, निकिता निकाळजे, पार्वती निकाळजे, गोदावरी निकाळजे, कांता कांबळे, राधा कांबळे,लक्ष्मी कांबळे, विमलबाई निकाळजे या सर्व उपस्थित महिलांना मान्यवरांच्या हस्ते साडीचे वाटप करण्यात आले.

## बनमेरु विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय रसायनशास्त्र दिवस साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.४ :** भारतीय रसायनशास्त्राचे जनक तसेच इंडियन कौन्सिल ऑफ केमिस्ट, कोलकाता चे संस्थापक डॉ प्रफुल्लचंद्र रे यांचा जन्मदिवस ''राष्ट्रीय रसायनशास्त्र दिवस'' म्हणून दि. ०२/०८/२०२५ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश क. बनमेरू यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक पवन कदम व्यंकटेश महाविद्यालय देऊळगाव राजा तसेच आवर्त सारणीतील सर्व मूलद्रव्यांचे नाव कमीत कमी वेळेत सांगून इंडियन रेकॉर्ड ग्रुप मध्ये नाव नोंदविणारा विकास सानप प्राईम इन्स्टिट्यूट लोणारचा विद्यार्थी व विभाग प्रमुख डॉ. सूर्यकांत बोरुळ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्य असते महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मंचावर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक व स्वागतपर भाषणात डॉ. कमलाकर वाव्हळ यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ प्रा. सूर्यकांत बोरुळ यांनी यावेळी उपस्थितांना आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांचा जीवनपट आणि त्यांचे रसायनशास्त्र जगतातील योगदान यावर प्रकाश टाकताना भारतातील प्रथम औषधनिर्मीती कारखाना तसेच नायट्रेट कंपाऊंड सिंथेसीस मध्ये आचार्य रे यांचे योगदान विद्यार्थ्यांना उलगडून सांगितले.

यावेळी रसायनशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांच्या जीवनावर आधारित लघुपट दाखविण्यात आला.

## शहरात पार्किंगची व्यवस्था उपलब्ध करुन मुख्य रस्त्यावर उभ्या वाहनांवर कारवाई करा- नारायण देशमुख

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**चिखली दि.४ :** चिखली शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेनरोड, डि.पी रोड, पेट्रोल पंप जिनींग रोड, बस स्टॅण्ड परीसरात मुख्य रस्त्यावर वाहन धारक आपल्या दुचाकी व चारचाकी गाड्या उभ्या करुन बाजारामध्ये खरेदीसाठी जातात. यामुळे प्रचंड प्रमाणात ट्राफिक जॅम होत आहे. यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ रोजी मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय चिखली यांना निवेदन देण्यात आले.

शहरातील मुख्य रस्त्यावरील अनेक जागा मालकांनी आपल्या जागेमध्ये शॉपींग कॉम्प्लेक्स बांधुन दुकाने थाटली आहे. परंतु पार्किंग साठी त्यांनी कोणत्याही प्रकारची व्यवस्था केलेली नसुन त्यांच्या दुकान समोर ग्राहकांच्या गाडया दिवसभर उभ्या केलेल्या असतात. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांना नाहक याचा त्रास सहन करावा लागत आहे. शहर विकास आराखड्यानुसार शहरात अनेक ठिकाणी पार्किंगच्या जागा होत्या परंतु आज रोजी नगर पालीका प्रशासनाने कोणत्याही ठिकाणी पार्कंगसाठी जागा राखीव ठेवलेली नाही. त्यामुळे शहराचा विकास होण्याऐवजी मुख्य रस्त्यावरच भकास होतांना दिसुन येत आहे. तरी तात्काळ शहरात पार्कंगची व्यवस्था उपलब्ध करुन मुख्य रस्त्याावर गाडया लावणाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करण्यांत यावी, अन्यथा आपले कार्यालया समोर तिव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्यांत येईल असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला. यावेळी चिखली शहर अध्यक्ष नारायण देशमुख, उप तालुकाध्यक्ष संजय दळवी, ज्ञानेश्वर हाडे, निशांत गायकवाड, शुभम सेटे, गणेश मानतकर उपस्थित होते.

## पीक विम्याचे निकष पूर्वीप्रमाणे करा : रा.काँ. (शप) पक्षाची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**देऊळगाव राजा दि.४ :** राज्य सरकारने पिक विमा योजनेत केलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांनी या योजनेकडे पाठ फिरवल्याचे दिसत आहे. सरकारने विमा योजनेत सहभागी होण्याची तारीख जरी वाढवली असेल, तरी तरी देखील अत्याल्प शेतकरी पीक विमा अर्ज भरीत आहे. त्याामुळे पिक विमा योजनेचे नियम पूर्वीप्रमाणेच करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्याचे कृषिमंत्री दत्तात्राय भरणे यांच्याकडे करण्यात आली आहे.

राष्ट्रवादीने तहसीलदार यांच्यामार्फत कृषी मंत्र्याांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, राज्य सरकारने सुरू केलेली एक रुपयात पिक विमा बंद केल्याने शेतकऱ्यांना पिक विम्यासाठी जास्तीची रक्कम भरावी लागत आहे. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकरी या योजनेकडे पाठ फिरवताना दिसत आहे. तसेच पिक विमा योजनेत केलेल्या बदलांमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. आता पीक कापणी प्रयोगाच्या आकडेवारी वर आधारित नुकसान भरपाई दिली जाणार आहे. पूर्वी चार ट्रिगर च्या आधारे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जात होती. मात्र आता त्याााा बदल झाल्याने शेतकरी नाराज आहेत. प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२५ चा विमा भरण्यासाठी मुदतवाढ दिली असताना देखील नगन्य शेतकरी विमा भरतांनी दिसत आहे. मागील योजनेत महत्त्वाचे जे ट्रिगर होते त्याातील एक ट्रिगर पावसाने सतत २१ दिवस खंड दिल्यास २५ % अग्रीम मिळण्याची त्याााा तरतूद होती. आता मात्र ती तरतूद वगळून केवळ नुकसान आधारित पिक विमा मिळण्याची तरतूद करण्यात आल्याने तसेच शेतकऱ्यांना क्षेत्रानुसार प्रीमियर भरावा लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परिणामी आता पीक विमा अर्जाची संख्या वाढण्याची शक्यता कमी आहे. येणाऱ्या काळात निसर्गाच्या लहरीपणामुळे पिक विमा पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे एकही शेतकरी पिक विमा योजने पासून वंचित राहू नये म्हणून पिक विमा योजनेचे नियम निकष पूर्वीप्रमाणे करावे, अशी मागणी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष राजेश इंगळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती गजानन पवार,रंगनाथ कोल्हे,माजी सभापती हरिष शेटे,शहराध्यक्ष विजय खांडेभराड,माजी नगरसेवक सय्यद करीम, इस्माईल बागवान, राष्ट्रवादी चे नेते गणेश सवडे,बाळू शिंगणे, गणेश बुरकूल,विलास खराट रफिक पठाण,मंगल अंभोरे,आदींनी केली आहे.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम



अकोला, मंगळवार, दि. ५ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com

महत्त्वाचे

## अण्णाभाऊ साठे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**वाशिम :** कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवास वर्णन अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारांतील लेखन केलेले ख्यातनाम मराठी साहित्यिक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात साजरी करण्यात आली. आरडीसी विश्वनाथ घुगे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## क्रांतीसिंह नाना पाटील जयंतीनिमित्त अभिवादन



**वाशिम :** स्वातंत्र्य संग्रामातील धगधगते अग्रदूत, प्रजासत्ताक सरकाराचे स्थापक आणि शेतकऱ्यांचे कैवारी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात अधीक्षक सुनील घोडे यांच्या हस्ते क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या कार्याचा आणि विचारांचा स्मरण करीत त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान, शेतकरी-श्रमिकांसाठीचा त्यांचा संघर्ष यावर मनोगते व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या जीवनावर आधारित भाषणे व घोषवाक्यांद्वारे श्रद्धांजली अर्पण केली.

## ७ फुटाच्या धामण सापाला जीवनदान



**वाशिम :** शहरातील विठ्ठलवाडी नजीक असलेल्या शेळके स्त्री रुग्णालयाच्या आवारात लपून बसलेल्या धामण जातीच्या ७ फुट लांब सापाला सर्पमित्र मयुरेश मानधने यांनी रविवार, ३ ऑगष्टला दुपारी ३ च्या सुमारास यशस्वीरित्या रेस्क्यु करुन त्याला जिवनदान दिले. या सापाबद्दल अधिक माहिती देतांना मानधने म्हणाले की, धामण जातीचा हा साप पुर्णत: बिनविषारी असून मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त असतो. या सापाचा मुख्य आजार उंदीर असल्याने त्याला इंग्रजीत इंडीयन रॅट स्नेक असे नाव पडले. धामण सापाच्या शेपटीत विष असते असा एक गैरसमज आहे, परंतु धामण सापाच्या शेपटीत विष नसते. धामण साप उंदीर खातो, ज्यामुळे शेती आणि घरांमध्ये उंदीर नियंत्रणात राहतात. त्यामुळे, धामण साप एकप्रकारे शेतकरी आणि माणसांसाठी उपयुक्त आहे. त्यामुळे कुणीही या सापाला मारु नये असे आवाहन सर्पमित्र मयुरेश मानधने यांनी केले आहे. या सापाला रेस्क्यु केल्यानंतर त्याला सुरक्षित जंगलाच्या अधिवासात सोडण्यात आले.

# खड्डेमय रस्ते: गावकऱ्यांचा रास्तारोको

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ४ :** जिल्हा परिषद अंतर्गत येत असलेल्या मौजे घोंन्सर ते रिसोड रस्ता क्र. ७१ रस्ता या रस्त्यावर मोठ मोठे जिवघेणे खड्डे पडले आहेत. घोंन्सर येथील नागरिक व शाळकरी विद्यार्थाना जीवघेणे प्रवास करावा लागत आहे. या संदर्भात घोंन्सर येथील नागरिकांनी ४ जुलै रोजी सकाळी १० वाजताच्या दरम्यान घोंन्सर रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

सदर पत्रामध्ये दर्शवल्या प्रमाणे ८५० मिटरचे कॉंग्रेटिकरच काम पुर्ण झाले असून मागणी प्रमाणे या रस्त्याची डांबरीकरण करुन देणे होते. सदर काम कॉंग्रेटिक न करता डांबरीकरण केले असते तर २.५० किलोमीटर रस्ता पुर्ण झाला असता. परंतु कंत्रादार अधिकारी यांच्या हिताचे काम







करत असून त्यांनी सदर रस्त्या संदर्भात दुर्लक्ष केले आहे.. त्यामुळे गावकऱ्यांना व शालेय विद्यार्थाना या रस्त्यावरुन जिवघेणे प्रवास करावा लागत आहे हा रस्ता रोको जवळपास दोन तीन तास चालला असून वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या वाहन चालकांची मोठी तारांबळ उडाली होती पोलीस प्रशासनाच्या मध्यस्थी नंतर हे आंदोलन लेखी आश्वासन दिल्यावर मागे घेण्यात आली आहे यावेळी घोंसर येथील सरपंच संतोष जाधव, सरपंच भागवत जाधव,पोलीस पाटील, ओंकार सुरुकुटे मा जिप सदस्य विलास जाधव.मराठा सेवा संघ तालुका उपाध्यक्ष रिसोड यांच्यासह शेकडो गावकरी उपस्थित होते.

## मंगरूळपीर अनसिंग मार्गावर बनावट आधार कार्डचा सुळसुळाट

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. ४ :** मंगरूळपीर आगार अंतर्गत येणाऱ्या अनसिंग मार्गावर आगराच्या वतीने दररोज १३ फेऱ्या मारण्यात येतात या बस मध्ये विद्यार्थी दररोजच्या मोठ्या प्रमाणात ये -जा करतात या विद्यार्थ्यांची सर्व बसण्याची जागा बनावट कार्डधारक घेत आहे अशी कुजबुज ऐकावयास मिळत आहे त्यामुळे या मार्गावरील विद्यार्थी त्रस्त झाले असल्यामुळे या बनावट कार्डवर कारवाई करावी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने वयाची ७५ वर्ष पूर्ण झालेल्या नागरिकांसाठी अमृत ज्येष्ठ एस टी बस मध्ये मोफत प्रवास ही योजना लागू केलेली आहे. मात्र या योजनेचा बनावट आधार कार्ड तयार करून मंगरूळपीर ते अनसिंग या मार्गावर वयाची ५० ते ६० वर्षे पूर्ण झाले नाही मोठ्या प्रमाणात घेत आहे त्यामुळे महामंडळाला दररोजचा हजारो रुपयांचा चुना लागत आहे.बनावट आधार कार्ड विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे.

या मार्गावर दररोजचे शेकडो विद्यार्थी ये जा करतात त्यांना बसण्याची जागा सुद्धा बसमध्ये नसते त्यांना बसमध्ये उभे राहून प्रवास करावे लागत आहे.महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला बनावट आधार कार्ड यामुळे उत्पन्न मिळत नाही आहे.बनावट आधार कार्ड प्रवास करणाऱ्या ची तपासणी करुन अशा नागरिकांवर कारवाई करावी अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

## मनभा ग्रामपंचायत कार्यालयात शांतता समितीची बैठक संपन्न

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मनभा, दि. ४ :** ग्रामीण पोलीस स्टेशन कारंजा (लाड) अंतर्गत येणाऱ्या ग्राम मनभा येथे श्रावण महिना चालू आहे आगामी सण येणार आहे, पार्श्वभूमीवर जातीय सलोखा व समंजस टिकून राहून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी २ ऑगस्ट रोजी शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली.

यावेळी कार्यक्रमाला ग्रामीण पोलिस स्टेशन कारंजा चे पोलीस निरीक्षक प्रविण शिंदे, यांनी आगामी सना निमित्ताने डीजे लावणे टाळा व आपल्यापासून दुसऱ्याना त्रास नाही झाला पाहिजे याची काळजी घ्या गरजू लोकांना मदत करा एक महिन्याचा राशन द्या किंवा शाळेचे विद्यार्थ्यांना पुस्तके वही पेन पेन्सिल द्या किंवा झाडे लावा मेडिकल शिबिर घ्या असे आव्हान ग्रामपंचायत कार्यालय शांतता कमिटी मध्ये सांगितले आहे. ग्रामपंचायत कार्यकारी सरपंच शीतल देशमुख उपसरपंच मुजीब शेख,



माजी सभापती छोटू बापू प्रदीप देशमुख, माजी सरपंच वहीद मिर्झा, अब्दुल समद ग्रामपंचायत सदस्य, विजय ठोंबरे, माजी उप सरपंच अन्सार अली व मनभा गावाचे बीट जमदार गब्बर पप्पूवाले,व सुमित जगताप ,सह गावातील प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी पत्रकार असे समाजसेवक गावातील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सण साजरे करतांना कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची दक्षता नागरिकांनी घ्यावी असे आवाहन केले.

## सहकार पुरस्कारासाठी १८ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**वाशिम :** राज्याच्या सहकार चळवळीच्या विकासात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य सरकारमार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. सन २३-२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला आहे. त्याकरीता अर्ज करण्यासाठी १८ ऑगस्ट पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुरस्कारांमध्ये सहकार महर्षी १ पुरस्कार, सहकार भुषण २१ पुरस्कार, सहकार निष्ठ २३ पुरस्कार अशा ४५ संस्थांचा गौरव करण्यात येणार आहे. या पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करण्याकरीता सहकारी संस्थांना ३१ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि, आता जिल्ह्यातील नोंदणीकृत सर्व पात्र सहकारी संस्थांनी सहकार पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असुन अशा संस्थांनी दि. १८ ऑगस्ट पर्यंत त्यांचे प्रस्ताव संबंधित संस्थेचे मुख्यालय ज्या तालुक्यात आहे, त्या तालुक्याचे सहायक निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक यांनी केले आहे.

## महसूल मंडळांमध्ये पांदण रस्ते मोजणीसह केले दुतर्फा वृक्षारोपण

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ४ :** तहसीलदार डॉ.संतोष येवलीकर यांच्या नेतृत्वात एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट या आठवड्यात महसूल सप्ताह अंतर्गत विविध गावातील शेतकरी, गावकरी यांच्याशी संबंधित लोकाभिमुख कामाचा धडाका सुरू असून या कामी महसूल,कृषी, पंचायत आदी विभागाचे अधिकारी कर्मचारी सुद्धा धावपळ करताना दिसत आहेत.

तालुक्यातील सहाही महसूल मंडळातील शेतकऱ्यांना शेत शिवारात जाण्यासाठी व असे तसे कृषी पिके घरापर्यंत आणण्यासाठी गरजेचे असलेले पांदण रस्ते शिवाड्या यांचे विवादास्पद दावे समपृचाराने सोडवणे केला प्राधान्यक्रम देण्यात



आले. महसूल सप्ताह अंतर्गत मौजे सिंगडोह ते कोठारी पांदण रस्त्याची मोजणी करतेवेळी स्वतः तहसीलदार डॉ. येवलीकर जातीने हजर होते. सिंगडोह कोठारी पांधन रस्त्याच्या दोन्ही बाजूला तहसीलदारांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड सुद्धा करण्यात आली.

मोहगव्हाण ते जामदरा पांदन रस्ता मोजणी व दुसरपा वृक्ष लागवड नायब तहसीलदार अस्टूरे यांच्या हस्ते तथा विभागातील इतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. रुद्राळा ते जामदरा पांदन रस्त्याची मोजणी व वृक्ष लागवड सुद्धा महसूल सप्ताह अंतर्गत अधिकारी कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली. सिंगडोह, रुद्राळा,जामदरा, मोहगव्हाण, दापुरा या गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी व स्थानिक नागरिकांनी सहभाग नोंदविला.

## 'जय भोले'च्या गजराने कामरगावात कावड यात्रेचे स्वागत



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कामरगाव, दि. ४ :** वाशिम जिल्ह्यातील कामरगाव येथे विश्व हिंदू परिषद बजरंग दल व जय भोलेनाथ मंडळ कडून दरवर्षी. प्रमाणे श्रावण महिन्यातील दुसरा सोमवारी कावड शोभायात्रा काढण्यात आली.

या कावड यात्रेची सुरुवात कुऱ्हाड येथील बेंबळा नदी व कापशी नदीच्या संगम तटावरून जल घेऊन सकाळच्या सुमारास सुरुवात करण्यात आली.

या कावड यात्रेकरिता महिलांची मोठ्या संकेत विशेष उपस्थिती पाहायला मिळाली तसेच गावातील तरुण मंडळी कावड घेऊन येताना गावात ठीक ठिकाणी कावड यात्रेचे गावकऱ्यांकडून स्वागत करण्यात आले.

व त्यावेळेस गावात कवाड यात्रेच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात शेकडो नागरिकांचा जनसमुदाय उपस्थित असल्याचे दिसून आले . उपस्थित असलेल्या कावड धारी व नागरिकांसाठी ठिकठिकाणी चहापाणी व नाश्त्याचे आयोजन गावकऱ्यांकडून करण्यात आले अशा उत्स्फूर्त भक्तीमय वातावरणात गावात कावडची शोभायात्रा कडून ठिकठिकाणी कवाड चे पूजन करण्यात आले.

व कुऱ्हाड येथील कापशी व बेबळा नदीच्या संगमावरून आणलेले जल कामरगाव येथील महादेवाच्या प्राचीन मंदिरात जय भोले नाथाचा गजर करत जल अभिषेक करून कावड यात्रेची समाप्ती करण्यात आली .यावेळी कामरगावात शिव भक्तीमय वातावरण दिसून आले

## कावडधारी शिवभक्त नांदगाव खंडेश्वरला जल आणण्यासाठी रवाना

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. ४ :** श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी अरुणावती नदीचे पवित्र जल विविध महादेव मंदिरांमध्ये अर्पण करण्याची परंपरा भाविकांनी जपली आहे. त्याअनुसार, ३ ऑगस्ट रोजी जुनी वस्ती येथून नांदगाव खंडेश्वर (जि. अमरावती) येथे जाणारी कावड यात्रा ३० युवकांच्या उपस्थितीत रवाना झाली.

मानोरा येथील शिवभक्त मनीष शर्मा, विशाल काबरा, कृष्णा यादव, गणेश सातरोटे आणि वीर हनुमान कावड मंडळातील इतर युवक चार-चार जणांच्या गटात अरुणावतीचे जल घेऊन रात्री प्रवास करीत आहेत. ही यात्रा ४ ऑगस्ट रोजी पहाटे नांदगाव येथील खंडेश्वर मंदिरात पोहोचणार आहे. यापूर्वीच्या सात वर्षापासून मानोरा येथील युवक कावडीने जल आणत आहेत मानोरा येथून नांदगाव





खंडेश्वर (जि. अमरावती) येथून जल आणण्यासाठी खाना झालेले कावडधारी युवक वर्षामध्ये या पिंपळगाव युवकांनी (ता. औंढा मंगरूळपीर), नागनाथ (जि. हिंगोली), उनकेश्वर (ता. माहूर), दाभडी (ता. आर्णी), हुडी (ता. पुसद), कोंडाळा झामरे (जि. वाशिम), तसेच राजराजेश्वर (अकोला) या ठिकाणी कावडीद्वारे जल अर्पण केले आहे. भक्ती, शिस्त, सामाजिक बांधीलकीचा आदर्श या अनोख्या सातत्यपूर्ण भक्तीभावासाठी वीर हनुमान कावड मंडळाच्या युवकांचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. भक्ती, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण करणाऱ्या या कावडयात्रेचा प्रवास यंदाही उत्साहात सुरू झाला आहे.

धोका | पाटबंधारे विभागाने तातडीने लक्ष देऊन योग्य उपाययोजना करण्याची मागणी

## झुडपांमुळे धरण भिंत फुटण्याची भीती

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**रिसोड, दि. ४ :** तालुक्यातील शेलू खडसे, पाचंबा, मोहजा धरणाच्या भिंतीवर वाढलेल्या झाडेझुडपांमुळे धरणाच्या भिंतीला धोका निर्माण झाला आहे. या वाढलेल्या झाडामुळे धरणाची भिंत कमकुवत होऊन तिला तडे जाण्याची भीती व्यक्त होत आहे. यामुळे धरणाची भिंत फुटण्याची शक्यता असून, याकडे पाटबंधारे विभागाने तातडीने लक्ष देऊन योग्य उपाययोजना करण्याची मागणी शेलू खडसे आणि पाचंबा येथील नागरिकाकडून करण्यात येत आहे.



तालुक्यातील शेलू खडसे पाचंबा धरणाच्या भिंतीवर अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात झाडे, झुडपे आणि वेली वाढल्या आहेत. बाभूळ निंब पळस, खैर बोरी यांसारख्या मोठ्या झाडांची मुळे धरणाच्या दगडमाती मध्ये खोलवर शिरली आहेत. ही मुळे जसजशी वाढत जातात, तसतसा ती धरणाच्या भिंतीला तडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही धरणातून पाण्याची गळती होण्याची शक्यता बळावली असून, ही गळती धरणाच्या आतील भागाला पोखरू शकते. धरणाची भिंत कमकुवत झाल्यास, अतिवृष्टीमुळे धरणातील पाण्याचा दाब वाढल्यास, धरण फुटण्याचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो असे झाल्यास, धरणाच्या खालील बाजूस असलेल्या शेलु खडसे पाचंबा मांगवाडी यांसारख्या परिसरांना आणि गावांना पुराचा सामना करावा लागू शकतो. यामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित आणि शेतीचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. पाटबंधारे विभागाने तात्काळ धरणाच्या भिंतीवरील झाडेझुडपे मुळासकट तातडीने काढून टाकावीत. भिंतीची तपासणी आणि दुरुस्ती: तज्ज्ञ अभियंत्यांकडून धरणाच्या भिंतीची सखोल तपासणी करून तडे गेलेले भाग आणि भेगांची त्वरित दुरुस्ती करावी. नियमित देखभाल: भविष्यात अशी समस्या पुन्हा उद्भवू नये यासाठी धरणाची नियमितपणे देखभाल आणि स्वच्छता करावी.

जर या समस्येकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर भविष्यात मोठे संकट ओढवू शकते, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. पाटबंधारे विभागाने यावर त्वरित कार्यवाही करून संभाव्य धोका टाळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. ४ :** साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त १ ऑगष्ट रोजी अकोला नाका मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. यामध्ये रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, रुग्णांना फळवाटप, महिलांना साडीवाटप, तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप यांचा समावेश होता. सदर उपक्रम श्री फाउंडेशनचे अध्यक्ष गिरधारीलाल सारडा यांच्या विशेष सहकार्याने पार पडले. कार्यक्रमाच्या आयोजनात मंडळाचे प्रतीक कांबळे, देवा खरे, समाधान खरे व राजू शिराळे यांचे मोलाचे योगदान होते. तसेच अमोल खडसे, मंगेश गायकवाड,



ओम रावत, ज्ञानेश्वर खरे, ऋतिक तेलगोटे, संकेत खडसे, श्याम बांगर, पंकज मैंदकर, ज्येष्ठ नागरिक शिवाजी पडघान, संजय खडसे, सतीश भालेराव, गौरव कोहळे, सचिन खरे, सागर खरे यांच्या अथक प्रयत्नांनी हा उपक्रम अधिक व्यापक व प्रभावी ठरला. शेकडो विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. रुग्णांना पोषणासाठी फळे देण्यात आली, तर अनेक महिलांना साड्यांचे वाटप करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

## महत्त्वाचे

### महसूल सप्ताह निमित्ताने नमुना आठ-अ चे वाटप



**अकोट :** अकोट तालुक्यात महसूल विभागामार्फत राज्यात-१ ऑगस्ट २०२५ रोजी महसूल दिन व १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताह २०२५ साजरा करण्याबाबत. शासन निर्णय महसूल व वन विभाग संकिर्ण-२०२५/प्रक्र/आस्था-०१ (ई-०१) -२९ जुलै २५ नुसार निर्देशींत करण्यात आलेले आहे.आज दुसऱ्या दिवशी अकोला जिल्हाधिकारी अजित कुंभार,अकोट उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर, अकोट तहसीलदार सुनील चव्हाण, यांचे आदेशानुसार अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या ग्राम शहापूर रूपागड येथील गावठाण क्षेत्रातील अतिक्रमण नियमाकुल करून रहिवाशांना ग्राम पंचायत शहापूर रूपागड येथे नमुना आठ अ देण्यात आले. यावेळी लाभार्थी प्रमिला वामन पवार,यावेळी सरपंच सौ.सविता विनायक सुरत्ने,ग्राम महसूल अधिकारी राजाभाऊ खामकर, ग्रामसेवक झामरे यांची उपस्थिती देण्यात आले.

# स्त्री रुग्णालयाचा निष्काळजीपणा: बाळाचा मृत्यू

## पळसखेडच्या महिलेची तक्रार: सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**वाशिम, दि. ४ :** जिल्हा स्त्री रुग्णालय, वाशीम येथे वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे प्रसूतीदरम्यान बाळाचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप पळसखेड (ता. रिसोड) येथील लता नामदेव गव्हाणे यांनी केला आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात या प्रकरणी संबंधित डॉक्टर, नर्स आणि खाजगी कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तातडीने चौकशी सुरू करण्याची मागणी केली आहे.

लता गव्हाणे यांच्या म्हणण्यानुसार त्यांची सून शिवानी वैभव गव्हाणे हिला २ ऑगस्ट रोजी पहाटे ३ वाजता प्रसूतीसाठी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासण्या करून अहवाल नॉर्मल असल्याचे सांगण्यात आले आणि सकाळी १० वाजेपर्यंत प्रसूती होईल असे सांगण्यात आले. मात्र रात्रीपासून तीव्र प्रसववेदना सुरू असूनही कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर आणि नर्सेस यांना वारंवार विनंती करूनही कोणीही रुग्णाची दखल घेतली नाही.

रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडे सतत विनंती करूनही सकाळी ३ पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत कोणीही आले नाही. अखेर सायंकाळी ५ वाजता तपासणी करण्यात आली तेव्हा रुग्णाची प्रकृती अत्यंत गंभीर झाली होती. त्यानंतर रुग्णावर अमानुष प्रकारे प्रसूतीसाठी दडपशाही करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यांनी सांगितले की, प्रसूती करताना रुग्णाच्या गालावर मारणे, अयोग्य पद्धतीने पोटावर दाब देणे, अयोग्य व्यक्तींमार्फत उपचार करणे असे प्रकार घडले. त्याचे ठसे रुग्णाच्या शरीरावर आजही स्पष्टपणे दिसत आहेत.

सायंकाळी ५.३० वाजता प्रसूती झाली पण डॉक्टरांनी बाळाच्या हृदयाचे ठोके नसल्याचे सांगून बाळ मृत असल्याचे जाहीर केले. लता गव्हाणे यांनी या संपूर्ण घटनेला रुग्णालय प्रशासनाच्या निष्काळजीपणाला जबाबदार धरले असून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

त्यांच्या निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करावा. वैद्यकीय पात्रता नसलेल्या व्यक्तींनी तपासणी का केली, याची चौकशी करावी. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी रुग्णालय व्यवस्थापनाने योग्य उपाययोजना कराव्यात दोन ऑगस्ट रोजी सकाळी तीनपासून सायंकाळी पाचपर्यंत नातेवाईकांनी विनंती करूनही कोणीच दखल घेतली नाही, याची जबाबदारी निश्चित करावी. ही घटना केवळ एका कुटुंबाला झालेला मानसिक आघात नसून, संपूर्ण आरोग्य व्यवस्थेतील ढासळलेल्या जबाबदारीचे लक्षण आहे. जिल्हा प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# आदिवासी परंपरा हीच देशाची खरी संस्कृती - रामकृष्ण ढिगर

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अडगाव बु., दि. ४ :** लगतच्या आदिवासी भागातील धोंडाआखर येथे इंग्रजांच्या विरोधात आवाज उठवणारे स्वातंत्र्य सेनानी जननायक रेंगाआबा यांच्या जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते परीसरातील बहुसंख्य आदिवासींच्या उपस्थितीत रेंगाआबा स्मारकाचे लोकार्पण संपन्न झाले. उत्साहात पार पडलेल्या स्मारक लोकार्पण सोहळ्याचे अध्यक्षस्थानी माजी सभापती गोपाल कोल्हे , उद्घाटक विचारवंत रामकृष्ण ढिगर तर जयस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष संदीप तोटा, विदर्भ अध्यक्ष ब्रिजेश गवते, माजी उपसभापती किशोर मुंदडा, सामाजिक कार्यकर्ते हेमराज काळपांडे, माजी सरपंच दिनेश मावशे, उपसरपंच संजय गावंडे, बाबाराव मावसकर यांचेसह मोठ्या संख्येने परीसरातील आदिवासी बांधवांची कार्यक्रमाला उपस्थिती होती. आदिवासी युवकांचे प्रेरणास्थान असलेल्या रेंगाआबा यांनी त्या काळात युवकांनी समाज आणि देशासाठी समर्पित असले पाहिजे असा संदेश देऊन प्रेरीत केले होते तसेच त्यांनी आदिवासींच्या रुढी परंपरांना चालना दिली म्हणूनच आदिवासी परंपरा हिच देशाची खरी संस्कृती असल्याचे मत उद्घाटक विचारवंत रामकृष्ण ढिगर यांनी स्मारक लोकार्पण प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन सुरेश तायडे यांनी केले तर आभार प्रदर्शन अनिल मावशे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रेंगाआबा जयंती उत्सव समिती चे नंदु दही,अमर मावशे, रामगोपाल दही,लखन बेटे, संजय दही, नामदेव दही, मारोती मावशे यांनी अथक परिश्रम घेतले.

# पातूरमध्ये मोकाट कुत्र्यांचा धुमाकूळ; घरात घुसून बकऱ्यांवर हल्ला

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**पातूर, दि. ४ :** देवडी मैदान परिसरात राहणारे मोहम्मद जावेद यांच्या घरात आज पहाटे सुमारे ५ वाजता मोकाट कुत्र्यांनी थैमान घातले. त्यांनी घरात घुसून चार बकऱ्यांवर हल्ला केला. या हल्ल्यात चार ते पाच बकरींचा मृत्यू झाला असून, त्याची अंदाजे किंमत सुमारे ६० ते ८० हजार रुपये असल्याचं सांगितलं जात आहे.

पातूर नगर परिषद व शिर्ला ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अनेक भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचा वाढता त्रास याआधीही अनेकदा वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाला आहे. मात्र, दोन्ही विभागांनी या बाबतीत अद्याप कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही. सध्या पातूर व शिर्ला ग्रामपंचायतीच्या अनेक भागांमध्ये मोकाट कुत्र्यांचा दहशत वाढत असून नागरिकांकडून कठोर पावले उचलण्याची मागणी होत आहे.

स्थानिक नागरिकांनी सांगितले की, हे मोकाट कुत्रे इतके आक्रमक झाले आहेत की ते आता थेट घरात घुसून हल्ले करत आहेत. त्यामुळे लोकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. जर हे मोकाट कुत्रे पाळीव जनावरांवर हल्ला करून त्यांना ठार मारू शकतात, तर लहान मुलांवरही ते हल्ला करू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

> ❑ घरात घुसून मोकाट कुत्र्यांनी आमच्या बकऱ्यांवर हल्ला केला. त्यामुळे आम्हाला आर्थिक व मानसिक नुकसान सहन करावं लागलं आहे. आम्ही संबंधित विभागाकडे मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण आणण्याची व झालेल्या नुकसानीच्या भरपाईची मागणी करतो.
>
> - **मोहम्मद जावेद,** देवड़ी मैदान पातुर

### यापूर्वी दोन मुलांवर झाला होता कुत्र्यांचा हल्ला

पातूरच्या रेहान पार्क भागात याआधी दोन लहान मुलांवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला होता, ज्यात दोघेही गंभीर जखमी झाले होते. त्याआधीही एका वृद्धावर मोकाट कुत्र्यांनी जीवघेणा हल्ला करून त्याचा मृत्यू घडवला होता. मात्र, या सर्व घटनांनंतरही नगर परिषद आणि ग्रामपंचायत याकडे दुर्लक्षच करत आहेत.

# सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये मान्सून डे साजरा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**आकोट, दि. ४ :** स्थानिक श्रीजी कॉलनी स्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे मान्सून डे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लूणकरण डागा व सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल तसेच अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे, प्रभूदास नाथे यांची मंचावर उपस्थिती होती. या कार्यक्रमात नर्सरी ते के जी २ पर्यंत सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच रंगबिरंगी अम्ब्रेला व रेनकोट सोबत आणले होते. या कार्यक्रमात नर्सरी ते केजी २ सर्वप्रथम विद्यार्थ्यांसाठी ड्रॉइंग कॉम्पिटिशन, रेनी फुड, सेल्फी कॉर्नर आणि शेवटी रेन डान्स असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन वैशाली गावत्रे व आभार प्रदर्शन मीना वर्मा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक कार्य प्रभारी आनंद काळमेघ, निकिता महल्ले, कल्पना बिहाडे, सुनिता इंगळे, रश्मी बेराड, माधुरी काळे, शुभांगी वाकोडे, दिपाली कुलट, कांचन नहाटे, ममता सोनटक्के, ज्योती रंधे, सविता भोरखडे, रचना सुपासे, जयवंत भवाने, आशीष लांडे, रोहीत फुसे व सर्व प्रायमरीच्या शिक्षीकांनी अथक परिश्रम घेतले.

# प्रत्येक बालिकेच्या सन्मानार्थ 'चलो सोच बदले'

## तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचा उपक्रम

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला , दि. ४ :** मुलींना त्यांच्या हक्का बद्दल जागृत करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला जातो. मुली स्वयं सिद्ध व्हाव्यात याकरिता तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी तर्फे प्रत्तेक बालिकेच्या सन्मानार्थ चलो सोच बदले हा संकल्प घेवून दिनांक २/ऑगस्ट /२०२५ रोजी सकाळी ८ वाजता स्व. दादासाहेब दिवेकर वारिष्ट प्राथमिक शाळा उमरी,अकोला येथे कार्यक्रम घेण्यात आला.

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे व उपाध्यक्षा तनुजा वाघमारे यांच्या संकल्पनेतून संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार, जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र कन्या शाळा, केडिया प्लॉट, जठारपेठ , अकोला येथे चलो सोच बदले हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये मुलगी वयात येताना सुरु होणारी मासिक पाळी त्या बद्दलच्या श्रद्धा, अंधश्रध्दा समज गैरसमज, समस्या व त्यावरील उपाय योजना या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. प्रास्ताविक तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी सदस्या श्वेता शिरसाट यांनी केले. तर विषयाला धरून मार्गदर्शन श्वेता शिरसाट, सुचिता घोगरे, सपना म्हात्रे यांनी केले. यावेळी शाळेतील उपस्थित मुलीनी मासिक पाळीच्या संदर्भातील येणा-या वेगवेगळ्या समस्या व त्यावरिल उपाय याबाबत विविध प्रश्न विचारून त्यावर तिक्ष्णगत महिला सदस्यांनी त्यांचे समाधान केले.

तसेच शाळेचे शिक्षिका प्रतिभा शिरभाते यांनी सूत्र संचालन केले. व तिक्ष्णगत संस्थेबाबत विद्यार्थिनींना माहिती दिली उपस्थित त शिक्षिकांमध्ये वंदना बनसोड ,रजनी अरबाळ ,सुवर्णा वरोकार अनुराधा वरोकार सीमा खंदारे किरण कु. श्रद्धा घाटरे उपस्थित होत्या.

# पुंडा येथील आरोग्य उपकेंद्र रामभरोसे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पुंडा, दि. ४ :** ग्रामीण भागात लोकांना मोफत उपचारर मिळावेत यासाठी जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहेत.ग्रामीण भागात लोकांना मोफत उपचार मिळावेत यासाठी जिल्हा परिषदेची आरोग्य उपकेंद्र आहेत. यामध्ये आरोग्य अधिकाऱ्यांसह आरोग्यसेवक महिला, आरोग्यसेवक पुरुष.परंतु ग्राम पुंडा येथे आरोग्य सेविका यांची बदली झाल्यापासून एक महिना उलटून गेल्यावरही आरोग्य सेविका यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही.व समुदाय आरोग्य अधिकारी यांची सुध्दा बदली गेल्या आठ ते दहा दिवसापासून झालेली आहे.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आरोग्याचे प्रश्न असल्याने आरोग्य उपकेंद्रात नेहमीच वर्दळ असते. सेवा देणा-या आरोग्य सेविका व समुदाय आरोग्य अधिकारी नसल्याने पुंडा ग्रामस्थांना कसरत करावी लागत आहे. शासनाकडे आरोग्य सेविकांची मंजूर पदे व कर्मचारी उपलब्ध असतांना सुध्दा गावाला आरोग्य सेविका व समुदाय आरोग्यिय अधिकारी नियुक्त करण्यात येत नाहीत.कोरोना काळात सर्वाधिक महत्त्वपूर्ण जबाबदारी आरोग्य कर्मचाऱ्यांनी उचलली. किंबहुना आरोग्य कर्मचाऱ्यांचे महत्त्व यानिमित्ताने अधोरेखित झाले. मात्र अद्यापही आरोग्य उपकेंद्राला आरोग्यसेविका व समुदाय आरोग्य अधिकारी नियुक्त करण्याचा मुहूर्त आरोग्य विभागाला मिळालेला नाही. दरम्यान, आरोग्यसेविका गेल्या एका महिन्यापासून व उपकेंद्रांवर समुदाय आरोग्य अधिकारी यांची गेल्या आठ ते दहा दिवसापासून बदली झालेली आहे. त्यामुळे आता उपकेंद्रात पूर्णवेळ डॉक्टर व आरोग्यसेविका उपलब्ध नाहीत. आणि आता नवीनच नियुक्त झालेले आरोग्यसेवक कार्यरत आहे.परंतु त्यांच्यावर सुध्दा पुंडा उपकेंद्र अंतर्गत येत असलेली ७ गावे व गर्भवती महिलांना देण्यात येणा-या सेवा उपचार व आरोग्य सेविकांच्या कामाचा अतीरिक्त भार आहे.त्यांसाठी पुंडा आरोग्य उपकेंद्र येते कायमस्वरुपी आरोग्यसेविका नियुक्त होण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

> ❑ आरोग्य विभागाने तात्काळ आरोग्यसेविका,सफाई कर्मचारी,व समुदाय आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती आरोग्य उपकेंद्र पुंडा येथे करावी जेणेकरुन ग्रामस्थांना गावातच वेळेवर उपचार मिळेल.
>
> - **लता शाम वाकोडे,** सरपंच ग्रामपंचायत पुंडा

> ❑ गावातील आरोग्य उपकेंद्र हे गेल्या महिन्याभ-यापासून शोभेची वास्तू म्हणून उभे आहे परंतु तिथे आरोग्यसेविका,सफाई कर्मचारी,व समुदाय आरोग्य अधिकारी हेच नसल्याने गर्भवती महिला,बालके,व ग्रामस्थांना आवश्यक असा उपचार मिळत नसल्याने ग्रामस्थांकडून रोष व्यक्त होत आहे.
>
> - **रामेश्वर पुंडकर** माजी उपाध्यक्ष सेवा.सह.सोसा.पुंडा

**दान** | १५ ऑगस्ट पर्यंत अवयव दान पंधरवडा

# जागतिक अवयवदान दिनानिमित्त जनजागृती रॅली

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी







**वाशिम, दि. ४ :** जागतिक अवयवदान दिनानिमित्त जिल्हा रुग्णालय वाशिम यांच्या वतीने ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान अवयवदान पंधरवडा राबविण्यात येत आहे. या अभियानाचा प्रारंभ रविवार, ३ ऑगस्ट रोजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

अवयवदान जनजागृती रॅलीस अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी व डॉ. अविनाश झरे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सुरुवात झाली. या रॅलीचे नेतृत्व एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी केले. या उपक्रमात प्रसारमाध्यम समन्वयक अधिकारी चव्हाण, आरोग्य निरीक्षक नितीन व्यवहारे, नेत्रदान समुपदेशक ठाकरे व लक्ष्मण काळे यांनी उपस्थिती दर्शवली. या जनजागृती रॅली व पोस्टर उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अवयवदानाचे महत्त्व, फायदे आणि जीवनदानाचे सामाजिक मूल्य प्रभावीपणे मांडले. लोकांमधील अवयवदानाबाबत असलेले गैरसमज दूर करणे, सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे, आणि दानासाठी प्रेरणा देणे, हा यामागचा मुख्य उद्देश होता. पोस्टर स्पर्धेमध्ये विघ्नेश वानखडे यांनी प्रथम, रजत कुटे यांनी द्वितीय, तर अनुष्का वानखडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या यशस्वी विद्यार्थ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या उपक्रमाचे अध्यक्ष बाकलीवाल चॅरिटेबल ट्रस्टवे अध्यक्ष ॲड. सुरेंद्रकुमार बाकलीवाल, मुख्याध्यापक बबनराव बिल्लारी, उपमुख्याध्यापक दंभीवाल, पर्यवेक्षिका भोंडे, तसेच सर्व शिक्षकवृंद व एनसीसी अधिकारी अमोल काळे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. अवयवदान ही एक जीवनदानाची प्रक्रिया असून, जनजागृतीच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. अनिल कावरखे यांनी यावेळी केले.

# माधुरी हत्तीनीच्या हस्तांतरण निर्णयाचा फेरविचार व्हावा!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा (लाड), दि. ४ :** कोल्हापूर जिल्ह्यातील जैन समाजाच्या सातशे वर्षापासून अधिकची परंपरा असलेल्या नांदणी मठातील महादेवी हत्तीनीला अंबानीच्या गुजरात येथील वनतारा येथे नेण्याचा निर्णय अतिशय दु:खद आहे. हा निर्णय जैन समाजाच्या भावनांशी खेळ असुन अंबानी सारख्या बड्या उद्योजकांच्या मुलाचा हट्ट पुरविण्यासाठी हा सर्व खेळ केला जात आहे.

जैन संस्कृतीचा भाग असणाऱ्या तिच्यासारख्या अनेक नाती जोडणाऱ्या प्राण्यांसाठी न्याय व करुणा या दोन्ही तत्वांना एकत्र ठेवून निर्णय घेण्याची गरज असल्याचे सांगत या निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी या निवेदनाच्या माध्यमातून दिगम्बर जैन महासमिती कारंजा लाड संभाग ने जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललीत गांधी यांच्या मार्फत सरकारला केली आहे. पुढे निवेदनात नमूद केले आहे की राज्यात गेल्या ४० वर्षापासून माधुरी नावाच्या हत्तीनीने केवळ एक प्राणी म्हणून नव्हें तर श्रध्देच्या प्रेमाचा व संस्कृतीचा भाग म्हणून आपले एक वेगळे अस्तित्व निर्माण केले आहे ती केवळ नांदणी मठातच नव्हें तर परिसरातील ग्रामीण भागातील हजारो लाखो गोरगरीब जनतेच्या हृदयात स्थान मिळविले आहे. पंचकल्याणक महोत्सव असो अथवा धार्मिक उत्सव, आठवडी बाजार, लहानग्यांशी खेळणी सारखी मैत्री वृध्दांच तिच्यावरच असलेल वात्सल्य व प्रेम अशा अनेक रुपात माधुरी जैन समाजातील प्रत्येक कुटुंबाचा भाग झाली आहे. ललित गांधी यांना निवेदन सादर करते वेळेस दिगम्बर जैन महासमिती चे कारंजा लाड संभाग चे अध्यक्ष ॲड संदेश माणिकचंद जिंतुरकर, सचिव कविश गहाणकरी ,प्रदेश उपाध्यक्ष आशुतोष जोहरापुरकर, प्रदेश सदस्य नितीन बुरसे, प्रकाश सरोदे , वंदनाताई मोहाळे, अमोल काळे, प्रफुल्ल बांनगावकर, सौरभ डोळस , माजी तहसीलदार चंदाताई खंडारे व रितेश मिश्रीकोटकर उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, मंगळवार,दि.४ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com


## शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याच्या कामात भ्रष्टाचार

### कामात सुरुवातीलाच भ्रष्टाचार; काँग्रेसने विचारला बांधकाम विभागाला जाब

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.४ :** चिखली शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात उभारण्यात येत असलेल्या अश्वारूढ पुतळ्याच्या पायाभरणीच्या कामात सुरुवातीलाच मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार उघडकीस आला आहे. काम इस्टिमेटप्रमाणे न करता दर्जाशी तडजोड करण्यात आल्याचे समोर आले आहे. यामुळे स्थानिक काँग्रेसने तीव्र संताप व्यक्त करत संबंधित अभियंत्याला थेट चौकात जाऊन जाब विचारला.

दिं. ४ ऑगस्ट रोजी चिखली शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी ठाम भूमिका घेत कामात झालेल्या अनियमिततेबाबत प्रशासनाला जाब विचारला. ''या ऐतिहासिक आणि सन्मननीय स्मारकाच्या उभारणीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही,'' असा इशाराही यावेळी देण्यात आला.

**तपासणीत उघड झाला दर्जाहीन बांधकामाचा प्रकार**
बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी केलेल्या प्राथमिक तपासणीत पायाभरणीचे काम चुकीच्या पद्धतीने केल्याचे निष्पन्न झाले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, इस्टिमेटनुसार आवश्यक असलेले गज (लोखंडी सळया) न वापता कमी दर्जाचे साहित्या वापरण्यात आले आहे. ठेकेदाराकडून थेट दर्जाशी तडजोड केल्याचे स्पष्ट झाले असून, अधिकाऱ्यांनी सदर पाया हटवून नव्याने काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**काँग्रेसची भूमिका ठाम योग्य आणि पारदर्शक कामाची मागणी**
या पार्श्वभूमीवर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी प्रशासनासमोर ठाम भूमिका घेतली असून, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या थोर राष्ट्रनायकाच्या स्मारकाच्या कामात कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले. या आंदोलनात काँग्रेसचे शहराध्यक्ष राहुल सवडतकर, अतहर काझी, राजू गवई, कुणाल बोंद्रे, निलेश गावंडे, डॉ. इसरार, शहजात अली खान, राजू रज्जाक, जका भाई, खलिल बागवान, भिकाजी शेटे, सचिन शेटे, जय बोंद्रे, अमोल लहाने, विलास ननंई, शोएब मुसा, गोकुळ शिंगणे, आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

> संपर्क साधला असता काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, ''या पुतळ्याचे काम म्हणजे छत्रपती शिवरायांचा सन्मान आहे, त्यात कोणतीही गडबड सहन केली जाणार नाही. गरज भासल्यास हे आंदोलन तीव्र करण्यात येईल.''

## भोन येथील पुरातत्व स्थळ प्रतिबंधित क्षेत्र !

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपुर दि.४ :** बुलढाणा जिल्ह्याला जागतिक पटलावर कीर्ती मिळवून देणाऱ्या संग्राम पूर तालुक्यातील भोन गावात असलेल्या भूमिगत बुद्ध स्तूप स्थळ परिसराला प्रतिबंधित क्षे) म्हणून घोषित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य पुरात्व विभागाच्या उपसंचालकांनी आपल्या टीम सह भोन परिसराला भेट देऊन स्थळ निरीक्षण करत ही संपूर्ण पुरातन स्मारक परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. यावेळी पुरातन विभाग नागपूर येथील उपसंचालक मयुरेश खडके, त्यांचे सहकारी, जलसंपदा विभागाचे उपकार्यकारी अभियंता रवींद्र विश्वकर्मा, भारतीय स्तूप व लेणी संवर्धन समितीचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ मेश्राम, सचिव प्रा. प्रफुल खंडारे, कोषाध्यक्ष जी. एन. ब्राह्मणे, शेतमालक श्रीकृष्ण इंगळे, ग्रामपंचायत ग्रामसेवक परिहार तथा पदाधिकारी आणि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

भोन येथे जमिनीत सम्राट अशोक कालीन २३०० वर्ष जुने बुद्ध स्तूप आढळून आलेले आहे. डेक्कन कॉलेज पुणे चे डॉ. भास्कर देवतारे यांना संशोधनात गवेशना दरम्यान हा स्तुप २००२ साली आढळून आला आहे. हा संपूर्ण परिसर जिगाव जलसिंचन प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जात असल्याने लवकरच ९९.७५ हेक्टर परिसराला संरक्षक भिंत बांधून हा स्तूप परिसर संरक्षित केला जाणार आहेत. महाराष्ट्र शासनाने या संपूर्ण परिसरातील पुरावास्तु राज्य संरक्षित स्मारके म्हणून घोषित केली आहे. आणि



> जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता श्रीराम हजारे, पुनर्वसन विभागाचे कार्यकारी अभियंता तुषार मेतकर, उपसा सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता परमजीतसिंग जुनेजा जिगाव प्रकल्पाच्या पूर्णत्वसाठी सकारात्मकतेने काम करत आहेत तसेच शासन देखील या प्रकल्पाला वेळोवेळी आवश्यक बळ देत आहे. त्यामुळे जिगाव जलसिंचन प्रकल्पाचा एक महत्वाचा भाग असलेल्या भोन येथील स्तूपाच्या संरक्षक भिंतीचे बांधकामाचे काम हाती घेऊन पूर्ण करावे जेणेकरून आज संपूर्ण परिसर संरक्षित होऊन लवकरात लवकर येथील भारतीय संस्कृतीचा पुरातन वारसा जगासमोर येईल. पर्यायाने जिल्ह्यात एक मोठे पर्यटन केंद्र उभारले जाऊन रोजगाराच्या संधी निर्माण होतील. असे आवाहन भारतीय स्तूप व लेणी संवर्धन समितीचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ मेश्राम यांनी केले आहे.

> भोन येथील परिसरात जागतिक दर्जाचे म्युझियम तसेच तत्सम सुविधा निर्माण केल्या जाणार असल्याने खारपान पट्टा म्हणून अनेक दशक दुर्लक्षित असलेला हा परिसर पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम होऊन आपले अस्तित्व पुनर्प्रस्थापित करणार आहे.

आता लवकरच या परिसराचे उत्खनन होऊन जमिनीत असलेल्या २३०० वर्ष जुन्या भारतीय संस्कृतीचा वारसा जगासमोर येणार आहे.

## महत्त्वाचे

### महसुल सप्ताह अतंर्गत वृक्षारोपण

**खामगाव :** दिनांक १ ते ७ ऑगस्ट दरम्यान आयोजित महसूल महसूल सप्ताहाचा उपक्रम समाह अंतर्गत काल ३ ऑगस्ट रोजी खामगाव तालुक्यातीत गाव नकाशावरील पाणंद रस्त्यांची मोजणी व सीमांकन करून दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली. तालुक्यातील पाणंद सत्यांची उप अधिक्षक भूमी अभिलेख यांच्या मार्फत मोजणी व सीमांकन करून, त्यानंतर पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना वृक्ष लागवड करण्यात आली. या उपक्रमामुळे भविष्यात पाणंद सत्यांवर अतिक्रमण होण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी होईल, असे बावेळी उपस्थित तहसीलदार सुनिल पाटील यांनी सांगितले. या उपक्रमात उप अधिक्षक भूमी अभिलेख शिंदे, नाथब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, नायच तहसीलदार निखिल पाटील, ग्राम महसूल अधिकारी आनंद वानखेडे, तसेच शेतकरी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल सहाच्या या उपक्रमाला उपस्थितांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला आणि पर्यावरण संवर्धनाबरोबरच महसूल अभिलेख व गाव नकाशातील पाणंद रस्त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला.

### इसम बेपत्ता

**खामगाव :** येथील एमआयडीसी भागातील रहिवाशी धनश्याम रमेश भुतडा ( ४९) हे बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. घनश्याम भुतडा यांच्या मुलाचा संत गजानन महाराज इंजिनिअरिंग कॉलेज येथे नंबर लागल्याने ते सुटाळा येथील सातव सरांना भेटून येतो असे सांगून घरून निघून गेले मात्र घरी परत आले नाही त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला परंतु ते कुठेही मिळून आले नाही त्यामुळे याबाबत त्यांचे चुलत भाऊ योगेश सुरेशचंद्र भुतडा यांनी शहर पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून त्यावरून पोलिसांनी हरविल्याची नोंद केली आहे. पोलीस भुतडा यांचा शोध घेत आहेत. भुतडा नेमके कोणत्या कारणामुळे बेपत्ता झाले याबाबत अद्याप अधिकृत माहिती मिळू शकली नाही.

### जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी दर्शन सोहळा

**शेगाव :** जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी, जगद्गुरु रामानंदाचार्य दक्षिण पीठ नाणीजधाम यांच्या समस्या मार्गदर्शन व दर्शन सोहळयाचे आयोजन ८ व ९ ऑगस्ट २०२५ रोजी श्री. गणेश प्रस्थ मंगल कार्यालय, पुरुषोत्तम हरी पाटील नगर, एम एस ई बी चौक, खामगाव रोड, शेगाव, येथे सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने संस्थानाच्या बतीने अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. या कार्यक्रमात दिनांक ८ अऑगस्ट ला उपासक दीक्षा व दि. ८ ऑगस्ट रोजी साधक दीक्षा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी जास्तीत जास्त भाविकांनी उपासक दीक्षा व उपासक यांनी साधक दीक्षा घेण्यासाठी नोंदणी करावी,

**कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव**

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १५८५ - २३१० |
| गहू | २०६० - २६२५ |
| तुर | ४००० - ६५८० |
| हरभरा | ५०५० - ६१५५ |
| सोयाबीन | ३६५० - ४८४० |
| तीळ. | ७८०० - ८४०० |
| उडीद. | ६३०० - ६५५० |
| मूंग. | ४४०० - ५८०० |
| भुईमूग. | ४५०० - ५४०० |
| मक्का. | २१५० - २१५० |

## उबाठा सेनेची जनसंवाद यात्रा संपन्न

### ''एक कॉल - प्रॉब्लेम सॉल्व'' सकल्पना मांडली जनतेसमोर

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापुर दि.४ :** शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक २७ जुलै रोजी मलकापूर तालुका शिवसेनेतर्फे ''जनसंवाद यात्रा २०२५'' चे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेच्या माध्यमातून पक्षाच्या विचारधारेचा प्रचार व प्रसार संपूर्ण तालुक्यात करण्यात आला.

या उपक्रमाचे आयोजन तालुका प्रमुख दीपक चांभारे पाटील यांच्या पुढाकाराने झाले. या यात्रेचा उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी, कामगार, मराठी माणूस आणि सर्वसामान्य जनतेच्या समस्या समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयतशील राहणे. याच अनुषंगाने ''एक कॉल - प्रॉब्लेम सॉल्व'' ही संकल्पना देखील जनतेसमोर मांडण्यात आली. यात्रेदरम्यान तालुका प्रमुखांसह सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी गावागावात व वस्ती-तांड्यावर जाऊन प्रत्यक्ष जनतेशी संवाद साधला. ग्रामस्थांचे मनोगत ऐकून, विविध समस्या समजून घेतल्या. काही तातडीच्या समस्यांचे निवारण तर तत्काळ करण्यात आले, तर इतर समस्यांसाठी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आली. **यामध्ये पुढील प्रमुख समस्यांवर लक्ष देण्यात आले:** हरणखेड: सकाळच्या एसटी बस सेवेची मागणी भोई वस्ती: पूल व रस्त्याची दुरवस्था वडजी: तीन शेतरस्त्यांच्या अडचणी जांभूळधाबा: गजानन महाराज मंदिर समोरील डीपीचे स्थलांतर खामखेड: शेतरस्त्यातील मोरीची समस्या दुधलगाव व मोरखेड: १० गाव पाणीपुरवठा योजनेंतर्गत दूषित पाण्याचा प्रश्न मोरखेड व शिराढोण: बस सेवा सुरु करण्याची गरज मोरखेड: वीजपुरवठा निपाणा सबस्टेशनवरून हलवण्याची मागणी लासुरा: केळी बागेतील लटकलेल्या वीजतारा सुरक्षित करणे पिंपळखुटाबु.वनिमखेड:वीजपुरवठाटाकरखेडयेथूनमलकापूरकडेवळवणे या समस्यांबाबत निवेदने देऊन प्रशासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आले. शिवाय, तालुक्यातील सर्व शेतरस्त्यांचा एकत्रित प्रस्ताव तयार करून लवकरच तहसीलदारांच्या समवेत मातोश्री पांदण योजनेच्या अनुषंगाने बैठक घेण्यात येणार आहे. यावेळी शिवसेनेचे सर्व अंगीकृत संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.४ :** क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज तहसीलदार विजय सवडे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार प्रमोद करे, संजय बंगाळे, जिल्हा नाझर गजानन मोतेकर यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनीही क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

## छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराच्या नावाखाली फसवणूक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.४ :** शासनाच्या नावावर आयोजित करण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरांमध्ये तालुक्यातील अनेक ठिकाणी लाभार्थ्यांची पिळवणूक होत असल्याचे धक्कादायक प्रकार समोर येत आहेत.

या शिबिरांमध्ये गरजूंना शासकीय योजना, दाखले व इतर सुविधा तत्काळ देण्यात येणार असल्याचा दावा केला जातो. मात्र प्रत्यक्षात लाभार्थ्यांकडून कागदत्रांची मागणी करून ती जमा केली जातात, आणि त्यानंतर त्यांना तहसील कार्यालयावर बोलावून वारंवार हेलपाटे मारायला लावले जाते. दाखले तत्काळ देण्याचे आश्वासन देणाऱ्या अधिकाऱ्यांकडून टाळाटाळ केली जाते, आणि सामान्य नागरिकांना अपमानास्पद वागणूक सहन करावी लागते.

''शासनाच्या नावाखाली सामान्य जनतेची दिशाभूल होत आहे. आम्ही शिबिरात विश्वास ठेवून कागदपत्र दिली, पण अजूनही काहीच मिळालं नाही,'' असे एका लाभार्थ्याने सांगितले. या प्रकारामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा गैरवापर होत असून, शासनाच्या समाधान शिबिराचे उद्दिष्टच हरवत चालले आहे. योजनेचा खरा लाभ गरजूंना मिळत नसून, फक्त कागदोपत्री समाधान दाखवले जात आहे.

**जवाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी नागरिकांची मागणी**- या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तालुक्यातील नागरिक व विविध सामाजिक संघटनांकडून जोर धरत आहे. शासनाने जर वेळेवर लक्ष दिले नाही, तर या शिबिरांच्या विरोधात तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, इशारा दिला आहे.

## मोडी लिपी प्रशिक्षण वर्गास अनेक शासकीय कार्यालयांनी फिरविली पाठ!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.४ :** पुराभिलेख संचनालय, महाराष्ट्र शासन,मुंबई व इतिहास विभाग,जिजामाता महाविद्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचे, प्रशिक्षण जिजामाता महाविद्यालयात सुरू आहे. सदर प्रशिक्षण वर्गामध्ये विद्यार्थी तसेच समाजातील विविध घटकातील समाज धुरिणांनी प्रवेश घेऊन मोडी लिपी जाणण्याचा प्रयत्न करीत आहेत. शासनाच्या वतीने बुलढाणा शहरातील विविध शासकीय कार्यालयांना आपापले प्रतिनिधी सदर प्रशिक्षण वर्गास पाठवावेत असे लेखी पत्र दिले गेले. शासनाचा उद्देश हाच की सदर कार्यालयामध्ये मोडी लिपी मध्ये असणारे दस्तऐवज कर्मचाऱ्यांना वाचता यावेत.यावर शासन प्रचंड खर्च करीत आहे. असे असले तरी विविध शासकीय कार्यालयांनी सदर प्रशिक्षण वर्गाकडे पाठ फिरवली आहे.

या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन दि. ३१ जुलै रोजी झाले. सदर प्रशिक्षण वर्गाच्या निमित्ताने बुलढाणा शहरातील वातावरण ढवळून निघाले. अनेक जुने दस्तावेज बाहेर आलेत व लोकांमध्ये सुद्धा एक जिज्ञासू वृत्ती मोडी लिपी बाबतीत जागृत झाली. शासनाच्या वतीने दोन मोडी लिपी प्रशिक्षक तज्ञ सुद्धा बुलढाणा येथे पाठविलेले आहेत. मोडी लिपी तज्ञ अमोल महल्ले व फुलकरे हे विविध शासकीय कार्यालयांना भेटी देऊन जुने दस्तावेज यांचे वाचन करीत आहेत. मात्र याकडे शासकिय कार्यालयाने पाठ फिरविली आहे.

## प्रा. डी.एस. लहाने यांना मातृशोक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.४ :** शिवसाई परिवाराचे अध्यक्ष तथा देऊळघाट जिल्हा परिषद सर्कलचे माजी सदस्य, शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख प्रा.डी.एस.लहाने यांच्या मातोश्री राजकोरबाई श्रीराम लहाने यांचे आज सोमवार, ४ ऑगस्ट रोजी वृध्पकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. गेल्या काही दिवसापासून बुलढाणा येथील संचेती हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांना पचनाचा,हृदयाचा व श्वसनाचा त्रास जाणवत होता.आज त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वाजता लव्हाळा ता.मेहकर या त्यांच्या मुळगावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे व असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

## अंढेरा डॉक्टरविना! ३२ गावांमधील नागरिकांचे आरोग्य रामभरोसे!

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**संग्रामपुर दि.३ :** बुलढाणा जिल्ह्यातील अंढेरा प्राथमिक आरोग्य केंद्र (पिएचसी) हे आज अक्षरश: सलाईनवर असल्याचे चित्र आहे. केंद्रावर गेल्या दीड वर्षांपासून डॉक्टर नसल्यामुळे ३२ गावांच्या सुमारे ५१ हजार लोकसंख्येची आरोग्यसेवा रामभरोसे चालू आहे.

अंढेरा पिएचसी मध्ये डॉक्टरांची मुख्य पदे रिक्त असून सध्या प्रभारी डॉक्टर म्हणून डॉ. शिवानंद शिंगाडे (बिएएमएस) कार्यरत आहेत. मात्र त्यांच्याकडे अंढेरा तसेच दिग्रस उपकेंद्राची जबाबदारी एकाच वेळी दिली गेल्याने ते कुठेच नियमितपणे उपस्थित राहत नाहीत. बहुतेकवेळा ते सकाळी ११ ते १२ दरम्यान थोडा वेळच वर दिसतात.

**रुग्ण भरकटतात, दवाखाना दुपारी ओसाड**
दुपारी रुग्ण ताप, अंगदुखी, अतिसार अशा तक्रारी घेऊन अंढेरा येथे आले मात्र त्यांना डॉक्टर नसल्याची माहिती नर्स आणि शिपायांकडून मिळाली. यामुळे रुग्णांना वैद्यकीय उपचार न मिळवता माघारी फिरावे लागते. या आरोग्य केंद्रात आणि त्याअंतर्गत असलेल्या ८ उपकेंद्रांमध्ये मिळून एकूण ४१ पदांपैकी फक्त २५ कर्मचारी कार्यरत आहेत. उर्वरित १६ पदे रिक्त असून, मर्यादित मनुष्यबळामुळे आरोग्यसेवा कोलमडली आहे.




**एमएलसी न मिळाल्याने अपघातग्रस्तांची फरफट**
डॉक्टर नसल्याने ( मेडिकल लिगल सर्टफिकेट) तयार होत नाही. परिणामी, अपघात किंवा मारहाणीच्या घटनांमध्ये रुग्णांना देऊळगाव राजा किंवा देऊळगाव मही येथे हलवावे लागते. यामुळे उपचारात विलंब होऊन रुग्णांच्या जिवाला धोका निर्माण होतो.

**७० लाखांचे डॉक्टर क्वार्टर रिकामे**
आरोग्य विभागाने डॉक्टरांसाठी सुमारे ७० ते ८० लाख रुपये खर्चून निवासी क्वार्टर उभारले आहे. मात्र मुक्कामी डॉक्टर नसल्यामुळे हे क्वार्टर सध्या रिकामे आहे.

**प्रशासनाकडून तातडीने कारवाईची गरज**
अंढेरा हे ३२ गावांचे मुख्य आरोग्य केंद्र असूनही येथील आरोग्यसेवा पूर्णतः ढासळली आहे. प्रशासनाने तातडीने डॉक्टरांची नेमणूक व रिक्त पदे भरली नाहीत, तर आरोग्य यंत्रणेचा बळी भविष्यात आणखी किती रुग्ण होतील, हे सांगता येणार नाही.

## महादेवी हत्तीणीला परत आणण्यासाठी जैन समाजाचा मूक मोर्चा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**देऊळगाव राजा दि.४ :** महादेव हत्तीणीला नांदणीमठात परत आणण्यासाठी देऊळगाव राजा शहरात जैन बांधवांनी मूक मोर्चा काढून माजी आमदार डॉ.शशिकांत खेडेकर व जैन बांधवांनी नायब तहसिलदार संतोष मुंडे यांना निवेदन दिले. कोल्हापूर जिल्ह्यातील जैन समाजाच्या नांदणी येथील जैन मठामध्ये गेल्या ३५ वर्षापासून महादेवी (माधुरी) नावाची हत्तीण सर्वांच्या मनोरंजनाचे साधन म्हणून सर्व धार्मिक कार्यक्रमात सहभागी होत होती. नित्य नियमप्रमाणे दररोज भगवंतांची पूजा अर्चा सुद्धा एक मुका प्राणी करत होता. सदर महादेवी हत्तींनीचा या संस्थेने चुकीचा अहवाल तयार करून या महादेवीच्या भविष्यातील सुरक्षिततेसाठी गुजरात स्थित जामनगर मध्ये अनंत मुकेश अंबानी यांनी निर्माण केलेल्या वनतारा या प्राणी संग्रहालयाकडे सुपूर्द करण्यासाठी सुप्रीम कोर्टाकडून आदेश पारित करून घेतले. या न्यायालयीन प्रकरणी जैन समाजाच्या भावनांना फार मोठी ठेच पोहोचली असून महाराष्ट्रासह भारतभर सकल जैन व अजैन समाजाकडून महादेवी (माधुरी) हत्तीन परत नांदणी मठांमध्ये म्हणजेच तिच्या माहेरी आणण्यासाठी एकवटले असून देऊळगाव राजा शहरात मूक मोर्चा काढण्यात आला. सकल जैन समाजाचे वतीने मूक मोर्चाचे आयोजन केले होते.



यामध्ये जैन समाजासोबत अजैन समाजातील नागरिकांनी उपस्थिती लावली होती. मुख्यमंत्री यांना देण्यात आलेल्या निवेदनावर एक हजार नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. जैन समाजाबाबत सखोल अभ्यास असून जैन धर्मिय बंधू कुठल्याही प्राणी बद्दल आस्था, करूणा, दया भावाने वागतात तसेच या धर्माच्या शिकवणीमध्ये कुठल्याही प्राण्याला त्रास देण्याची किंवा त्यांना पाळण्याची मुभा नाही या देशात १४००० गो शाळेचे संचलन हे जैन समाजातर्फे करण्यात येते. मागील ४० वर्षापासून महादेवी (माधुरी) ही हत्तींनी नांदणीच्या जैन मठामध्ये राहत होती ती केवळ एक प्राणी म्हणून नव्हे तर एक श्रद्धेचा प्रेमाचा व संस्कृतीचा भाग आहे. ती एक जैन समाजाची धार्मिक प्रतीक आहे. जैन समाजाच्या सर्व धार्मिक कार्यक्रमात तिचा सहभाग असायचा असे असताना समाजाला व मठाधिपती यांना अंधारात ठेवून या संस्थेने या माधुरीबद्दल चुकीचा अहवाल तयार करून सुप्रीम कोर्टात पाठवला.

हा निर्णय जैन व अजैन समाजाच्या मनावर आघात करणारा ठरला आहे त्यामुळे केंद्र व राज्य सरकारने यामध्ये हस्तक्षेप करून वन तारामध्ये पोहोचलेली महादेवी (माधुरी) आणण्यासाठी प्रयत्न करावे. अशी मागणी करण्यात आली आहे. या मूक मोर्चात सर्वच राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी हजेरी लावली.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

अमरावती, मंगळवार, दि. ५ ऑगस्ट २०२५

## थोडक्यात

### महिलेला अश्लिल शिवीगाळ

**अमरावती :** एकाच अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या महिलेने दुसऱ्या शेजाऱ्याविरुद्ध पोलिसात तक्रार दिली. ती मागे घेण्यास तिने नकार दिला असता, शेजारी राहणाऱ्या पती पत्नीने तिला अश्लिल शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दारू विक्रेत्यावर पोलिसांची कारवाई

**अमरावती :** खोलापुरी गेट पोलिसांनी महाजनपुरा येथे एका अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई करीत ६४० रुपयांची दारू जप्त केली. पोलिसांनी संजय सुखदेवराव वरघट (२५) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### गळफास घेवून इसमाची आत्महत्या

**अमरावती :** छत्रपती शिवाजी चौक, नवसारी येथे नितीन नामदेवराव सुसलकर (४५) यांनी राहत्या घरी गळफास घेत आत्महत्या केली. याबाबत गाडगे नगर पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### जुन्या वादातून एकाला मारहाण

**धामणगाव रेल्वे :** हिंगणगाव येथे जुन्या वादातून एकाने दुसऱ्याला शिवीगाळ करीत काठीने मारहाण करीत जखमी केले. त्यात त्याच्या हाताला फॅक्चर झाले. याबाबत जखमीच्या तक्रारीवरून दत्तापूर पोलिसांनी हेमराज समाधान डोळे (३५) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### क्षुल्लक कारणावरून वृद्धाला कुऱ्हाडीने मारहाण

**धारणी :** माझ्या मामाला पापी का म्हटले, असे म्हणत एकाने वृद्धाला कुऱ्हाडीने मारहाण करीत जखमी केले. ही घटना धारणी पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या उतावली येथे घडली. या प्रकरणी जखमी चंदन कालू भिलावेकर (६२) याने धारणी पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

### शासकीय दवाखान्या समोरून दुचाकी लंपास

**धारणी :** येथील शासकीय दवाखान्यासमोर उभी केलेली दुचाकी (एमएच २७-सीएम ३८५८) अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत २० हजार रुपये आहे. याबबात शिवकुमार सखाराम काकडे (रा. खाऱ्या टेंभु) याच्या तक्रारीवरून धारणी पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### शेतातून चोरून नेली फवारणी मशीन

**नांदगाव खंडेश्वर :** कणी मिर्झापूर शिवारातील शेतातून गावातीलच एका युवकाने फवारणी मशीन चोरून नेल्याची घटना घडली. घटनेच्या वेळी ५५ वर्षीय फिर्यादी महिला शेताच्या बाजूला बकऱ्या चारत होती, तर तिचा पती शेतात फवारणी करीत होता. त्या वेळी तिला युवक तिच्या शेतात फिरताना दिसला, तर काही वेळाने तो पाठीवर फवारणी मशीन घेवून जाताना तिदसला. याबाबत तिने पतीसह येवून मंगरूळ चव्हाळा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी रोशन गणेश सावदे (२६) याच्यावरुद्धि चोरीचा गुन्हा दाखल केला.

### सेतू केंद्रासमोरून दुचाकी लंपास

**दर्यापूर :** येथील सिव्हील लाईन परिसरात असलेल्या सेतू सुविधा केंद्रासमोरून अज्ञात चोरट्याने दुचाकी (एमएच ३०-एडी १३६१) चोरून नेली. तिची अंदाजे किंमत 13 हजार रुपये आहे. याबाबत सुमित जगन्नाथ होले (३२, रा. थिलोरी) यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# मनपाची कारवाई थंडाविली; अतिक्रमण पूर्वपदावर

## शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण जैसे थे; मनपाच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि. ४ :** शहरातील मुख्य रस्ते छोटे - मोठे व्यवसाय करणाऱ्या हॉकसने केलेल्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असतांना रस्त्यावरील वाहतुकीची समस्या लक्षात घेता

नवनियुक्त मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी आयुक्त पदाची सूत्र हाती घेताच शहरातील अतिक्रमणाला लक्ष केले. अतिकमण विभागाला कामाला लावून शहराची साफसफाई सुरु केली. गेल्या आठवड्यात शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला होता. मात्र मनपाच्या अतिक्रमण विभागाची कारवाई थंडावल्याने हळूहळू शहरातील मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण पूर्वपदावर येत आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर केलेले अतिक्रमण स्वत:च्या हाताने हटवा, अन्यथा कारवाईसाठी तयार राहण्याचा इशारा मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी अतिक्रमणधारकांना दिला होता. आयुक्तांच्या या निर्णयाचे सर्वसामान्य अमरावतीकरांनी स्वागत केले होते. आयुक्तांच्या आदेशावरून अतिक्रमण विभागाने धडाकेबाज कारवाई सुरू केली होती. मागील आठवड्यात या कारवाईत सातत्य दिसून आले. या कारवाईमुळे शहरातील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला असतांना अचानक ही कारवाई थंडावली. त्यामुळे पुन्हा एकदा शहरातील अतिक्रमण पूर्वपदावर येत असल्याचे दिसून येत आहे.

### नवलाईचे नऊ दिवस ?

शहरात नव्याने रुजू झालेला अधिकारी आपल्या पदाची सूत्रे हाती स्वीकारताच आपल्या अधिनिस्त काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यावर जरब बसविण्यासाठी सुरुवातीला कडक धोरण अवलंबितात. नवलाईचे नऊ दिवस संपली की हळूहळू त्या अधिकाऱ्यांचा रुबाब कमी होत जातो. हा आजपर्यंतचा अमरावतीकरांचा अनुभव आहे. नेमकी हीच परिस्थिती मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांच्या बाबतीत होऊ नये अशी मापक अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त केल्या जात आहे.

### संघटनेचा दबाव की लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेप ?

शहरातील मुख्य चौकात तसेच रस्त्याच्या बाजूला, फूटपाथवर दुतर्फा हातगाड्या व छोट्या व्यवसायकांनी आपली दुकाने थाटली आहे. शहराचा व्याप दिवसेंदिवस वाढत असताना रस्त्यावर रोज शेकडो वाहनाची भर पडत आहे. त्यामुळे वाहतुकीसाठी रस्ते अपुरे पडत आहे. अशा परिस्थितीत अतिक्रमणधारकांवर कारवाईचा बडगा उगारल्याने त्याला हॉकर्स युनियनने प्रचंड विरोध केला. याविरोधात युनियनने एकदिवशीय आंदोलनसुद्धा केले होते. तसेच या कारवाई शहरातील काही लोकप्रतिनिधींनी सुद्धा हस्तक्षेप केल्याचे बोलल्या जात आहे. मनपाची ही कारवाई संघटनेच्या दबावाला की बळी पडली, अशी उलटसुलट चर्चा सध्या सर्वसामान्य नागरिकांमध्ये रंगली आहे.

# अभियंत्यासह ग्राम पंचायत कर्मचाऱ्याला लाच घेताना पकडले

## चांदूर रेल्वे पं.स. कार्यालयातील घटना

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** घरकूल बांधकामाचा दुसरा टप्पा काढून देण्यासाठी तक्रारदार यांना आरोपींनी पाच हजार रूपयाची लाच मागितली होती. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाच घेताना पंचायत समिती चांदूर रेल्वे कार्यालय परिसरात रंगेहाथ पकडले.

ही घटना ४ ऑगष्टला दुपारच्या सुमारास घडली. आरोपी राहुल रामकृष्ण नांदणे (३०) ग्रामीण गृहनिर्माण अभियंता पंचायत समिती चांदूर रेल्वे, प्रविण भास्करराव धाडसे (३८) ग्रामपंचायत पळसखेड अशी लाचखोर आरोपींची नावे आहे. तक्रारदार यांना घरकूलाच्या दुसऱ्या टप्प्याचे वडिलांच्या व स्वत:च्या नावाचे ७०-७० हजार रूपए काढून देण्यासाठी आरोपी राहुल नांदणे व प्रविण धाडसे यांनी प्रत्येकी ५-५ हजार रूपयाची मागणी केली होती. तक्रारदार यांनी याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केलर होती. आरोपींनी तक्रारदार यांना पैसे मांगितल्याचे निष्पन्न झाल्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने आरोपींना पाच हजार रूपयाची लाच घेताना पंचायत समिती चांदूर रेल्वे कार्यालय परिसारत रंगेहाथ पकडले.

दोन्हीं आरोपींना ताब्या घेतले असून त्यांची चौकशी सुरू आहे. ही कारवाई सुनिल गिनके पोलिस उपअधिक्षक, सुनिल निरीक्षक चित्रा मेसरे, पोलिस निरीक्षक सुजाता बनसोड, प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, महेंद्र साखरे, सतीश किटूकले यांनी केली आहे.

# महिला पोलिस कर्मचाऱ्याची हत्या करणारे दोघे अटकेत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

*अमरावती, दि. ४ : फ्रेजरपूरा पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या एसआरपीएफमध्ये कार्यरत पोलिस अहमलदार राहुल तायडे यानेच आपल्या पत्नीचा खून घडून आणल्याचे तपासा दरम्यान उघड झाले. तशी कबूली त्याने दिली आहे. मात्र दोन मित्राच्या सहायाने त्यांना वारंवार पैसे देवून स्वत:च्या पत्नीलाच गळा आवरून संपविले. पोलिसांनी दोघांना सोमवारी शहरातूनच ताब्यात घेतले आहे. आरोपींना न्यायालयात सादर केले असता पोलिस कोठडी सुनावली आहे. तसेच आरोपी राहुल तायडे याच्या प्रेमिकेला सुद्धा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.*

## राहुलची प्रेमिकाही पोलिसांच्या ताब्यात



श्रेयस महल्ले (२५), ओम शेकार (१८) अशी हत्या करणाऱ्या आरोपींची नावे आहे. आरोपी पती राहुल तायडे याने त्याचे मित्र श्रेयस आणी ओम यांना आर्थिक स्वरूपाची सुपारी दिली होती. टप्प्याने टप्प्याने पैसे सुद्धा दिले. महिला पोलिस कर्मचारी आशा घुळे हिला संपविण्यासाठी पाच लाख रूपयाची सुपारी दिली होती. त्यापैकी ५० हजार रूपये दोन आरोपींना दिल्याचे निष्पन्न झाले आहे. १ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास महिला पोलिस कर्मचारी आशा घुळे यांचा मृतदेह त्यांच्याच गुरूकृपा कॉलनीतील घरी संशयास्पद स्थितीत आढळला होता. मात्र पोलिसांनी पती राहुल तायडे याच्यावर संशय आल्याने त्याला २ ऑगस्ट रोजी अटक केली. मात्र तो मूंग गिडून बसला आहे. राहुल तायडे सह मृत आशा व एक मोबाईल पोलिसांनी जप्त केला आहे. तो मोबाईल सायबर पोलिसाकडे देण्यात आला असून त्यातील सीडीआर डिटेल ॲनालिसीस केले जात आहे. याशिवाय सीसीटीवी फूटेज व अन्य तांत्रिक पुरावे जमा केले जात आहे. आशा घुळे यांच्या खुनाचा ४ ते ५ तासातच ताब्यात उलगडा केला. या प्रकरणातील दोन आरोपी फरार असताना पोलिसांनी गुन्हे शाखेचे व फ्रेजरपुरा पोलिसांचे पथक तैनात केले होते. परंतु फ्रेजरपुरा पोलिसांच्या डीबी पथकातील जमादार सुभाष पाटिल, सचिन बोरकर, जावेद पटेल, प्रशांत वानखडे, सागर चव्हाण यांनी आरोपींना ठाणेदार सिरसाट व पोलिस निरीक्षक गावंडे यांच्या मार्गदर्शनात अटक केली आहे. मात्र फ्रेजरपुरा पोलिसांनी हा तपास आता गुन्हे शाखेकडे सोपविला आहे.

> दोन्ही मारेकरांना आरोपी पतीने आर्थिक स्वरूपात सुपारी दिल्याचे निष्पन्न झाले. मात्र ती रक्कम किती याचा उलगडा मात्र झालेला नाही. पोलिसांनी दोन आरोंपीना ताब्यात घेतले असून सोमवारी न्यायात नेले जाणार आहे. पोलिस कोठडी मिळाल्यावर आरोपी कडून आणखी माहिती गोळा केली जाणार आहे. या प्रकरणात तपासाअंती आणखी काही आरोपी असल्यास त्यांना सुद्धा ताब्यात घेतले जाणार आहे.
>
> **गणेश शिंदे**
> **पोलिस उपायुक्त**

# हॉकर्स झोनच्या मागणीसाठी शेकडोंची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

## मनपा प्रशासनाविरोधात प्लास्टिक बंदुका घेऊन घोषणाबाजी; तातडीने मागण्या मान्य करण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत प्रतिनिधी



**अमरावती, दि. ४ :** युवा स्वाभिमान पार्टीच्या अंतर्गत कार्यरत हॉकर्स संघटनेच्या अमरावती वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. इर्विन चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात झाली.

शहरातील शेकडो हॉकर्स या मोर्चात सहभागी झाले होते. हातात प्लास्टिकच्या बंदुका घेऊन त्यांनी मनपा प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली. अतिक्रमण निर्मूलन थांबवा, हॉकर्स झोन द्या, अशा घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला. हॉकर्स संघटनेने स्पष्टपणे सांगितले महानगरपालिकेकडून वारंवार केली जाणारी अतिक्रमण हटाव कारवाई अन्यायकारक असून शहरात अधिकृत हॉकर्स झोन उपलब्ध करून दिले गेले पाहिजे. प्रशासनाने तातडीने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेकडून देण्यात आला. आता हिंदु धर्मातील सर्व सनाचे दिवस असून यामध्ये गणेशोत्सव, नवरात्र व दिवाळी असल्याने या कार्यवाहीमुळे सर्व हॉकर्स धारक हे आपला व्यवसाय करु शकत नसल्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ येत आहे. आपणांस विनंती आहे की, ज्या प्रकारे नक्षलवाद्याना आत्मसर्पण केल्यास त्यांचा मुलांना शासन नोकरी देते त्याच प्रमाणे हॉकर्स व्यावसायीकांनी हॉकर्स व्यवसाय बंद केल्यास त्यांचा मुलांना नोकरी शासनाने देण्याचा निर्णय घ्यावा. आमच्या हॉकर्स व्यावसायीकांना हातामध्ये बंदुक सुध्दा घेवुन नक्षलवाधी तयार करण्याचा प्रयत्न शासनाने करु नये. असेही निवेदनात स्पस्ट केले आहे.

सदर कार्यवाही मनपा थांबविण्याकरीता प्रशासनाला निर्देश दयावेत व सर्व हॉकर्स व्यावसायिकांना न्याय मिळवुन दयावा अशी मागणी स्वाभिमानी हॉकर्स युनियन च्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा अध्यक्ष गणेश मरोडकर, दिगंबर कोरडे, वंदना शिरभाते, संदीप भुयार सह शेकडो पथविक्रेते या मोर्चात सहभागी झाले होते.

# स्वच्छता विभागाची 'स्वच्छता' करण्याची गरज

## मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती, दि. ४ :** महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी पदभार स्वीकारताच शहर स्वच्छतेचा धडाका लावला आहे. गल्लीबोळांपासून मुख्य रस्त्यांपर्यंत साफसफाई, कचरामुक्त मोहिमा आणि जनजागृती उपक्रम सध्या जोरात सुरू आहेत. मात्र, या सर्व उपक्रमांतूनच एक प्रश्न निर्माण झाला आहे तो, स्वच्छता विभागाचीच स्वच्छता कधी होणार ?

महापालिकेच्या स्वच्छता विभागात गेल्या अनेक वर्षांपासून तीच तीच मंडळी एकाच जागी बसून कार्यरत आहेत. पाच ते दहा वर्षापासून त्याच कार्यालयात, त्याच पदावर काम

करणाऱ्यानी विभागात अदृश्य वर्चस्व प्रस्थापित केले आहे. हे अधिकारी व कर्मचारी पदावर जणू सापासारखी कुंडली मारून बसलेले असून, यामुळे नव्या विचारांची आणि कार्यशैलीची पूर्णपणे गळचेपी झाली आहे. या सर्व दीर्घ कर्मचार्यांच्या स्थायिकतेमुळे विभागात नवीन कर्मचाऱ्यांना संधीच मिळत नाही, आणि कार्यपद्धतीत एकाधिकारशाही व कामचुकारपणाचे सावट पसरले आहे. अनेक वेळा तक्रारी कंत्राटी कामे किंवा साफसफाईच्या नियोजनात मनमानी कारभार होत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

> **आता बदलाची वेळ**
>
> आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्याकडे शहराची बाह्य स्वच्छता करण्यात यश मिळवत असताना, आता त्यांनी महापालिकेच्या आतल्या यंत्रणेतील साफसफाईकडे लक्ष देणे गरजेचे आहे. प्रत्येक कर्मचार्याचे ठराविक कालावधीनंतर बदल होणे ही प्रशासनातील पारदर्शकतेची पहिली पायरी असते. स्वच्छ भारत अभियान यशस्वी करायचे असेल, तर स्वच्छतेच्या रक्षणासाठी बसवलेल्या यंत्रणेलाच प्रथम स्वच्छ करणे अत्यावश्यक आहे.

### विभागातील दीर्घकालीन 'स्थायिक' मंडळी

- डॉ. अजय जाधव - वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) ५ ते ७ वर्षांपासून विभागप्रमुख
- श्रीकांत डवरे - प्रभारी आरोग्य अधीक्षक तात्पुरती नियुक्ती असूनही दीर्घकाळ कार्यरत
- प्रल्हाद चव्हाण - वरिष्ठ लिपिक ५ वर्षांहून अधिक काळ कार्यरत
- अनिता सावलकर - कनिष्ठ लिपिक अंदाजे ७-८ वर्षांपासून विभागात
- मनीष परांजपे - कनिष्ठ लिपिक सुमारे ३ वर्षांपासून
- संगीता बढिये - कनिष्ठ लिपिक सुमारे ३ वर्षांपासून
- दिनेश मावस्कर - शिपाई १० वर्षांहून अधिक काळ विभागातच

# पंतप्रधानांच्या 'स्वच्छ भारत मिशन'ची लावली वाट!

## चांदूरबाजार बाजार नगर परिषद प्रशासनाचा कारभार

दै. अजिंक्य भारत | गजानन ढवळे

**चांदूर बाजार, दि. ४ :** मागील कित्तेक महिन्या पासून स्थानिक नगर परिषद प्रशासनाने स्थानिक नागरिकांच्या आरोग्याशी खेळ चालवला आहे. ठिक ठिकाणी घाणीचे साम्राज्य संपूर्ण शहरात पसरले आहे, घरासमोर कचरा उचलण्या करिता येणाऱ्या गाड्या दोन दोन तीन तीन दिवस येत नाही, मार्केट परिसरात अस्वच्छतेचा कळस आहे. नाल्यामधील घाण महिना महिना भर दिवस काढल्या जात नाही.

स्थानिक प्रशासन अधिकाऱ्याला या संबंधी जाब विचारल्यास नप मध्ये फंड नाही त्यामुळे माणसे पाठवणे शक्य होत नाही असे उडवा उडवीची उत्तरे दिली जातात जेव्हाकी मागील कित्तेक महिन्या पासून स्वच्छ भारत चा निधी नगर परिषद मध्ये पडून आहे व घनकचरा संकलनाची प्रशासकीय मान्यता सुद्धा मा. जिल्हाधिकारी यांनी २ महिन्या अगोदर दिली आहे परंतु आज पर्यंत ३ दा संबंधित टेंडर लागून अजून सुद्धा कुणाला हे काम दिले गेलेले नाही. चौकशी केली असता असे समजले की स्थानिक प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्याच्या मर्जीतील गोंदिया येथील कॉन्ट्रॅक्टर लाच हे टेंडर त्यांना मॅनेज करून द्यायचे आहे त्यामुळे अनावश्यक अटी टेंडर मध्ये लादून तीन तीन दा ते टेंडर रिपीट करून त्याचा खेळखंडोबा स्थानिक प्रशासनाने चालविला आहे.

अशा प्रकारे स्थानिक अधिकाऱ्यांनी स्वत:च्या फायद्या करिता स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात घाऊन स्वच्छ भारत मिशन चे माननीय पंतप्रधानाचे स्वप्न पूर्णपणे धुळीस मिळवित आहे व या संदर्भात स्थानिक आमदार सुद्धा यांना पाठीशी घालून अभय देत आहे. तरी आज प्रहार पक्षा तर्फे स्थानिक प्रशासनाला हे आहावन देण्यात येत आहे की जर येत्या तीन दिवसात तुम्ही चांदूरबाजार शहराची दैनंदिन साफसफाई, तसेच कचरा संकलन व नाली ची साफसफाई सुरू केली नाही तर संपूर्ण शहरातील कचरा जमा करून नगरपरिषद कार्यालय मध्ये कचरा आणून टाकून संबंधित दिरंगाई चा निषेध नोंदवण्यात येईल तरी ही प्रशासनाला जाग नाही आली तर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.



अजिंक्य भारत
# आपलं अमरावती



अमरावती, मंगळवार, दि. ५ ऑगस्ट २०२५

## आरोग्य उपकेंद्राची नवीन इमारत धूळखात; रुग्णांची गैरसोय

### अन्यथा सामान्य नागरिकांच्या हस्ते करू लोकार्पण-हटवार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** प्राथमिक आरोग्य केंद्र,माहुली जहागीर अंतर्गत आरोग्य उपकेंद्र नांदगाव पेठ येथे मागील वर्षी माजी आ.यशोमती ठाकूर यांच्या निधीतून एक कोटी वीस लक्ष रुपये खर्च करून उपकेंद्राची नवी इमारत तसेच आरोग्य सेविकेसाठी निवासस्थान बांधण्यात आले. इमारती तयार होऊन सहा महिने अधिक झाले मात्र तरीही ही इमारत उदघाटनाच्या प्रतीक्षेत असून धूळखात पडलेली आहे. रुग्णांची होत असलेली गैरसोय बघता पंधरा दिवसात ही इमारत खुली करण्यात यावी अन्यथा सामान्य नागरिकांच्या हस्ते या इमारतीचे उदघाटन करण्यात येईल असा इशारा माजी जि.प.सदस्य नितीन हटवार यांनी दिला आहे.

गावातील आरोग्य सेवेसाठी जिल्हा परिषद बांधकाम विभागाने तब्बल एक कोटी वीस लाख रुपये खर्च करून उभारलेली नवीन इमारत गेल्या अनेक



दिवसांपासून धुळखात पडली आहे. आवश्यक कागदोपत्री पूर्तता न झाल्याने इमारतीचा ताबा आरोग्य विभागाला दिला गेला नाही. त्यामुळे रुग्णांना नव्या सुविधांचा लाभ मिळत नसून त्यांना जुनी व जीर्ण इमारत किंवा मर्यादित जागेत उपचार घ्यावे लागत आहेत.

या संदर्भात माजी जि.प.सदस्य नितीन हटवार यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यांनी म्हटले की, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे हे अक्षम्य दुर्लक्ष आहे.

लाखो रुपये खर्च करूनही इमारत रुग्णांच्या सेवेत न आणणे हे अन्यायकारक आहे. येत्या पंधरा दिवसांत किरकोळ कामे पूर्ण करून इमारत सुरु करावी, अन्यथा ग्रामस्थांसोबत मिळून आम्हीच इमारत उघडून रुग्णांच्या सेवेत देऊ.इमारत पूर्ण असूनही केवळ कागदोपत्री विलंब होत असून आरोग्य सेवांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचत नाही.

त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करून इमारतीचा ताबा आरोग्य विभागाला द्यावा, अशी मागणी नितीन हटवार यांनी केली आहे.

#### जुनी इमारत धोकादायक

५० वर्षांपासून वापरात असलेली आरोग्य उपकेंद्राची जुनी इमारत सध्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून पावसाळ्यात सर्वत्र पाणी गळतीची समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहे. इमारतीतील छत, भिंती आणि खिडक्या अशा सर्व ठिकाणी पाणी शिरल्याने कर्मचाऱ्यांसह येथे येणाऱ्या रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.

## थोडक्यात

### क्षुल्लक कारणावरून नातेवाईकाला मारहाण

**अमरावती :** एकाच घरी राहणाऱ्या दोन नातेवाईकांचा क्षुल्लक गोष्टीवरून वाद झाला. त्यात एकाने दुसऱ्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकून मारहाण केली, तर दुसऱ्यानेही हॉकी स्टिकने डोक्यावर मारत जखमी केले. ही घटना विलास नगर येथे घडली. याबाबत नातेवाईक महिलेसह धर्मेश भीमराव सोळंके (४९) यांनी दिलेल्या परस्परविरोधी तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी एकूण सात जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले.

### विवाहितांचा पैशांसाठी छळ

**अमरावती :** लग्नात हंडा कमी दिला, माहेरवरून पैसे आण, तू मला आवडत नाही, तुझ्या माहेरच्यांनी लग्नात हुंडा दिला नाही, लग्नात मिळालेले खाऊचे पैसे पत्नीकडून जबरदस्तीने हिसकावून घेत तिचा पैशांसाठी वारंवार छळ करीत शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचया तक्रारी शहरातील तीन विवाहितांनी गाडगे नगर पोलिसात नोंदवल्या. या प्रकरणी पोलिसांनी फिर्यादींच्या तक्रारीवरून सासरच्यांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### बसमधून महिलेचे दागिने लंपास

**अमरावती :** घरी कुणी नसल्याने अंदाजे ४ लाख ९५ हजारांचे ११७ ग्रॅम सोन्याचे दागिने घेवून महिला यवतमाळ येथून यवतमाळ-वरुड बसने प्रवास करीत शहरातील राजापेठ बसस्टँडवर उतरली. गर्दीचा फायदा घेत एका अनोळखी महिलेने तिच्या बॅगेतून दागिने असलेली पर्स चोरून नेली. ही बाब ती जयस्तंभ चौकात गेल्यावर बॅगची चेन उघडी दिसल्याने लक्षात आली. याबाबत तिने राजापेठ पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### ऑटोतून महिलेची पर्स पळविली

**अमरावती :** सवारी ऑटोतून प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या पर्समधून अज्ञाताने रोख १३ हजार रुपये चोरून नेले. ही घटना गांधी चौकात घडली. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### विद्यापीठ मार्गावरून दुचाकी लंपास

**अमरावती :** विद्यापीठ मार्गावरील एका कॉम्प्लेक्स समोर उभी केलेली दुचाकी (एमएच २७-एडब्ल्यू ९८०१) अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत ४० हजार रुपये आहे. याबाबत सैय्यद फैजान अली सैय्यद साजीद अली (३०) यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात विरुद्ध गुन्हा दाखल केला.

### दवाखान्यासमोरून दुचाकी लंपास

**अमरावती :** गाडगे नगर पोलीस ठाण्यांतर्गत एका दवाखान्यासमोर उभी असलेली दुचाकी अज्ञाताने चोरून नेली. याबाबत भुषण विजयराव राहटे (२५, रा. संमती कॉलनी) यांच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### चारचाकीची टिप्परला धडक

**अमरावती :** नांदगाव पेठ टोल नाक्यावर कार रिव्हर्स घेताना ती मागून आलेल्या टिप्परला धडकली. त्यामुळे टिप्परचे नुकसान झाले. टिप्पर चालकाने कार चालकाला थांबण्यास सांगितले असता, त्याने कार घेवून पळ काढला.

## जिजाऊ ब्रिगेड शाखेची त्रैमासिक बैठक उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** जिजाऊ ब्रिगेड बडनेरा अंतर्गत जिल्हा परिषद शाखेची त्रैमासिक बैठक अत्यंत आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात पार पडली. या बैठकीमध्ये मागील उपक्रमांचा आढावा घेण्यात आला तसेच आगामी योजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या वेळी महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपाययोजनांवर विशेष भर देण्यात आला. बचत गटाच्या माध्यमातून लघुउद्योग आणि घरगुती उद्योग वाढवण्याबाबत उपस्थित सदस्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. सर्वानुमते बचत गट सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यास एकमुखी संमती देण्यात आली. या निर्णयामध्ये छाबडा प्लॉट शाखेच्या अध्यक्ष सन्माननीय मंदाताई कदम यांनी बचत गटाच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. बैठकीत काही विशेष क्षण साजरे करण्यात आले. शाखेच्या उपाध्यक्षा



सन्माननीय वर्षाताई रोडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच सन्माननीय छायाताई कडू यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या बैठकीत पर्यावरण रक्षणाचाही मुद्दा मांडण्यात आला. सर्वानुमते वृक्षारोपण उपक्रम राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीचे संचालन शाखा अध्यक्षा सौ. कल्याणी कापसे यांनी तर प्रास्ताविक सचिव सौ. शितल जांभे यांनी केले. यावेळी मैथिली पाटील यांनी जिजाऊ ब्रिगेडच्या कार्याचे विस्तृत मार्गदर्शन नवीन व जुन्या सदस्यांना दिले. सन्माननीय डॉ. रोडे यांनी महिलांच्या सक्षमीकरणासोबतच त्यांच्या आरोग्यविषयक अडचणी आणि उपायांवर प्रकाश टाकला. सर्व पदाधिकाऱ्यांनी आपली मते मांडत बैठक प्रभावीपणे यशस्वी केली. कार्यक्रमाचे आभार माजी सरपंच सौ. दिवाण यांनी मानले. या बैठकीला उपस्थित पदाधिकाऱ्यां मध्ये शितल जांभे, वर्षा रोडे, अनिता बाजड, शिल्पा कापसे, वैशाली बाजड, मैथिली पाटील, मंदा कदम, चंदन दिवाण, राजश्री दिवाण, मीनाक्षी कडू, वंदना गायगोले, छाया कडू, शिल्पा हांडे, नंदाताई चितोडे, सीमा पंडित, कल्पना कथे, निलीमा देशमुख, अर्चना डेंगळे, नूतन काळे व इतर सदस्य उपस्थित होते.

## झटका मशीनसह केबल चोरी

**शिरजगाव कसबा :** गेल्या काही दिवसांपासून शिरजगांव कसबा येथे चोरीच्या घटनामध्ये वाढ झाला आहे. रात्रीच्या सुमारास चोर कधी दुकान तर कधी शेतातील साहित्यची चोरी करीत आहे. अशीच एक घटना पळसवाडा शिवारात रविकिरण सुरेशराव लकडे (३१, रा. कविठा बु.) यांचे पाच एकर शेत आहे. त्यात टिनाच्या शेडची झोपडी आहे. त्या झोपडीतून अज्ञाताने झटका मशिन विहिरीतील पंपाला जोडलेला तांब्याचा केबल व झोपडीचे कुलूप तोडून एकूण ६ हजार ८०० रुपयांचे साहित्य चोरून नेले. या प्रकरणी शिरजगाव पोलिसांनी अज्ञात विरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास शिरजगांव कसबा पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहे.

## नगर परिषद मुख्याधिकारी दालनात मोकाट जनावरांना कोंडून तीव्र आंदोलन

### आमदार गजानन लवटे यांच्या पुढाकार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. ४ :** दर्यापूर तालुक्यातील नगर परिषद परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध मुलभूत नागरी सेवा सुविधा, समस्या तातडीने सोडविण्याबाबत याबाबत नगर परिषद विभागाचे मुख्याधिकारी यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी अनेक विनंती पूर्वक निवेदने सादर केली आहेत. बरेच वर्षापासून नगर परिषद विभागाकडे प्रशासकीय राज सुरु असून मनमानी पद्धतीने कार्यभार सुरु आहे. दर्यापूर शहरातील जनतेला भेडसावणार्या समस्यांचा निपटारा करणेबाबत नगर परिषद प्रशासनाकडून कोणतेही



लेखी उत्तर अद्यापही प्राप्त झाले नाही.

त्यामुळे नगर परिषद प्रशासनाला नागरिकांना भेडसावणा-या मुलभूत नागरी सेवा सुविधा, समस्या सोडविण्याबाबत नगर परिषद प्रशासनाची उदासीनता दिसून येत आहे. मुख्याधिकारी यांनी जनतेला भेडसावणा-या अपुऱ्या असलेल्या नागरी सुविधा पूर्णपणे उपलब्ध करून देण्यात याव्यात. नागरिकांच्या समस्यांचा निपटारा ५ ऑगस्ट रोजीच्या आत बैठकीचे आयोजन करून सोडविण्यात बाबत युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या वतीने अंतिम सूचना मुख्याधिकारी यांना दिली आहे.

## अणाभाऊ साठे जयंतीनिमित्त वृक्षारोपण



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदुर बाजार, दि. ४ :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त 'एक पेड माँ के नाम' या सामाजिक उपक्रमांतर्गत चांदुर बाजार येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी विविध शासकीय अधिकारी, कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. पर्यावरण संवर्धनासोबत मातृभक्तीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला. अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्याचा आदर्श घेऊन, त्यांच्या जयंतीनिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमाद्वारे पर्यावरणाची जपणूक करण्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थितांनी पेडांचे संगोपन करण्याचे वचन देत उपक्रम राबविण्यात आला यावेळी तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी नायब तहसीलदार यम्बरवार, नायब तहसीलदार मनोज सोनारकर सुमेध सोनोने, बोबडे,तसेच दस्त एवज समिती अध्यक्ष रवींद्र खांडेकर. पंजाब वानखडे ईश्वरदास तायडे श्रीकृष्ण तायडे उमेश वानखडे मधुकर देशमूख प्रेम आमटे मनोज खडसे श्याम रामेकर सुनील तंतरपाळे गजानन ढवळे दिनेश तायडे गवई गजानन कावरे आदी उपस्थित होते

## स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान अंतर्गत बसस्थानकाचे मूल्यमापन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**चांदुर बाजार** - येथील बस स्थानक येथे चंद्रपूर विभागाची समिती द्वारे मूल्यकन करण्यात आले बस स्थानक येथील प्रवास्याच्या करिता बसण्याकरिता बेंच व्यवस्था तसेच जाहिरात करिता टी. व्ही. गावाचे नावाचे फलक महिला प्रसाधन गृह पुरुष प्रसाधन गृह फॅन ची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच बस



स्थानकमध्ये गार्डन मध्ये गुलाबाच्या कलम लावण्यात आल्या सायकल स्टॅंडची व्यवस्था सि. सी. टी व्ही. कॅमेरे लावण्यात आले हिरकणी कक्ष उपहार गृह तसेच संपूर्ण परिसराची पाहणी करण्यात आली यावेळी चंद्रपूर विभागाचे विभाग नियंत्रक स्मिता गो. सुतवणे मॅडम यांचे स्वागत पत्रकार गजानन कावरे व पत्रकार गजानन ढवले यांचे हस्ते करण्यात आले तसेच विभागीय अभियंता चंद्रपूर ऋषिकेश होले यांचे स्वागत चांदुर बाजार आगार व्यवस्थापक प्रवीण डायळकर यांनी केले तसेच यावेळी रावसाहेब मेकश्वर सह वाहतूक नियंत्रक लेखकार गौतम बनसोडे वाहतूक निरीक्षक राजेंद्र सोळंके लिपिक अतुल माकोडे लिपिक सौं. विजया चव्हाण पत्रकार गजानन कावरे वंदे भारत टी व्ही. सार्थक महाराष्ट्र. पत्रकार गजानन ढवळे अजिंक्य भारत उपस्थित होते.

## रायुकाँ शहरच्या क्रीडा सेल अध्यक्षपदी सार्थक खोरगडे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती शहर (जिल्हा) कडून आज प्रभाग तिथे राष्ट्रवादी या अभियानांतर्गत नियुक्तीपत्र वितरण सोहळा दिमाखात संपन्न झाला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती शहर च्या वतीने आयोजित सोहळ्यात महत्वपूर्ण पद नियुक्ती करण्यात आल्या आहेत.

अमरावती शहर क्रीडा सेल अध्यक्ष तथा शहर संघटक पदावर सार्थक राजेंद्र खोरगडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विधानपरिषद आमदार संजय खोडके व अमरावती




विधानसभा आमदार सुलभाताई खोडके यांनी हे नियुक्तीपत्र प्रदान केले. नुकतच अमरावती शहरात विदर्भ ॲमेच्योर कबड्डी असो, अमरावती जि. कबड्डी असो. व शोध प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झालेल्या भव्य कबड्डी स्पर्धेच्या नियोजनात सार्थक यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. तसेच जिल्हा व राज्यस्तरावर होणाऱ्या फुटबॉल व क्रिकेट सामन्यांमध्येही सार्थक यांचा सहभाग असतो. फार कमी काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती शहरच्या कार्यात त्यांनी आपला सकारात्मक सहभाग नोंदवला आहे.

## संत्रा उन्नती प्रकल्पाचे काय? आठ वर्षापासून विदर्भातील शेतकरी प्रतीक्षेतच!

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**मोर्शी, दि. ४ :** विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्याधुनिक फूडप्रोसेसिंग प्रकल्प उभारण्याचे स्वप्न अद्यापही अधुरेच राहिले आहे. मोर्शी तालुक्यातील दापोरी (ठाणाठुणी) येथे २९ डिसेंबर २०१६ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन झालेल्या 'जैन फार्म फ्रेश-हिंदुस्थान कोका कोला संत्रा उन्नती प्रकल्पाची' प्रत्यक्ष उभारणी अद्याप सुरू झालेली नाही.

६०० कोटींच्या गुंतवणुकीचा हा प्रकल्प तब्बल 8 वर्षापासून रखडला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 'मेक इन इंडिया' अंतर्गत झालेल्या सामंजस्य कराराचा देखील काहीच ठसा प्रत्यक्षात दिसत नाही.

दरम्यान, १९५७ पासून अनेक अर्थसंकल्पात संत्रा प्रक्रिया प्रकल्पांच्या घोषणा झाल्या, पण कोणताही प्रकल्प यशस्वीपणे कार्यान्वित झाला नाही. संत्र्याला योग्य भाव न मिळाल्याने शेतकरी अडचणीत असून, जुने प्रकल्प जसे 'सोपॅक', 'नोगा' अपयशी ठरले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे रूपेश वाळके यांनी हा प्रकल्प पूर्णत्वास नेण्याची मागणी केली असून, शासनाच्या उदासीनतेमुळे संत्रा उत्पादकांचा हिरमोड झाल्याचे ते म्हणाले. आता मुख्यमंत्री फडणवीस संत्रा शेतकऱ्यांना दिलेले वचन पूर्ण करणार का? हाच मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

## ७ कंपन्यांकडून आले प्रस्ताव | १०० कोटींच्या प्रकल्पात झोन कार्यालये, पार्किंगचा समावेश

# नवीन इमारतीसाठी 'पीएमसी' प्रक्रिया अंतिम टप्प्यात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि. ४ :** अमरावती महानगरपालिकेची सध्याची प्रशासकीय इमारत जीर्ण झाल्याने आणि जागेच्या कमतरतेमुळे नवीन बहुमजली इमारत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या इमारतीसाठी प्रकल्प सल्लागार समिती नियुक्त करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे. यासाठी सात कंपन्यांनी आपले प्रस्ताव सादर केले असून, गुरुवारी (दि. १७) किंवा शुक्रवारी (दि. ८) त्यांचे सादरीकरण अपेक्षित आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या सध्याच्या इमारतीची जागा अपुरी आणि जुनी होत चालली आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री आणि जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ. सुलभा खोडके आणि आ. रवी राणा यांनी नवीन प्रशासकीय इमारतीची मागणी केली होती. प्रस्तावानुसार सुमारे १०० कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चात,



### ६७०६ चौरस मीटर क्षेत्रफळात उभारणी

नवीन प्रशासकीय इमारत महापालिकेच्या सध्याच्या जागेवरच म्हणजेच ६७०६ चौरस मीटर क्षेत्रफळात उभारली जाणार आहे. याआधी कृषी विद्यापीठाची जागा तसेच महापौरांच्या बंगल्याची जागा विचारात घेण्यात आली होती. परंतु दोन्ही जागा अपुऱ्या ठरल्या. त्यामुळे जुन्याच ठिकाणी नवीन इमारत उभी राहणार आहे.

पार्किंगसह पाचही झोन कार्यालये एकाच छताखाली आणली जाणार आहेत. महापालिकेच्या इमारतीसाठी आर्किटेक्ट आणि पीएमसी नियुक्त करण्याची निविदा प्रक्रिया महापालिकेने जाहीर केली होती. यासाठी मिळालेल्या सात प्रस्तावांपैकी योग्य कंपनीची निवड पुढील आठवड्यात होणार आहे. सध्याच्या महापालिकेच्या इमारतीला लागून तीन बाजूंनी व्यवसाय संकुल आहे. येथील व्यापाऱ्यांच्या जागांची मुदत एक वर्षापूर्वीच संपली असून, त्यांना नवीन इमारतीत जागा दिली जाणार का? यावर अजून स्पष्टता नाही. दरम्यान, नवीन बांधकाम अडथळ्याशिवाय पार पडावे यासाठी या दुकानांचे स्थलांतर करण्याचा विचार सुरू आहे.

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
मंगळवार, दि. ५ ऑगस्ट २०२५ www.ajinkyabharat.com



महत्वाचे



## 'मनसे'च्या दिग्रस तालुका अध्यक्षपदी प्रशांत गौरकरी

दिग्रस, दि. ४ प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दिग्रस तालुका अध्यक्षपदी युवा सामाजिक कार्यकर्ते प्रशांत गौरकर यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे तालुक्यातील पक्ष संघटनेला बळकटी मिळण्याची आशा व्यक्त होत असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि नेते राजू उंबरकर व राज्य उपाध्यक्ष आनंद येंबडवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. रविवारी, ३ ऑगस्ट रोजी, जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार यांच्या हस्ते गौरकर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. प्रशांत गौरकर हे तालुक्यात एक सक्रिय सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वी मनसेचे दिग्र-स शहर अध्यक्ष म्हणूनही यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून पक्ष वाढीसाठी मोठे योगदान दिले होते. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन पक्षाने त्यांच्यावर तालुका अध्यक्षपदाची मोठी जबाबदारी सोपवली आहे. गौरकर यांच्या निवडीमुळे तालुक्यातील युवकांमध्ये आणि पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी काळात त्यांच्या नेतृत्वात पक्ष संघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




## विद्यार्थ्यांच्या 'हस्तलिखिता'चे विमोचन

नेर (परसोपंत), दि. ४ प्रतिनिधी

नेर येथील दि इंग्लिश हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा विभागाच्या वतीने 'विद्यार्थी हस्तलिखित' या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. गटशिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे यांच्या हस्ते या हस्तलिखिताचे विमोचन झाले. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन देणे हा यामागील उद्देश होता. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांच्या निर्देशानुसार आणि प्राचार्य गजानन उईके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी मंगेश देशपांडे होते. त्यांच्या हस्ते हस्तलिखिताचे विमोचन झाले. यावेळी विस्तार अधिकारी नितीन जाधव, वंदना नाईक, संजय कुकडे, वंदना नागतोडे, उपप्राचार्य प्रा. किशोर राठोड, पर्यवेक्षक किरण राय, शिक्षण निरीक्षक प्रा. अरुण नरवडे उपस्थित होते. मराठी भाषा विभाग प्रमुख प्रा. अनंत हिरुळकर यांनी या उपक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना नातं, वेळ, आयुष्य, मैत्री असे विविध विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मौलिकता, सजावट आणि वैचारिक खोली यांची सांगड घालत उत्तम हस्तलिखिते तयार केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या लेखन आणि संभाषण कौशल्याला चालना मिळेल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. अनंत हिरुळकर यांनी केले.

## राळेगावच्या अनन्या उत्तरवारची राष्ट्रीय ॲबॅकस स्पर्धेत बाजी

राळेगाव, दि. ४ प्रतिनिधी

राळेगाव येथील श्री चिंतामणी सुपर ॲबॅकस अकॅडमीची विद्यार्थिनी अनन्या निलेश उत्तरवार हिने राष्ट्रीय स्तरावरील ॲबॅकस स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. संभाजीनगर येथे झालेल्या या स्पर्धेत तिने लेव्हल ३ मध्ये पाचवा क्रमांक पटकावून तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. 'सुपर ॲबॅकस नॅशनल समर चॅम्पियनशिप २०२५' ही स्पर्धा २७ जुलै रोजी संभाजीनगर येथे पार पडली. भारतभरातील अनेक राज्यांतून आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या या चुरशीच्या स्पर्धेत श्री चिंतामणी सुपर ॲबॅकस अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला होता. त्यापैकी अनन्या निलेश उत्तरवार हिने उत्कृष्ट कामगिरी करत पाचवा क्रमांक मिळवला. या यशाचे श्रेय विद्यार्थी आणि पालकांनी अकॅडमीच्या संचालिका भाग्यश्री आशिष इंगोले यांना दिले. तसेच, सेंटरच्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल श्री चिंतामणी ॲबॅकस अकॅडमीला 'बेस्ट सुपर ॲबॅकस' पुरस्काराने गौरविण्यात आले. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रविण वक्ते, डॉ. शालिनी अंकुशे, विनोद जैन आणि मनिष महाजन उपस्थित होते.

## 'ट्रॉमा केअर युनिट' दहा वर्षांपासून धूळखात

पांढरकवडा, दि.४ प्रतिनिधी

पांढरकवडा येथील उपजिल्हा रुग्णालयातील 'ट्रॉमा केअर युनिट' केवळ एका तंत्रज्ञाअभावी गेल्या दहा वर्षांपासून बंद असल्याची धक्कादायक बाब आमदार प्रा. राजू तोडसाम यांनी विधानसभेत उघड केली. त्यांनी याप्रकरणी शासनाचे लक्ष वेधून तातडीने तंत्रज्ञ नेमण्याची मागणी केली आहे. पावसाळी अधिवेशनात बोलताना आमदार तोडसाम म्हणाले की, राष्ट्रीय महामार्गावर वसलेल्या पांढरकवडा येथे दररोज अपघात होतात, मात्र सुसज्ज इमारत आणि यंत्रसामुग्री असूनही ट्रॉमा केअर युनिट धूळखात पडून आहे. त्यामुळे गंभीर जखमींना उपचारासाठी नागपूरला न्यावे लागते, ज्यात अनेकदा रुग्णांचा जीव जातो. काही दिवसांपूर्वीच रुग्णालयातील महाडायलिसिस सेंटरच्या उद्घाटनावेळी त्यांनी ही खंत व्यक्त केली होती आणि रुग्णालयाच्या अधीक्षक वैशाली सातुरवार यांच्याकडून माहिती घेतली होती. त्याच आधारावर त्यांनी सभागृहात हा गंभीर मुद्दा मांडला. कोट्यवधी रुपयांची ही आरोग्य सुविधा केवळ एका तंत्रज्ञाअभावी निरुपयोगी ठरली असून, शासनाने तातडीने या युनिटसाठी तंत्रज्ञ उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी तोडसाम यांनी केली आहे.

# भविष्यात धरती नेसेल हिरवा शालू

### अॅड. अर्चना माने : परजना टेकडीवर वृक्षारोपणाचा तिसरा टप्पा संपन्न, विद्यार्थ्यांच्या सहभागाने परिसर बहरला

उमरखेड, दि. ०४ प्रतिनिधी

"भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट बँकेच्या माध्यमातून परजना टेकडी आणि हा परिसर भविष्यात नक्कीच हिरवा शालू परिधान करेल," असा विश्वास अॅड. अर्चना विजयराव माने यांनी व्यक्त केला. श्रावण सोमवारनिमित्त परजना येथील हेमाडपंथी महादेव मंदिर टेकडीवर आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात त्या अध्यक्षीय भाषणातून बोलत होत्या.

श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी, परजना येथील महादेव मंदिर टेकडीवर श्री तेजमल गांधी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल आणि वृक्ष लागवड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट बँकेच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून हा उपक्रम राबवला जात आहे. या ५००० वृक्ष लागवडीच्या



संकल्पातील हा तिसरा आणि शेवटचा टप्पा होता. यामध्ये १०० वृक्ष मंदिर परिसरात लावण्यात आले आणि ९०० वृक्षांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी महादेव मंदिर संस्थान समितीच्या वतीने अॅड. अर्चना माने यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला ब्राह्मणगावचे रत्नाकर अण्णा मुक्कावार, चातारीचे दादाराव माने, नयन पुद्दलवाड, अरविंद धबडगे, तसेच देवस्थान समितीचे सदस्य, भक्त आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सुनील वानखेडे यांनी, प्रास्ताविक प्राचार्य सादुडे यांनी, तर आभार प्रदर्शन अशोक शिरफुले यांनी केले. भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट बँक आणि श्री तेजमल गांधी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहल आणि वृक्ष लागवड असा दुहेरी उद्देश यामागे होता. यातून विद्यार्थ्यांना निसर्गाच्या जवळ नेण्याचा आणि त्यांच्यात पर्यावरण संवर्धनाचे बीज रोवण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा उपक्रम अनेक वर्षांपासून यशस्वीपणे राबवला जात आहे. उमरखेड तालुक्यातील परजना येथील हेमाडपंथी महादेव मंदिर टेकडीवर हा कार्यक्रम पार पडला. श्रावण महिन्यातील पवित्र दुसऱ्या सोमवारचे औचित्य साधून, या धार्मिक स्थळावर ५००० वृक्ष लागवडीच्या संकल्पाचा तिसरा आणि शेवटचा टप्पा पूर्ण करण्यात आला. यामुळे या परिसराचे धार्मिक आणि नैसर्गिक महत्त्व अधिक वाढण्यास मदत होणार आहे.

#### डॉ. विजयराव मानेंच्या योगदानाला उजाळा

**महादेव मंदिर संस्थान समितीचे सचिव विश्वासराव वाघमारे यांनी, डॉ. विजयराव माने यांनी मागील वर्षी याच पवित्र स्थळावरून केलेला ५००० वृक्ष लागवडीचा संकल्प पूर्ण केल्याबद्दल आनंद व्यक्त केला. महादेव मंदिर परिसराच्या विकासात डॉ. माने यांचे मोठे योगदान असल्याचे सांगून, त्यांनी त्यांचे आभार मानले. त्यांच्या या दूरदृष्टीमुळेच आज टेकडीचा परिसर हिरवाईने नटत आहे.**

#### समाजाचाही खारीचा वाटा

**या कार्यक्रमात सामाजिक बांधिलकीचेही दर्शन घडले. पंजाबराव नारायणराव वाघमारे, माधवराव शामराव माने, शंकरराव दत्तराव माने आणि आकाश बाबुराव माने यांच्याकडून उपस्थित विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. या सहभागामुळे कार्यक्रमाची शोभा वाढली आणि विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहन मिळाले.**

## जिल्ह्यातील लहान संस्थांमधील नोकरभरती पुन्हा अडचणीत

### 'बिंदू नामावली'ला नव्या जीआरचा खोडा

यवतमाळ, दि.४ प्रतिनिधी

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने नुकत्याच काढलेल्या बिंदू नामावली तपासणीच्या शासन निर्णयामुळे यवतमाळ जिल्ह्यातील लहान संस्थांमधील नोकरभरती पुन्हा एकदा अडचणीत आली आहे. हा निर्णय केवळ मोठ्या पदसंवर्गासाठी लागू असल्याने लहान संस्थांची प्रक्रिया थांबली आहे.

हा नवीन शासन निर्णय फक्त ३२ पेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या संस्थांनाच लागू होतो. त्यामुळे जिल्ह्यातील बहुसंख्य शाळा आणि इतर लहान संस्थांमधील बिंदू नामावलीची तपासणी थांबली आहे. मागास वर्ग तपासणी कक्षाने स्पष्ट केले आहे की, या लहान संस्थांसाठी आता स्वतंत्र शासन निर्णय काढावा लागेल. यापूर्वी आदिवासीबहुल जिल्ह्यांसाठी असाच निर्णय येण्यास १८ महिने लागले होते, त्यामुळे आता या नवीन निर्णयाला किती काळ लागेल, याबाबत मोठी अनिश्चितता आहे. या दिरंगाईमुळे जिल्ह्यातील हजारो पदे रिक्त राहण्याचा आणि त्याचा थेट परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. या अनपेक्षित अडथळ्यांमुळे डी.एड, बी.एड. धारकांसह नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## पुस नदीच्या पुलावरून घेतली उडी!

### सहाय्यक पोलीस निरीक्षकाच्या धाडसाने वाचले युवकाचे प्राण, घरगुती वादातून प्रकार

महागाव. दि. ४ प्रतिनिधी



घरगुती वादातून जीवन संपवण्यासाठी थेट पुस नदीच्या पुलावरून उडी घेतलेल्या एका तरुणाला, स्वतःचा जीव धोक्यात घालून नदीत उतरलेल्या सहाय्यक पोलीस निरीक्षकाने वाचवल्याची थरारक घटना रविवारी (दि. ३) महागाव येथे घडली. मारोती लक्ष्मण रणबावळे (३५) असे आत्महत्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचे नाव असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंबुरे यांच्या धाडसामुळे त्याला जीवदान मिळाले आहे.

मारोती रणबावळे याने घरगुती वादातून पुलावरून नदीत उडी मारली. ही घटना पाहताच पत्रकार गणेश भोयर यांनी तात्काळ महागावचे ठाणेदार धनराज निळे यांना माहिती दिली. ठाणेदार निळे यांनी क्षणाचाही विलंब न लावता सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंबुरे यांना पथकासह घटनास्थळी पाठवले. अंबुरे पोहोचले, तेव्हा मारोतीचे भाऊ आणि नातेवाईकही तेथे हजर होते. मारोती नदीच्या पाण्यात असल्याचे दिसताच, अंबुरे यांनी कोणताही विचार न करता स्थानिक नागरिकांच्या मदतीने थेट नदीत उडी घेतली. त्यांनी मारोतीला खांद्यावर उचलून सुरक्षितपणे पुलावर आणले. त्यानंतर तात्काळ रुग्णवाहिकेतून त्याला उपचारासाठी पाठवण्यात आले. या धाडसी बचावकार्यात पोलीस कर्मचारी स्वप्निल रायवाडे, चालक राजीव तिजारे, सुनील जाधव, मोहन मुगाव आणि आतिश जरांडे यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबुरे यांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे आणि धाडसामुळे एका तरुणाचा जीव वाचला असून, त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी प्रशासन सज्ज

### पांढरकवड्यात पर्यवेक्षक, बीएलओंना प्रशिक्षण

पांढरकवडा, दि. ४ प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाल्याने, पांढरकवडा निवडणूक विभाग 'अॅलर्ट मोड'वर आला आहे. मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी आज, शुक्रवारी येथे पर्यवेक्षक आणि बूथ लेव्हल अधिकाऱ्यांसाठी (बीएलओ) विशेष प्रशिक्षण घेण्यात आले.

गेल्या दोन-तीन वर्षांपासून ओबीसी आरक्षणामुळे रखडलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुका



ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या बचत भवनात हे प्रशिक्षण पार पडले. दिल्ली येथून प्रशिक्षण घेऊन आलेले मास्टर ट्रेनर, सहायक शिक्षक लिखार यांनी पीपीटीद्वारे मार्गदर्शन केले. त्यांनी बीएलओंची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, मतदार यादी अद्ययावत करणे, नवीन नावे नोंदवणे, नावे वगळणे आणि दुरुस्ती करणे याबाबत प्रत्यक्ष अर्ज भरून घेत माहिती दिली. तहसीलदार राजेंद्र इंगळे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाला नायब तहसीलदार चांदेकर यांच्यासह निवडणूक विभागाचे कर्मचारी, पर्यवेक्षक आणि बीएलओ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रशिक्षणामुळे मतदार यादी अचूक करण्याच्या कामाला गती मिळणार आहे.

## महागावात भाजपातर्फे विक्रेत्यांना छत्री वाटप

### ऊन-पावसापासून संरक्षणासाठी मदतीचा हात

महागाव दि. ४ प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा होत असलेल्या सेवा सप्ताहांतर्गत, महागाव शहर भाजपतर्फे फुटपाथवरील विक्रेत्यांना छत्री वाटप करण्यात आले. ऊन आणि पावसापासून संरक्षण मिळावे, या उद्देशाने राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून, आमदार किसनराव वानखेडे आणि यवतमाळ जिल्ह्याचे समन्वयक नितीन भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. महागाव शहरातील फुटपाथवर व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह



करणाऱ्या विक्रेत्यांना या छत्र्यांमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी शहर मंडळ अध्यक्ष निलेश पाटील नरवाडे, शहर सरचिटणीस गजानन कदम, माजी तालुकाप्रमुख संजय पाटे, माजी शहराध्यक्ष विलास शेबे, सुरेश पाटील नरवाडे, सुदाम खंदारे, शंकरराव बावणे, गजानन पाटील नरवाडे यांच्यासह अनेक बूथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्तुत्य उपक्रमाबद्दल विक्रेत्यांनी भाजप पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

### १८ दिवसांपासून उपोषण सुरू | 'बुलडोझर' चालवणार कधी?

# नगर परिषदेला अतिक्रमण हटविण्याचा मुहूर्तच सापडेना

आर्णी, दि. ०४ प्रतिनिधी

आर्णी शहरातील चिंतावर ले-आउटमधील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याच्या मागणीसाठी सुरू असलेले उपोषण अठराव्या दिवशीही कायम आहे. नगर परिषद प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे नागरिक संतप्त झाले असून, जोपर्यंत रस्ता पूर्णपणे मोकळा होत नाही, तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, असा निर्धार त्यांनी केला आहे.

आर्णी नगर परिषद अंतर्गत असलेल्या चिंतावर ले-आउटमधील मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. हे अतिक्रमण काढण्यासाठी, परिसरातील नागरिक १५ जुलैपासून आमरण उपोषणाला बसले आहेत. आज या उपोषणाचा अठरावा दिवस असून, यात महिला, पुरुष, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक यांचा समावेश आहे. मात्र, नगर परिषद प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. मुख्याधिकारी रवींद्र राऊत यांनी अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावल्या असल्या, तरी रस्त्याची मोजणी करून नेमके किती अतिक्रमण आहे, हे निश्चित करण्यात आणि ते काढण्यात त्यांना अपयश आले आहे. प्रशासनाच्या या दिरंगाईमुळे उपोषणकर्त्यांचा संताप वाढत असून, त्यांनी आपली भूमिका अधिकच तीव्र केली आहे. जोपर्यंत संपूर्ण रस्ता मोकळा होत नाही, तोपर्यंत उपोषण सुरूच राहील, असा निर्वाणीचा इशारा नागरिकांनी दिला आहे. या आंदोलनामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



#### जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशालाही केराची टोपली?

**जिल्हाधिकारी विकास मिना यांचे अतिक्रमण विरोधी धोरण जिल्ह्यात सर्वत्र राबवले जात असताना, आर्णीचे मुख्याधिकारी मात्र आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशालाही जुमानत नसल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवणाऱ्या अशा कामचुकार अधिकाऱ्यावर आता जिल्हाधिकाऱ्यांनीच कारवाई करावी, अशी संतप्त प्रतिक्रिया उपोषणकर्त्यांनी व्यक्त केली आहे. या प्रकारामुळे प्रशासकीय वर्तुळातही खळबळ उडाली आहे.**

#### १८ दिवसांपासून न्यायाची प्रतीक्षा

**चिंतावर ले-आउटमधील रस्ता मोकळा व्हावा, यासाठी महिला, पुरुष, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक गेल्या १८ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. कडाक्याचे ऊन आणि पावसाची पर्वा न करता, ते आपल्या मागणीवर ठाम आहेत. मात्र, नगर परिषद प्रशासन केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने, नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे 'सरकारी काम अन् देव पाहातो' अशीच काहीशी अवस्था झाली आहे.**

## महत्वाचे

### प्रा. संजय वानखेडे यांची प्रदेश काँग्रेसच्या सचिवपदी निवड



**यवतमाळ, दि.४:** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या नूतन कार्यकारिणीत यवतमाळ येथील युवा नेते प्रा. संजय वानखेडे यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या अनेक वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.
प्रा. संजय वानखेडे हे अनेक वर्षांपासून काँग्रेसचे सक्रिय पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वी जिल्हा सचिव, सरचिटणीस आणि अनुसूचित जाती विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणूनही काम पाहिले आहे. ते 'विदर्भ मातंग समाज संघटना' या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेत प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीत त्यांना संधी देण्यात आली आहे.
आपल्या निवडीचे श्रेय त्यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला, ज्येष्ठ नेते माणिकराव ठाकरे, शिवाजीराव मोघे, वसंतराव पुरके आणि संजय ठाकरे यांना दिले आहे. त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आणि त्यांच्या समाजामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

### बांधकाम साहित्याची चोरी

**शीरपुर :** बांधकाम साहित्याची चोरी केल्याची घटना घडली. याप्रकरणी अडीच क्वींटल लोखंडी सलाखी, लोखंडी पाईन असा एकुण २० हजाराचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरून नेला. ही घटना २ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी कुंडलीकराव मनीराम ठावरी यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा नोंद केला.

## निधन



### प्रगतशील शेतकरी पांडुरंग साबापुरे यांचे निधन

**घाटंजी, दि. ४ :** येथील जेसीस कॉलनीतील रहिवासी असलेले प्रगतशील शेतकरी पांडुरंग त्र्यंबकराव साबापुरे (वय ७५) यांचे रविवारी, ३ ऑगस्ट रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. विशेष म्हणजे, ३ ऑगस्ट हा त्यांचा वाढदिवसही असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मूळचे शरद (पारवा) येथील असलेल्या साबापुरे यांनी पांढरकवडा येथील सहकारी सूतगिरणीतून आपल्या कष्टाळू आणि प्रामाणिक आयुष्याची सुरुवात केली होती. शेतीत विविध यशस्वी प्रयोग करण्यासोबतच, निवृत्तीच्या काळात त्यांनी चित्ररांगोळीचा अनोखा छंद जोपासला होता. त्यांच्या पार्थिवावर घाटंजी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

युवतीवरील अत्याचार प्रकरण

# आरोपीला अटक होत नसल्याने संतप्त नागरिकांचा ठाण्यावर मोर्चा

### तक्रार देऊन देऊन सात दिवस उलटले, तरी आरोपी मोकाटच



वणी, दि.४ प्रतिनिधी

लग्नाचे आमिष दाखवून युवतीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला सात दिवस उलटूनही अटक न केल्याने, संतप्त नागरिकांनी सोमवारी (दि. ४) सायंकाळी वणी पोलिस ठाण्यावर धडक दिली. पीडितेच्या नातेवाईकांसह शंभर ते दीडशे स्त्री-पुरुषांच्या जमावाने पोलिस ठाण्याला घेराव घालत, आरोपीला तत्काळ अटक करण्याची मागणी केली, त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पीडित तरुणीने २९ जुलै रोजीच ठोस पुराव्यांसह वणी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. मात्र, मेघदूत कॉलनी येथील आरोपी मोहम्मद हकीमोद्दीन पठाण (वय ३२) हा सात दिवसांपासून मोकाट असल्याने, पीडितेचे कुटुंबीय आणि परिसरातील नागरिक संतप्त झाले होते. सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास जमावाने थेट पोलिस ठाणे गाठले. यावेळी ठाणेदार गोपाल उंबरकर यवतमाळ येथे असल्याने, जमाव सुमारे तासभर ठाण्यासमोर ठिय्या मांडून होता. उंबरकर पोहोचल्यानंतर, त्यांनी नागरिक प्रतिनिधींसोबत चर्चा केली. गंभीर गुन्हा घडूनही अटकेत दिरंगाई का, असा संतप्त सवाल नागरिकांनी केला. पोलिसांनी तपास अंतिम टप्प्यात असून, लवकरच कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. मात्र, नागरिकांनी पोलिसांवर हलगर्जीपणाचा आरोप करत, जोपर्यंत आरोपीला अटक होत नाही, तोपर्यंत शांत बसणार नसल्याचा इशारा दिला.

### पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह तक्रार दाखल

**होऊन एक आठवडा होत आला, तरी आरोपी मोकाट कसा? ठोस पुरावे असतानाही पोलिस कारवाईत हलगर्जीपणा का करत आहेत? अशा गंभीर गुन्ह्यात दिरंगाई होत असेल, तर महिलांच्या सुरक्षेचे काय? असे अनेक संतप्त सवाल या मोर्चातून उपस्थित झाले. या प्रकरणामुळे वणी शहरातील महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**

## पुसद येथे ज्येष्ठांसाठी फिजिओथेरपी शिबिर



पुसद, दि. ४ प्रतिनिधी

वाढत्या वयानुसार ज्येष्ठांना होणाऱ्या शारीरिक व्याधी आणि फिजिओथेरपीची गरज लक्षात घेऊन, पुसद येथे विशेष फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. लॉयन्स क्लब पुसद सिटी आणि ज्येष्ठ नागरिक संघाच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या शिबिरात ५० ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.

शनिवारी, २ ऑगस्ट रोजी येथील विरंगुळा केंद्रावर हे शिबिर पार पडले. लॉयन्स क्लबचे बोर्ड ऑफ डायरेक्टर शरद मैंद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात, फिजिओथेरपिस्ट डॉ. रघुवीर जाजू आणि डॉ. अंजली बजाज यांनी ज्येष्ठांची तपासणी करून त्यांना योग्य उपचार व व्यायामाचा सल्ला दिला. 'वाढत्या वयानुसार किंवा आजारपणामुळे ज्येष्ठांना फिजिओथेरपीची गरज भासते, याच उद्देशाने हे शिबिर आयोजित केले आहे,' असे मत शरद मैंद यांनी व्यक्त केले. लॉयन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट बोर्ड मेंबर डॉ. जय भोपी यांच्या पुढाकाराने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. मंचावर ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष दयाराम चव्हाण, लॉयन्स क्लबचे अध्यक्ष मिलिंद राठोड, सचिव नंदकिशोर देशमुख, कोषाध्यक्ष उमाकांत वानखेडे, डॉ. गोविंद फुके आदी उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## काँग्रेस प्रदेश सरचिटणीसपदी माजी जि.प. अध्यक्ष माधुरी आडे



आर्णी, दि. ४ प्रतिनिधी

येथील काँग्रेसच्या युवा नेत्या व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा माधुरी अनिल आडे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आर्णी तालुक्यातून प्रथमच एका महिला नेत्याला राज्यस्तरावर हे मानाचे स्थान मिळाले आहे.

राष्ट्रीय काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल यांनी त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत ही निवड केली आहे. त्या आर्णी नगरपरिषदेचे प्रथम नगराध्यक्ष अनिल आडे यांच्या पत्नी आहेत. या निवडीचे श्रेय त्यांनी स्व. रामजी आडे यांची प्रेरणा, शिकवण तसेच माजी मंत्री शिवाजीराव मोघे, खासदार प्रतिभा धानोकर, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व महिला प्रदेशाध्यक्ष संध्या सव्वालाखे यांच्या सामूहिक मार्गदर्शनाला दिले. त्यांच्या निवडीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पक्षाला निश्चितच मोठे बळ मिळणार असून, त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## जामवाडी गावाचा दारव्हा तालुक्यात समावेश

### ग्रामस्थ आक्रमक; चुकीची सर्कल फेरजोडणी रद्द करण्याची मागणी



यवतमाळ, दि.४ प्रतिनिधी

यवतमाळ तालुक्यातील जामवाडी गावाचा समावेश चुकीने दारव्हा तालुक्यातील चानी कामठवाडा सर्कलमध्ये केल्याने ग्रामस्थ आक्रममक झाले आहेत. राजमुद्रा प्रतिष्ठान आणि ग्रामस्थांनी आज जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन देत, ही चूक तत्काळ दुरुस्त करण्याची मागणी केली आहे.

निवडणूक विभागाने प्रसिद्ध केलेल्या नवीन यादीमुळे हा गोंधळ निर्माण झाला आहे. जामवाडी गाव वर्षानुवर्षे यवतमाळ तालुक्यातील तिवसा पंचायत समिती गणाचा भाग आहे. येथील नागरिकांचे सर्व शासकीय कामकाज यवतमाळमधूनच होते. असे असतानाही गावाचा समावेश दारव्हा तालुक्यात केल्याने विकासावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. हा केवळ सर्कल बदलाचा नाही, तर गावाच्या ओळखीचा आणि भविष्यातील हक्कांचा प्रश्न आहे,' असे राजमुद्रा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नितीन मिरझापूरे यांनी सांगितले. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून जामवाडीचा समावेश पुन्हा तिवसा गणात करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदन प्रसंगी राजमुद्रा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष नितीन मिर्झापूरे, लखन अवथळे, अनिल चावरे (नंदगवळी समाज संघटना अध्यक्ष), राजू चावरे, अनिल पाने, किशोर कालोकार, महिंद्र पाने, चेतन घाटोळ, पवन पाने, गोपाल जाधव, लोकेश झांबरे, वासुदेव साठे, भास्कर घाटोळ, उमेश आडे, भारत पाने, अरुण कुंभेकर, भाऊराव झांबरे, नाना अवथळे, बळवंत घाटोळ, विलास आंबेकर, आकाश कालोकार, माणिक झांबरे, ज्ञानेश्वर अवथळे, चेतन पाने, गणपत झांबरे, किरण जाधव, ओम कुदळे, श्रीकांत वायदंडे, प्रेम धुर्वे, गौरीशंकर कन्नाके, आदी मान्यवर उपस्थित होते.

### ५८ हजारांचा ऐवज लंपास

**वणी. दि. ४ :** येथील काळे ले-आऊट परिसरात घरफोड्यांचे सत्र सुरूच असून, आणखी एका घरातून अज्ञात चोरट्यांनी ५८ हजारांपेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणी वणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अमित संजय पारखी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चोरट्यांनी त्यांच्या घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने, बोट कंपनीचे होम थिएटर आणि इतर साहित्य असा एकूण ५८,५०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. काही दिवसांपूर्वीच याच परिसरात चोरीची घटना घडली होती. पुन्हा घरफोडी झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

संघर्षातून नेतृत्वापर्यंतचा प्रवास

## शैला मिर्झापूरे भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष!

एका सामान्य गृहिणीची प्रेरणादायी झेप



यवतमाळ, दि.४ प्रतिनिधी

आपला संसार सांभाळून, सामाजिक कार्यात स्वतःला झोकून देत, सर्वसामान्यांच्या वेदनांवर फुंकर घालत, शेकडो महिलांना आधार देणाऱ्या एका सामान्य महिलेने आपल्या कर्तृत्वाच्या बळावर राजकारणात घेतलेली झेप अनेकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. भाजप महिला मोर्चाच्या यवतमाळ शहराध्यक्ष म्हणून यशस्वी कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर, कवयित्री आणि सामाजिक कार्यकर्त्या शैला मिर्झापूरे यांची आता भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे.

घर आणि समाज या दोन्ही आघाड्यांवर यशस्वीपणे काम करत, त्यांनी 'भाजप महिला सक्षमीकरण केंद्रा'च्या माध्यमातून शेकडो महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर बनविले आहे. त्यांचे हेच कार्य त्यांना राजकारणात पुढे घेऊन आले. २०२० मध्ये भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर, त्यांनी जिल्हा सचिव, सांस्कृतिक सेल प्रभारी आणि २०२३ पासून शहराध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम केले. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन, माजी मंत्री मदन येरावार आणि जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांनी त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची नवी जबाबदारी सोपवली आहे. शैला मिर्झापूरे या केवळ राजकारणी नसून, एक उत्तम स्तंभलेखिका, आकाशवाणी कलाकार आणि कवयित्री म्हणूनही ओळखल्या जातात. त्यांना 'आयडॉल ऑफ महाराष्ट्र' आणि 'राष्ट्रसंत माणिक रत्न' यांसारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. 'माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यावर पक्षाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवून, महिलांचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडेन,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या निवडीचे वृत्त कळताच सर्वस्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## बुलडाणा अर्बन बँकेत २८ लाखांचा अपहार

### कुंपणानेच शेत खाल्ले, कर्मचा-याला ग्राहकांचे सोने विकायला जाताना रंगेहात पकडले



ढाणकी, दि. ४ प्रतिनिधी

'कुपणानेच शेत खाल्ले' या म्हणीचा प्रत्यय देत, ढाणकी येथील बुलढाणा अर्बन बँकेच्या कर्मचाऱ्यानेच ग्राहकांनी तारण ठेवलेले २८ लाख रुपयांचे सोने चोरल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपी कर्मचारी फरार झाला असून, या घटनेमुळे बँकिंग क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

शहरातील बुलढाणा अर्बन बँकेत लिपिक पदावर कार्यरत असलेल्या उमेश सुनील वाघ या कर्मचाऱ्याने, बँकेत तारण ठेवलेले सुमारे २८ लाख रुपयांचे सोने चोरून, ते शहरातीलच एका सराफा व्यापाऱ्याकडे विकण्याचा प्रयत्न केला. मात्र, ज्वेलर्स मालकाला संशय आल्याने त्याने बँकेला माहिती दिली आणि हा घोटाळा उघडकीस आला. आरोपी गेल्या दोन वर्षांपासून या शाखेत कार्यरत होता. बँकेचे १५ जुलै रोजीच ऑडिट झाले असल्याने, आरोपीने हा घोटाळा एकाच दिवसात केल्याचे दिसून येत आहे. या घटनेनंतर, बँकेच्या पथकाने ढाणकीत दाखल होऊन रेकॉर्ड तपासले. याप्रकरणी, आरोपी उमेश वाघ याच्याविरुद्ध बिटरगाव पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे. यापूर्वीही शहरातील एका पतसंस्थेने आणि एका आरडी एजंटने नागरिकांची फसवणूक केल्याने, या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दिवसभर या प्रकरणाची शहरात चर्चा सुरू होती. नेहमीप्रमाणे बँकेतील इतर कर्मचारी जेवणासाठी गेले असता, आरोपी उमेश वाघ याने संधी साधली. त्याने बँकेतील तारण ठेवलेले सुमारे २८ लाख रुपयांचे सोने घेतले आणि शहरातील एका सराफा व्यापाऱ्याकडे विकण्यासाठी नेले. मात्र, एवढ्या मोठ्या प्रमाणात सोने विकायला आल्याने आणि वाघ हा बँकेचा कर्मचारी असल्याने, ज्वेलर्स मालकाला संशय आला. त्याने तात्काळ बँकेशी संपर्क साधून माहिती दिली, ज्यामुळे हा संपूर्ण घोटाळा उघडकीस आला.

### ग्राहकांचे नुकसान होणार नाही - मुग्धा देशपांडे

**या घटनेनंतर, बँकेच्या यवतमाळ विभागीय व्यवस्थापक मुग्धा देशपांडे यांनी ग्राहकांना दिलासा दिला आहे. 'नागरिकांनी गोंधळून जाऊ नये. ज्या ग्राहकांचे सोने गायब झाले आहे, त्यांना संस्थेमार्फत बाजारभावानुसार पूर्ण भरपाई दिली जाईल. तसेच, आवश्यक असल्यास दागिनेही बनवून दिले जातील. कोणत्याही ग्राहकाचे एक रुपयाचेही नुकसान होणार नाही,' अशी ग्वाही त्यांनी दिली आहे.**

जिल्हा समन्वयक नितीन भुतडा 'केवळ डॉक्टर, इंजिनिअर बनविण्याचा अट्टहास नको'

# 'विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव द्या'

उमरखेड, दि. ४ प्रतिनिधी

आजच्या स्पर्धेच्या युगात टिकणारी मुले घडवण्यासाठी, पालकांनी त्यांच्यातील कलागुणांना प्रोत्साहन दिले पाहिजे, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी केले. जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद आणि स्व. दिगंबरराव पसलवाड संस्थेतर्फे आयोजित गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते.

रविवार, दि. ३ ऑगस्ट रोजी, जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद आणि स्व. दिगंबरराव पसलवाड बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने चातारी येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात आमदार किसनराव वानखेडे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले आणि नागरिकांनी आपल्या अडचणी न संकोचता सांगाव्यात, असे आवाहन केले. यावेळी, इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले, तर २८ गरजू आणि अनाथ मुलांना कपडे आणि ७० वयोवृद्ध नागरिकांना आधारासाठी काठीचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवाजी माने यांनी, सूत्रसंचालन चंद्रकांत पवार यांनी, तर आभार प्रदर्शन भागाजी शिवरतवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अभिजीत केशवे, संकेत कुंबलवाड, सिद्धांत वाठोरे, विरेंद्र वंचेवाड, योगेश बेद्रे, ओमकार जोशी, धनंजय माने, हनुमान देवगडे, प्रतीक वाठोरे, अशोक माने, किसन खांडरे, अमोल दवणे, अफजल मिस्त्री आणि संकेत माने यांनी परिश्रम घेतले. साहित्य आणि समाजसेवेचा संगम हा गुणगौरव सोहळा जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषद आणि स्व. दिगंबरराव पसलवाड बहुउद्देशीय संस्था, चातारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी त्यांनी ही परंपरा कायम ठेवली. या उपक्रमातून, साहित्य आणि समाजसेवेचा सुंदर संगम साधत, संस्थेने केवळ गुणवंत विद्यार्थ्यांचाच गौरव केला नाही, तर गरजू आणि वयोवृद्ध नागरिकांनाही आधार दिला.



### 'स्किल डेव्हलपमेंट सेंटर' उभारणार

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन मिळावे, यासाठी संस्थेने 'स्किल डेव्हलपमेंट सेंटर' सुरू करावे, असे आवाहन नितीन भुतडा यांनी केले. यासाठी आपण सर्वतोपरी मदत करू, असे आश्वासनही त्यांनी दिले. केवळ डॉक्टर, इंजिनिअर बनवण्याचा अट्टहास न धरता, मुलांमधील नैसर्गिक गुणांना प्रोत्साहन देण्याचा सल्लाही त्यांनी पालकांना दिला.**

### गुणवत्तेसोबतच सामाजिकतेचा गौरव

**या कार्यक्रमात केवळ गुणवंत विद्यार्थ्यांचाच सत्कार झाला नाही, तर सामाजिक बांधिलकीही जपण्यात आली. पहिली ते बारावीतील गुणानुक्रमे पहिल्या तीन विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यासोबतच, २८ आर्थिकदृष्ट्या दुर्बळ आणि अनाथ मुलांना कपडे, तर ७० वयोवृद्ध नागरिकांना चालण्यासाठी आधाराची काठी (स्टिक) देऊन त्यांचाही सन्मान करण्यात आला.**

### भरधाव दुचाकीची वृद्धेला धडक

आर्णी. दि. ४ प्रतिनिधी

शहरात भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे दुचाकी चालवून एका ७० वर्षीय वृद्ध महिलेला धडक देऊन गंभीर जखमी केल्याची घटना १५ जुलै रोजी घडली होती. याप्रकरणी आर्णी पोलिसांनी आता दुचाकीचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. उदल शिवराम पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची आई पिंपळबाई शिवराम पवार (वय ७०) या रस्त्याच्या कडेने पायी जात होत्या. यावेळी आरोपी युवराज गुलाब राठोड याने आपली एम.एच. २९ एयु ६८८७ क्रमांकाची दुचाकी भरधाव वेगाने चालवत त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात पिंपळबाई यांच्या दोन्ही गुडघ्यांना आणि उजव्या हाताला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाले आहे.